वर्षारंभ अंक ▯ १ जून १९६६ ▯ चाळीस पैसे

सुभाषचंद्रांचा अंत ▯ एक टिपण

वासुनाका ▯ एक परीक्षण

दिहांगच्या तीरावर ▯ एक प्रदीर्घ साहस कथा



# आमच्यापुढील प्रश्न

मती कुंठित करून टाकील असा आमचा हा वर्तमानकाल आहे. भविष्याकडे आमची दृष्टी लागली आहे आणि भूतकालालाही आम्ही विसरू शकत नाही. भूत-भविष्याच्या रस्सीखेचीत आम्ही सापडलो आहोत. हा संघर्ष कसा सोडवायचा आणि आमच्या आधिभौतिक गरजा भागवणारा परंतु त्याबरोबर आमची आध्यात्मिक धारणा कायम राखणारा जीवनमार्ग कसा शोधून काढायचा हाच आमच्यापुढे प्रश्न आहे. कोणती नवी ध्येये किंवा नव्या जगाला अनुरूप होतील अशा रीतीने फेरबदल करून कोणती जुनी ध्येये आम्हांला जनतेपुढे ठेवता येतील आणि जनतेला कशा रीतीने जागृत आणि कार्यप्रवृत्त करणे आम्हांला शक्य होईल, हा प्रश्न आमच्यापुढे आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू
'भारत : आज आणि उद्या'
**मौलाना आझाद स्मारक व्याख्यानमाला**

[पांच वर्षांपूर्वी, 'माणूस' प्रथमांकाच्या मुखपृष्ठावर दिलेली विचारशलाका]




वर्ष सहावे : अंक पहिला : १ जून १९६६
किंमत चालीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

## शुभेच्छा !

**संपादक ' माणूस ' यांस**

सप्रेम नमस्कार वि. वि.

आपला ' माणूस ' ( १५ मे १९६६ ) पोचला. अंकातील प्रत्येक लेख वाचनीय आहे. विशेषत: इंडोनेशियावरील श्री. अरुण साधू यांचा लेख अतिशय मननीय आहे. त्यावरील आपल्या ' माणूस 'च्या अंकावरील मुखपृष्ठ अतिशय मार्मिक आहे. चीनकडे झुकत चाललेला इंडोनेशिया आपण लाल रंगाचे द्वारे प्रकट केला आहे. श्री. शंकरराव सरनाईकांच्याबद्दलचा लेखही आवडला.

पुढील महिन्यात आपला ' माणूस ' ६ व्या वर्षात पदार्पण करणार. ' माणूस 'ला आमच्या शुभेच्छा.

— शरद जोशी, मुंबई

[ शुभेच्छांचा साभार स्वीकार करून नवीन वर्षाच्या वाटचालीला या अंकापासून ' माणूस ' सुरुवात करीत आहे. वाचकांच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ' माणूस ' सर्वतोपरी झटेल यापेक्षा कोणते अधिक आश्वासन याप्रसंगी देणे शक्य आहे ? कृपा लोभ असावा ही विनंती. — **संपादक** ]

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# दे श-वि दे श

## □ अण्वस्त्रे– भारतही प्रगतिपथावर आहे

“ आम्ही अर्धपोटी, अर्धवस्त्रानिशी राहिलो तरी हरकत नाही; पण आम्ही अणुबाँब करूच.” काही वर्षांपूर्वी कम्युनिस्ट चीनचा परराष्ट्र मंत्री मार्शल चेन–यी याने फ्रेंच राजदूताशी बोलताना हे उद्‌गार काढले.

आणि खरोखरच चीनने अणुबाँब तयार केलाच. ऑक्टोबर १९६४ मध्ये आपल्या पहिल्या अण्वस्त्राचा नाट्यमय रीतीने स्फोट करून चीनने साऱ्या जगात खळबळ उडवून दिली. पुढे लगेच १९६५ मध्ये आपल्या दुसऱ्या अण्वस्त्राची आणि गेल्या महिन्यात आपल्या पहिल्या हैड्रोजन बाँबची चाचणी करून चीनने आपल्या शेजाऱ्यांच्या उरात धडकीच भरविली आहे.

वास्तविक पाहता भारताने १९५४ साली शांततामय अणुशास्त्र संशोधनाचा कार्यक्रम हाती घेतल्यानंतर चार वर्षांनी चीनने रशियाच्या मदतीने आपला पहिला रिॲक्टर बसविला. चिनी पंतप्रधान चाऊ–एन–लाय भारताच्या दौऱ्यावर आला असताना त्याने आपला अणुसंशोधनाचा कार्यक्रम पाहून सांगितले होते की, अणुशक्तीच्या विकासाच्या कार्यक्रमात भारत चीनपेक्षा दहा वर्षांनी पुढे आहे, पण आज चीनने आपल्या पहिल्या हैड्रोजन बाँबचा स्फोट करून या बाबतीत आपण भारताच्या कितीतरी पुढे आहोत, हे सिद्ध केले आहे; एवढेच नव्हे तर ब्रिटन, रशिया, अमेरिका यांना आपापल्या अणुबाँबचा स्फोट केल्यानंतर हैड्रोजन बाँब तयार करायला जेवढा वेळ लागला त्यापेक्षा कितीतरी कमी वेळात चीनने आपला हैड्रोजन बाँब तयार केला आहे.

चीनचा हा हैड्रोजन बाँब परिपूर्ण नसून एक अपरिपक्व पद्धतीने स्फोट केलेला (Fission–Fusion–Fission) हैड्रोजन बाँब आहे. असे जरी असले तरी चीनने केलेली प्रगती निःसंशयच आश्चर्यकारक आहे हे जगभरच्या शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे.

भारताच्या उत्तर क्षितिजावर आक्रमक राष्ट्रांनी विस्फोट केलेल्या अण्वस्त्रांचे हे काळे ढग एकामागून एक आपली अशुभ छाया पाडत असताना भारत काय करीत

आहे ? वस्तुस्थितीला विसरून भारत अद्यापही डोळे मिटून शांततेची माळ ओढीत बसला आहे, की खरोखरच काही व्यावहारिक विचार करतो आहे ? गेल्या दोन महिन्यांतील घडामोडी या प्रश्नावर निश्चित प्रकाश टाकतील.

चीनच्या पहिल्या अण्वस्त्र चाचणीपूर्वी भारतातील बहुतेक सारे जबाबदार नेते शांततेसाठी अणुसंशोधनाचा जप करीत होते. चीनने पहिला स्फोट केल्याबरोबर मात्र बऱ्याच जणांना धक्का बसला आणि ते गंभीरपणे विचार करू लागले. दुसऱ्या स्फोटाने सगळ्यांचे डोळे उघडले आणि काँग्रेसमधील जे नेते उघड उघड काही बोलत नव्हते त्यांनीही आता भारतानेही अणुबाँब करायलाच हवा, असा तगादा लावण्यास सुरुवात केली. चीनच्या हैड्रोजन बाँबचा स्फोट झाल्यानंतर मात्र प्रकरण गंभीर झाले आणि काँग्रेस संसदीय पक्षाच्या सभेत सभासदांच्या जोरकस मागणीला उत्तर देताना पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना सांगावे लागले की अणुशक्ती संशोधनाच्या बाबतीत भारत सतत प्रगतीच करीत राहील. आणि या क्षेत्रातील सर्व माहिती प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करील. त्या असेही म्हणाल्या की भारतासारखा देश आपल्या संरक्षणासाठी परकीय राष्ट्रांवर नेहमीच अवलंबून राहणे शक्य नाही.

आणखी एक दुसरी घटना. काही दिवसांपूर्वी अमेरिकन वृत्तपत्रांत एक वार्ता प्रसिद्ध झाली. भारत लवकरच अण्वस्त्र चाचणी करणार असल्याची ती वार्ता होती. तीमध्ये म्हटले होते की अण्वस्त्र चाचणी बंदी कराराचा भंग न करता आणि शांततामय कामांच्या उपयोगांसाठी हे चाचणी स्फोट भारत मोठ्या कौशल्याने करणार आहे. राजस्थान कालवा खोदण्यासाठी म्हणून किंवा कुठले तरी बंदर खोल करण्यासाठी जमिनीखाली हे स्फोट करण्यात येतील. स्फोट जमिनीखाली असल्याने चाचणी बंदी कराराचाही भंग करावा लागणार नाही. आणि ते शांततामय कार्यासाठी करावयाचे असल्याने आजपर्यंतच्या धोरणाला बगल दिली अशा टीकेलाही तोंड द्यावे लागणार नाही.

अर्थात ही वार्ता अमेरिकन वृत्तपत्रांतली असल्याने त्यात प्रचाराचाही धोका संभवतो. पण भारत सरकारने अद्याप या बातमीचा इन्कार केल्याचे ऐकिवात नाही. या दोन घटनांवरून निष्कर्ष काय निघणार ?

### आपली प्रगती

दरम्यान अण्वस्त्र निर्माण करण्याचा सरकारने निर्णय घेतल्यावर १० महिन्यांच्या आत पहिल्या अण्वस्त्राची चाचणी घेता येईल इतकी भारतीय शास्त्रज्ञांची तयारी आहे. शांततामय अणुसंशोधनाच्या बाबतीत भारताने बरीच पुढे मजल मारली आहे हे सर्वांनाच मान्य आहे. मांडवली खर्च अगोदरच झाला असल्याने १ मेगॅटनचा—म्हणजे अमेरिकेने हिरोशिमावर टाकलेल्या अणुबाँब एवढ्या शक्तीचा—अणुबाँब तयार करावयास भारताला सुमारे १८ लाख रुपये खर्च येईल. चीनचा

हैड्रोजन बॉंब यापेक्षा सुमारे ६५ पटींनी जास्त शक्तिमान होता. चीनच्या तोडीस तोड द्यावयाची असेल तर खरेच चाऊने म्हटल्याप्रमाणे भारतीयांनीही ' अर्धपोटी आणि अर्धवस्त्राने ' राहण्याची तयारी ठेवली पाहिजे.

आणि केवळ अण्वस्त्रे तयार करूनच भागत नाही. त्याचबरोबर ती वाहून नेण्यासाठी जड बॉंबर्स, रॉकेट्स् व मिसाईल्सही तयार करावी लागतात. सध्याच्या उपलब्ध माहितीप्रमाणे चीनजवळ सध्याच लघुपल्ल्याची रॉकेट्स् आहेत. त्यामुळे बंगाल, बिहार, ओरिसा आणि उत्तर प्रदेशाचा काही भाग चिनी बॉंबच्या टप्प्यात सहज येतो. याही बाबतीत चीनची वेगाने प्रगती चालू आहे. १९७५ पर्यंत चीन-जवळ संपूर्ण विकसित अशी इंटर कॉंटिनेन्टल बॅलॅस्टिक मिसाईल सिस्टिम असेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

तसेच चीनजवळ सोव्हिएत रशियाच्या ' जी ' सबमरिनच्या धर्तीवर बांधलेल्या तीन पाणबुड्या असून त्यांवर तीनशे ते चारशे मैलांचा पल्ला असणारी रॉकेट्स् आहेत अशीही माहिती आहे. दूर पल्ल्याची व उंचावर जाणारी रॉकेट्स् तयार करण्याचा कार्यक्रम भारताने हाती घेतल्याच्या काही गोटातल्या बातम्या आहेत. पण त्याला अद्याप सरकारी दुजोरा नाही. वातावरणाच्या संशोधनासाठी म्हणून भारताने फ्रान्सकडून काही रॉकेट्स् घेतली होती. त्यापासूनच दूर व मध्यम पल्ल्याची लष्करी रॉकेट्स् तयार करता येतील.

या साऱ्या बातम्या असल्या तरी सरकार त्यांचा इन्कारही करीत नाही आणि दुजोराही देत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. एवढे मात्र खरे की उच्च पातळीवर या बाबतीत नवे व्यावहारिक धोरण ठरविले जात असल्याची निश्चित चिन्हे आहेत. ●


# शस्त्रक्रियेची जरूरी नाही

नाकातील हाड, मांस, वाढल्यास


श्वासोच्छ्वासास अडचण, सर्दी, दुर्गंधी, खपली,

डोकेदुखी, दम्यासारखा खोकला असल्यास

पोस्टेजसह लिहा.

## आरोग्य मंदिर

सिटी हायस्कूल रोड, सांगली (महाराष्ट्र).


साठे
बिस्किटें
इतकीं स्वादिष्ट असतात कीं कांहीं विचारूंच नका!
heros' SBG-241 C MAR

# सुभाषचंद्रांचा अंत !

राः मः शास्त्री


## अमेरिकन सरकारने फासावर लटकावले !

देशगौरव सुभाषचंद्र बोस हे अज्ञातवासात असून ते लवकरच प्रकट होणार आहेत, अशा अर्थाच्या बातम्या भारतातील जबाबदार वृत्तपत्रे वारंवार प्रकाशित करीत असतात. त्यांची प्रकट होण्याची म्हणून दिलेली काळवेळ उलटून गेली तरी त्यासंबंधी ही बातमी देणारी वृत्तपत्रे वा नेते कसलाही खुलासा करीत नाहीत. कालांतराने पुनः कुणीतरी असेच काहीतरी छापते व ते निरर्थक ठरते. हा विनोदी प्रकार आता आपल्या चांगलाच अंगवळणी पडला आहे व आता कुणी कधी, "ते प्रकट होणार आहेत," असे छापले तर त्या भविष्यवाणीकडे आपण लक्षही देत नाही. परंतु भारताच्या एका क्रांतिकारक सुपुत्राविषयी हा खेळ सुरू ठेवण्यात कुणाचा काही अंतस्थ हेतू असेल काय ? सुभाषचंद्रांचा अंत नेमका कसा झाला, हे ज्यांना माहीत आहे, तेच लोक सत्य लपवण्यासाठी व आजच्या राजकीय संबंधांत मिठाचा खडा पडू नये म्हणून, आपल्या पगारी हस्तकांकरवी ही मौज करीत आहेत किंवा काय ? शौलीमारी आश्रमातला बाबा हेच सुभाषचंद्र आहेत किंवा नाहीत, याचा छडा लावणे भारत सरकारला अशक्य आहे काय ? या सर्व शंका मनात याव्या अशी माहिती प्रकाशात आलेली आहे. या माहितीनुसार, सुभाषचंद्र बोस लढाईच्या काळातच जपानच्या शरणागतिपूर्वी अमेरिकन सैन्याच्या हाती लागले व

अमेरिकन सरकारने त्यांना शत्रूचा हस्तक म्हणून फासावर लटकावले !

१९०७ सालापासून वृत्तपत्रक्षेत्रात वावरणाऱ्या लुईस लॉचनेर (Louis Lochner) या अमेरिकन पत्रकाराने " गोबेल्सची दैनंदिनी " सपादित केलेली आहे. बहुसंख्य नाझी नेत्यांशी प्रत्यक्ष ओळख ठेवून हा लॉचनेर नाझी सत्तेवर येऊन, अमेरिकेशी हिटलरने युद्ध जाहीर करीपर्यंत जर्मनीत होता. " The Goebbels Diaries " – ' गोबेल्सची दैनंदिनी ' ही वस्तुत: १९४५ मध्ये बर्लिन रशियनांनी व्यापले, तेव्हा त्यांच्या हाती पडली. बरेचसे कागदपत्र रशियनांनी मॉस्कोला नेले, परंतु काही फाटक्या तुटक्या अवस्थेत बर्लिनच्या चॅन्सेलरीतच फेकून देण्यात आले होते, त्यातच ही दैनंदिनी युद्धानंतर जर्मनीला वारंवार भेटी देणाऱ्या फ्रँक मॅसन नावाच्या अमेरिकन माणसाच्या हाती आली. त्याने रद्दीच्या भावात ती खरेदी केली व ती त्याने लॉचनेर यांना दाखविली. २१ जानेवारी १९४२ रोजी लिहिलेले पान हे या दैनंदिनीचे पहिले पान होय. मूळ दैनंदिनी संपूर्ण असावी व बाकीची पाने नष्ट झाली असावीत. लॉचनेर याने दैनंदिनीतील हकीकती निरखून पारखून घेतल्या व ही गोबेल्सची दैनंदिनी आहे, अशी खात्री पटल्यावर ही दैनंदिनी ३०–३५ पृष्ठांच्या प्रदीर्घ प्रस्तावनेसह ठिकठिकाणी टीपा देऊन त्याने प्रसिद्ध केली. नॉर्वेजियन, स्पॅनिश, इटालियन, फ्रेंच, पोर्तुगीज व इंग्लिश अशा सर्व भाषांतून ती प्रसिद्ध झालेली आहे.

या दैनंदिनीत आठ ठिकाणी सुभाषचंद्रांचा गोबेल्स उल्लेख करतो. १ मार्च १९४२ या दिवशीच्या मजकुरात गोबेल्स लिहितो–



सुभाषचंद्र :
फासाची दोरी ! विमान अपघात ! का शौलीमार आश्रम ?

" भारतातील परिस्थिती बिकट होत आहे. भारतीय पुढारी श्री. बोस यांच्याकरवी आम्ही इंग्लंडविरुद्ध युद्धाची घोषणा करणारा जाहीरनामा काढविला आहे. जर्मन वृत्तपत्रांतून तो ठळकपणे लवकरच प्रसिद्ध होईल. भारतीय जनतेच्या वतीने आमची लढाई लवकरच अधिकृतरीत्या सुरू होईल. "

डॉ. गोबेल्सच्या या मजकुरावर लॉचनेरने टीप दिली आहे. ती अशी–

" Subhas Chandra Bose was head of the 'Zentrale treies Indien '–[ Central Bureau for a free India. ] which had its Berlin office at No. 2 Lichtenstien Allee. With Pandit K. A. Bhatta as editor, he brought out a monthly magazine 'Azad Hind' with Nazi money. It was published with the English text on the right side & the German on the left. Later he left for Japan & according to reports, was seized there by the Americans, tried & executed for treason. "

[ सुभाषचंद्र बोस हे स्वतंत्र भारतासाठी प्रयत्न करणाऱ्या ब्युरोचे प्रमुख होते. या संस्थेची बर्लिन येथील कचेरी २·]

लिकोन्स्टिन ॲली या ठिकाणी होती. पंडित के. ए. भट यांच्या संपादनाखाली, ते 'आझाद हिंद' या नावाचे एक मासिक, नाझी पैशाच्या मदतीने चालवीत असत. या मासिकात उजव्या पृष्ठावर इंग्रजी मजकूर व डाव्या पृष्ठावर त्याचे जर्मन भाषांतर असे. काही दिवसांनंतर बोस जपानला गेले व तेथील अहवालानुसार, अमेरिकन सरकारने त्यांना पकडले, त्यांची चौकशी केली व त्यांना शत्रूचे हस्तक म्हणून फासावर लटकवले. ]

१९४८ साली गोबेल्सची दैनंदिनी प्रथम काही भाषांत प्रसिद्ध झाली. त्या वेळेस लॉचनेर यांनी दिलेली ही टीप आहे. सुभाषचंद्र विमान अपघातात ठार झाल्याची अफवा, त्या वेळी ताजी घटना होती. या घटनेकडे दुर्लक्ष करून लॉचनेर ज्या अर्थी "अहवालावरून अमेरिकन सरकारने फाशी दिले," असे सांगतो त्या अर्थी त्यात काही तथ्य असण्याची शक्यता आहे. हिटलर लढाई लढत होता. डॉ. गोबेल्स हाच जर्मन राज्ययंत्र जवळजवळ चालवीत होता. अशा महत्त्वाच्या व्यक्तीची दैनंदिनी संपादित करणाऱ्या लॉचनेरसारख्या अमेरिकन लेखकाने केलेले विधान, अगदीच बिनबुडाचे कसे म्हणावे ?

जर खरोखर सुभाषचंद्रांना फाशी दिले, ही गोष्ट अमेरिकन सरकारच्या दप्तरी नमूद असेल, – कारण त्यांची चौकशी होऊन नंतर त्यांना फाशी दिले असे लॉचनेर म्हणतो– तर ही गोष्ट अमेरिकेने त्वरित जाहीर करावी. प्रती षण्मासी सुभाषचंद्र जिवंत असल्याची आवई ऐकण्यापेक्षा हे सत्याचे ज्ञान कमी दुःखदायक आहे. शिवाय अमेरिकन गव्हाचे आम्ही ओशाळे असताना याबाबत आमच्याकडून संतापाची वगैरे काही तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होण्याची सध्या मुळीच शक्यता नाही, याचीही अमेरिकेने खात्री बाळगावी !

# विचार धारा

समीर

## □ जनशक्तीचा वापर

" हिंदुस्थानची अफाट जनशक्ती (' मॅन पावर ') देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी वापरात आणायची असेल तर लोकांना अधिक प्रोत्साहन मिळाले पाहिजे," असे मत युनोत काम करणारे एक जपानी अर्थशास्त्रज्ञ डॉ. हिरोशी किटामुरा यांनी परवा दिल्लीत बोलताना प्रकट केले. ' इकाफे ' या युनो-संस्थेच्या अधिवेशनात भाग घेण्यासाठी ते दिल्लीला आले होते. किटामुरा म्हणाले, " कुठल्याही देशाची घडी एकदम बसवणे सरकारला शक्य नसते हे खरे आहे, पण जनतेला ध्येयप्रवण करणे हे आवश्यक आहे व शक्यही आहे.

जनशक्तीचा योग्य वापर करणे, ही गोष्ट आशियाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे व ती मुख्यत: शिक्षणावर अवलंबून आहे. आशियातल्या शिक्षणपद्धती त्या त्या देशाच्या खास गरजांवर आधारलेल्या नाहीत. उदाहरणार्थ, हिंदुस्थानात एकीकडे सुशिक्षित लोक वाजवीपेक्षा जास्त आहेत, तर दुसरीकडे तांत्रिक शिक्षण घेतलेल्या मंडळींची वाण आहे. या परिस्थितीवर उपाय म्हणजे दुय्यम (सेकंडरी) शिक्षणात तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाला अधिक स्थान मिळाले पाहिजे. उच्च शिक्षणातही वाङमयावर जो विशेष भर आहे, त्याऐवजी शिक्षणक्रमाची अधिक तर्कशुद्ध व शास्त्रीय मांडणी झाली पाहिजे. "

जनशक्ती कामाला लावायचा दुसरा हमखास उपाय म्हणजे लोकांना काम करायला उत्साह वाटेल अशी परिस्थिती निर्माण करणे. हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला कर्जाऊ स्वरूपात अधिक सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या पाहिजेत. हिंदुस्थानातली पैदास दर एकरी जेवढी हवी त्यापेक्षा फक्त एक-चतुर्थांश आहे.

आशियातल्या देशांनी शेतीला अधिक महत्त्व द्यावे की औद्योगीकरणाला ? शास्त्रशुद्ध शेतीच्या आधारावरच औद्योगिक प्रगतीची उभारणी करता येते. पण दोन्ही समस्यांना एकाच वेळी तोंड दिले पाहिजे. मोठ्या उद्योगधंद्यांवर भर देण्याचे भारतीय धोरण बव्हंशी बरोबर आहे. ते का सफळ झाले नाही, हा एक फार मोठा प्रश्न आहे. " हिंदुस्थानात प्रचंड बांध बांधण्यात आले आहेत. पण पाणी-पुरवठा योजनेसारख्या साहाय्यक सोयींकडे मात्र जवळ जवळ मुळीच लक्ष पुरविण्यात आलेले नाही.

आशियाई आणि अतिपूर्वेकडील देशांचे व्यापार-विषयक आंतरराष्ट्रीय धोरण हा किटामुरा यांचा आणखी एक अभ्यासाचा विषय. त्यांच्या मते या देशांना आपल्या निर्यात व्यापाराने जेवढे उत्पन्न होते, त्याच्या एक-तृतीयांश भागाएवढी त्यांची व्यापारी तूट मोठी आहे. कच्च्या मालावर असणारा भर तयार मालावर देऊन निर्यात व्यापार वाढविणे—देशातील खप कमी करणे आणि जकातविषयक धोरणात बदल करणे असल्या मार्गांनी भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविता येईल.

## ☐ सहकार-संजीवनी

"सहकारी शेतीला पोषक असे वातावरण दक्षिण आशियात कोरिया, फिलिपाईन्से इत्यादी देशांपेक्षा हिंदुस्थानात खूप अधिक आहे; कारण येथल्या ग्रामीण जनतेत जी सहकाराची परंपरा आहे ती इतर देशांत नाही, " असे उद्गार इस्रायलमधील सहकारी संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा. एरिन ड्राब्किन यांनी नुकतेच दिल्लीत काढले. त्यांच्या मते हिंदुस्थानातल्या सहकारी चळवळीच्या मार्गात सर्वांत मोठी अडचण आहे, ती म्हणजे येथील ग्रामीण जनता संघटित् करणे. अर्थात् शेतकऱ्याचे आपल्या जमिनीवरचे प्रेम, असल्या इतर अडचणीही आहेतच. शिवाय काही शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी एकत्र केल्यातरी तेवढयाने काम भागत नाही. मोठ्या प्रमाणावर शेती करण्यासाठी कुठली नवीन यंत्रे वापरली पाहिजेत, हे त्यांना ठाऊक असेल तरच त्यांना जमिनी एकत्र करण्याचा चांगला लाभ मिळू शकेल.

सहकारी शेते चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या व्यवस्थापकांचा अभाव ही एक फार मोठी अडचण आहे. म्हणून असे व्यवस्थापक तयार करण्यासाठी एक खास शिक्षणसंस्था स्थापन करण्यात आली पाहिजे. विश्वविद्यालय आणि शेती यांची खूपच अधिक जवळची सांगड घालण्यात आली पाहिजे. असे केल्याने सुशिक्षित बेकारी कमी होण्यासही मदत होईल. अर्थात् पदवीधर मंडळींना खेडेगावात जाऊन काम करण्यासाठी प्रवृत्त करणे सोपे नाही.

इस्रायलमधील 'किबुट्झ' हे सहकारी शेतीचे जगातले सर्वांत अधिक यशस्वी उदाहरण आहे. 'किबुट्झ' मध्ये प्रत्येक कामगार समाजासाठी किती झटतो, यावर त्याची सामाजिक प्रतिष्ठा अवलंबून असते. उलट, तेथल्या सर्व अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांबरोबर अंग-मेहनत करावी लागते. अशा समाजव्यवस्थेमुळे सर्वसाधारण 'किबुट्झ' इतर सहकारी शेतापेक्षा अधिक कार्यक्षम असते.

● ● ●



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## ☐ दंडकारण्यातील एक गाढवपणा

फार जुनी गोष्ट आहे. महाराष्ट्रात त्या वेळी दंडकारण्य पसरलेले होते. सगळीकडे प्रचंड वृक्ष, झाडी आणि दाट जाळ्या. अनेक प्रकारच्या नद्या या अरण्यातून वाहत. तेव्हा माणसाची वस्ती झालीच नव्हती. सर्व अरण्यात पशू आणि पक्षी यांचीच काय ती वस्ती. वाघसिंहांपासून शेळी, गाढव, खेचर, माकड, वानर, अस्वले सर्व प्राणी या अरण्यातून सुखाने हिंडत. या अरण्यात मुठा नावाची नदी वाहत होती. जवळच मुळा म्हणून दुसरी नदी होती. दोन्हींचा सुंदर संगम एके ठिकाणी झाला होता. पाणी मुबलक. हवा छान. डोंगरपर्वत जवळ. त्यामुळे सर्व पशुपक्ष्यांचे या भागात विशेष दळणवळण होते. विशेषतः, बुद्धिमान समजले जाणारे प्राणी या ठिकाणी कळप करून राहत. चर्चा करीत आणि स्वतःची उन्नती करून घेत हे शहाण्या लोकांचे ठिकाण आहे असा लौकिक हळूहळू इतका पसरला की गाढवे, खेचरे, माकडे, म्हशी, उंट यांच्यांतली बुद्धिवान मंडळीही या ठिकाणी येऊन राहिली. त्यांनाही येथे राहण्यात भारीच गंमत वाटू लागली. पुढे असे झाले की वाघ, सिंह इ. थोर प्राण्यांचा निर्वंश झाला. त्यांच्यापैकी कोणी राहिले नाही आणि हळूहळू या प्राण्यांचीच संख्या रानांत वाढली.

पुढे या अरण्यात गाढवे आणि माकडे यांचीच संख्या इतकी झाली की, काही विचारू नका. त्यातल्या त्यात गाढवांचा नंबर मोठा. मग माकडांनी नकला कराव्यात आणि गाढवांनी फिदीफिदी हसावे असे सुरू झाले. गाढवांना खूष करण्याची मोहीमच निघाली. माकडे वेड्यावाकड्या उड्या मारण्यात, दात विचकण्यात पटाईत. गाढवांना हसण्यासाठी तेवढे पुरत असे. यामुळे माकडे फारच शेफारली. त्यातही एक हुषार माकड होते ते भलतेच चेकाळले. टणाटण उड्या मारणे आणि वेडेवाकडे अंगविक्षेप करून नाचणे यांत ते बेटे इतके हुषार की गाढवे आपापली पोटे धरधरून हसत. आपल्या खुरांनी टाळ्या वाजवत. त्यामुळे ते माकड जास्तच गंमतीने वागू लागले. कोठे कसे वागावे याचा त्याला काही सुमार राहिला नाही. एकदा ते अरण्यातल्या इलेक्शनला उभे राहिले. आपल्या नाचण्याने ते इतके लोक-

प्रिय झाले होते की ते झकासपैकी निवडूनही आले. नवीन अरण्यपंचायत भरली तेव्हा सगळ्या बुद्धिमान प्राण्यांनी नेहमीप्रमाणे मांडूनमांडून एकमेकांची थोबाडे फोडून घेतलेली होती. इतका गोंधळ उडाला की त्या गडबडीत हे माकड अरण्यपंचापतीचे उपाध्यक्ष म्हणून निवडूनदेखील आले. चष्मा लावून, प्रौढ आणि गंभीर मुद्रेने ते आपला खेळ करून दाखवू लागले.

पुढे असे झाले की, या उड्यांच्या कार्यक्रमांत एकदा त्याने भलतीच कुचाळी केली. अरण्यपंचायतीत एकुलता एक घोडा होता. त्यालाच त्याने बाहेर हाकलले. आता घोडा हा एकटाच असला तरी प्रामाणिक आणि कामसू होता. त्यामुळे (साहजिकच) सर्वांना त्याच्याबद्दल आदर होता. घोडा मुकाट्याने बाहेर पडला तरी त्याच्या खिकाळ्यामुळे सर्व बिथरले. आरडाओरडा झाला. माकडाचा निषेध करण्यात आला. माकडाने आपली बाजू कशी बरोबर आहे ते उड्या मारून सांगितले. पण त्या उड्या मारताना त्याने आणखीनच घोळ घातला. नको त्यांच्या कासोट्यांपर्यंत त्याने उंच उडी मारली. बराच गोंधळ झाला. माकडावर अंडीफेक, दगडफेक झाली. ( तरी ते उंच फांदीवर जाऊन बसले होते. त्यामुळे त्याला विशेष दुखापत वगैरे झाली नाही असे म्हणतात.) अरण्यपंचायतीत निषेधाची जंगी सभा झाली. प्रत्येक प्राण्याने त्या माकडाला अगदी रक्तबंबाळ करून टाकले. जोरदार ठराव झाला. अल्पसंख्य पक्षांतले काही प्राणी म्हणाले की, सुशिक्षित गाढवांनीच या माकडाचे स्तोम माजवले आहे. सुशिक्षित अशा गाढविणीसुद्धा या वानर प्राण्याचे खेळ पाहण्यासाठी जमतात, ही शरमेची गोष्ट आहे. तुमच्या गाढवांच्या वस्तीतूनच हे माकड निवडून आले ही गोष्ट खोटी आहे का ? या आरोपाला दुसऱ्या काही प्राण्यांनी उत्तरे दिली. मग त्यानंतर---

तात्पर्य : प्रिय वाचक, या गोष्टीला अंत नाही. हे असेच जगाच्या अंतापर्यंत चालू राहायचे. कारण गाढवे आणि गाढविणी जोपर्यंत आपला गाढवपणा सोडायला तयार नाहीत तोपर्यंत माकडाला आपल्या माकडचेष्टा ह्या कराव्याशा वाटणारच. नाही का ?

## □ जे पिंडी तेच ब्रह्मांडी

' जे पिंडी तेच ब्रह्मांडी ' असा एक न्याय वेदांतात आहे. म्हणजे एका माणसाच्या बाबतीत जे सत्य अनुभवाला येते तेच अखिल विश्वाच्या बाबतीतही येते असे म्हणतात. (यापेक्षा जास्ती मला माहीत नाही. तेव्हा मुद्याकडे वळतो.) हा वेदान्त आठवण्याचे कारण नगरला घडलेली एक घटना. तेथील घुमरे गल्लीत एका अंत्ययात्रेची तयारी चालू होती. मृतदेहासाठी भाताचे तीन पिंड बाहेर ठेवले होते. रस्त्याने जाणाऱ्या एका बाईने ते पाहिले. तिच्या तोंडाला पाणी सुटले. तिने

एकदम त्यावर झडप टाकली. एक पिंड तोंडात कोंबला आणि बकाबका खाल्ला. बाकीचे दोन हातात घेऊन पलायन केले.

वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली ही बातमी वाचून मला खरोखरीच समाधान वाटले. भारतात यंदा तांदळाची टंचाई आहे हे सरकार किती दिवसांपासून आपल्या कानीकपाळी ओरडून सांगत आहे. पण आपण लोक भारी संशयखोर. आपल्याला सारखे वाटत असते की हे मुळीच खरे नाही. देशांत तांदूळ भरपूर आहे. आंध्रात तांदूळ आहे, गुजराथेत शेंगदाणा आहे. आणि पंजावात गहूही आहे. फक्त महाराष्ट्राला तो मिळत नाही इतकेच. देशात अन्नधान्याचे खरोखरीच दुर्भिक्ष्य असताना आपणच याबाबत साशंक असावे हे खरे नाही. अशाने परदेशची मदत आपल्याला कशी मिळेल? नगरचे हे वृत्त वाचून तरी आपण हा धडा घेऊ आणि सरकारवर विश्वास ठेवू. सरकारनेही याचा योग्य उपयोग करून घ्यावा. ही बातमी ठळकपणे सगळीकडे प्रसिद्ध करून टाकावी. म्हणजे अन्नधान्याची खरो-खरचीच टंचाई आहे, हे सगळ्यांना पटल्याशिवाय राहणार नाही.

नगरला ज्या बाईने हा उद्योग केला ती भारताच्या सुशिक्षित नागरिकांपैकी असली पाहिजे असे बातमी वाचल्यावर माझे मत झाले. भात वाया घालवू नये हा मंत्र तिला ठाऊक असलाच पाहिजे. (या पार्श्वभूमीवर अनेक मंत्र्यांची, पुढाऱ्यांची पुढे आलेली पोटे पाहिली म्हणजे तांदळाचा किती दुरुपयोग होत असतो हे आपल्या ध्यानात येते.) पण ही बाई तशी नाही! मेलेल्या माणसासाठी पिंड म्हणजे भाताची फुकट नासधूस नाही का? मेलेल्या माणसाला भात कशाला पाहिजे हो? भात काय बरोबर घेऊन तो लेकाचा स्वर्गाला (किंवा नरकाला) जातो? उगीच फाजीलपणा! मग ही नासधूस होऊ नये म्हणून त्या थोर बाईने त्याचा सदुपयोग केला तर बिघडले कोठे? मी तर म्हणतो, सरकारने या प्रसंगाचा फोटो घेऊन जाहिरातीसारखा त्याचा उपयोग केला पाहिजे. पिंड घेऊन पळणाऱ्या बाईचे चित्र आणि त्याच्याखाली 'हा खरा तांदळाचा सदुपयोग' असे एखादे वाक्य छापले तर त्याचा केवढा परिणाम होईल बरे! झाले ते झाले. पण आता सरकारने या निमित्ताने एखादा फतवा काढावा. जनतेला तांदळाबद्दल आणखी काही आदेश द्यावेत, 'भाताची व्यर्थ नासधूस टाळा' असे शीर्षक देऊन त्यात पुढील सूचना कराव्यात—

(ज्याअर्थी...त्याअर्थी, सरकारी अधिनियम क्र. ... पोटनियम क्र. ... इ. मनोहर शब्दरचना अर्थातच त्यात असावीच.)

(१) मृत माणसाने कोणत्याही प्रकारे भाताचा पिंड खाण्यास सक्त मनाई आहे. पिंड हवाच असल्यास तो मका किंवा अमेरिकन गहू यांचाच यापुढे बनविण्यात यावा. निदान सोमवारी मेलेल्या माणसाला तरी भाताचा पिंड देण्यात येऊ नये.

(२) असे पिंड वाया घालविण्यापेक्षा कुणी एखाद्या गरजू माणसाने उचलल्यास

त्यास मृताची हरकत नसावी. उलट, अशा थोर पुरुषास अन्नधान्याच्या सदुपयोगाबद्दल शिफारसपत्र देण्यात यावे.

(३) हे असे पिंड ताबडतोब गिळंकृत करून कावळ्यासारखे पक्षी सरकारशी सहकार्य करीत असतात ही उत्तम गोष्ट आहे. मका, अमेरिकन गहू यांचे पदार्थही त्यांनी तितक्याच प्रेमाने पळवून धार्मिक कृत्य आणि देशाची परिस्थिती यांची योग्य सांगड घालावी. असे त्यांनी न केल्यास रेशनिंगच्या अन्नाचे खरकटे खाण्याची शिक्षा त्यांना देण्यात येईल.

(४) अन्नाचा असा कोणी सदुपयोग केल्याचे आढळात आल्यास सरकारात त्याची ताबडतोब वर्दी देण्यात यावी. म्हणजे त्या माणसाचे रेशन तेवढ्यापुरते कमी करण्यात येईल.

एरवीच्या रोजच्या धकाधकीत देशाच्या परिस्थितीचा विचार करायला हल्ली मला सवडच होत नाही. ही बातमी वाचली आणि देशातील अन्नटंचाई एकदम आठवली. मन देशभक्तीपर विचारांनी कसे भरून गेले. त्या धांदलीत जे विचार आणि कल्पना मनात आल्या त्या आपल्या सांगितल्या. हो, नियोजन समितीतल्या लोकांना किंवा मंत्र्यांनाच चांगल्या चांगल्या कल्पना सुचतात असे थोडेच आहे! माझ्यासारख्या सामान्य माणसालाही काही वेळेस अशा सुंदर कल्पना सुचतात म्हटलं! मुद्दाम दिल्या आहेत. सरकारला आजच्या परिस्थितीत त्यांचा उपयोग झाला तर मला आनंदच होईल.

'आराम हराम है' ही घोषणा नेहरूंनी रूढ केली. 'जयजवान, जय किसान' हा शास्त्रीजींचा मंत्र. त्याच चालीवर मलाही या निमित्ताने एक संदेश जनतेला द्यावासा फार वाटतो. आजचे तांदळाचे दुर्भिक्ष्य लक्षात घेऊन सरकारने माझा संदेश सगळीकडे फैलावला तर फार बेस्ट काम होईल. 'भारतं प्रथमं वंदे, भातं तदनंतरम्' हाच तो महान् मंत्र.

## □ मरण सोसावे, परि चुंबनदृश्य पाहावे!

सरकारची अलीकडे मला फार कीव येऊ लागली आहे. आपले सरकार इतके बुरसटलेले आणि प्रतिगामी असेल याची मला कल्पना नव्हती. परवा लोकसभेत माहिती खात्याचे मंत्री श्री. राजबहादूर यांनी काय सांगितले माहीत आहे? भारतीय चित्रपटांत चुंबनाचे दृश्य दाखवायला सरकारी बंदी आहे, ती बंदी उठविण्याचा तूर्त तरी आमचा विचार नाही.

हरहर! काय ही आपली अवस्था! जग कोणीकडे आणि आपण कोणीकडे! उघड्या मांड्या, अर्धावृत वक्षस्थळे, पुष्ट नितंब यांचे मनमोकळे प्रदर्शन करून स्त्रीसौंदर्याचा खराखुरा आविष्कार करणारे हॉलीवुडचे अमेरिकन चित्रपट कोणीकडे

आणि साध्या चुंबनाच्या दृश्याचीही वानवा असलेले आपले भारतीय चित्रपट कोणीकडे ! सावरकरांच्याच शब्दांत सांगायचे म्हणजे 'दोन शब्दांत दोन संस्कृती.' एक श्रुतीस्मृतीपुराणोक्त आणि दुसरी 'अद्ययावत्' मॉडर्न, अपटुडेट. अशाने देशाची प्रगती कशी होणार ? चित्रपटसृष्टीचा विकास तरी कसा होणार ? आणि प्रेक्षकांनाही दिव्य आनंदाचा क्षण अनुभवताना (उसना का होईना पण—) साक्षात्कार कसा होणार ? छे: छे: ! हे असे व्हायला नको होते. उघडया मांडया, अर्धावृत वक्षस्थळे, पुष्ट नितंब हे तूर्त बाजूला ठेवा. पण साध्या, गोड चुंबनाचा देखावा दाखवायला काही बिघडते का ? घेणारे घेतात, पाहणारे पाहतात. मग सरकारच्याच पोटात एवढे का बरे दुखावे ?

वास्तविक, चुंबनाची लज्जत किती अवीट असते हे काय वर्णन करून सांगायला पाहिजे ? शृंगारात चुंबनाचे स्थान किती महत्त्वाचे ! आपल्या भारतीय संस्कृतीतदेखील चुंबन कितीतरी वेळा येऊन गेले आहे. जुने संस्कृत वाङमय पाहा. त्यातही पुढची रोमांचकारक वर्णने आढळतील की नाही ? जुने शिल्प—तेही देवळावरचे पाहा. आपली दृष्टी एकदम खाली भूमीकडेच जाईल इतके अप्रतिम शिल्प. मग चुंबन काय, अगदीच मामुली गोष्ट. संस्कृत सोडा. बोलूनचालून देवांचीच भाषा ती. पण प्राकृतात तरी किती गंमत भरली आहे, याचा शोध घेतलात कधी ? रामजोशीबाबांनी छेकापन्हुती लिहिताना 'गुणवंत अति लोळत कुचावरी शोभला' असा पांचटपणा करून शेवटी 'अगे, तो हार !' असे उत्तर देऊन काय रंग भरला ! लावण्या तर बोलूच नका. 'तिकडून आला सखा, त्यानं घेतला मुका' ही लावणीची ओळ कोणत्या रसिक पुरुषाला आठवणार नाही ? मी म्हणतो, लावणीकारांचेही सोडा. बोलून चालून वात्रट माणसेच ती. पण मोठमोठ्या उच्चभ्रू साहित्यिकांनीही चुंबनाची अवीट गोडी किती खुबीने सांगितली आहे. "सुंदर चेहऱ्याचा मुका कुणाला आवडणार नाही ? हे 'मूकनायक' नाटकातले नायिकेचे वाक्य कोणाच्या मनाला गुदगुल्या करीत नाही ? " मरण सोसावे परि पहिले चुंबन घ्यावे" असे गडकरी नावाचे थोर कवी मरण्यापूर्वी सांगून गेले, 'चुंबाचुंबी' हा शब्द राजकारणातदेखील आपण किती सहजपणाने वापरतो ! राजकारण्यांनी, साहित्यिकांनी गौरविलेल्या चुंबनास चित्रपटात मात्र मनाई असावी अं ?

इंग्रजी चित्रपट पाहताना आपल्याला मजा वाटते ती कशामुळे ? अर्धवस्त्रांनी फिरणाऱ्या सुंदरींचे कळप, त्यांचे मोहक, हजारो डॉलर किंमतीचे हास्य, त्यांचे मंत्रमुग्ध करणारे शरीरसौष्ठव हे पाहण्यासाठीच तुम्ही आम्ही जातो की नाही ? लाजण्याचे कारण नाही. खरे बोलायला माणसाने लाजू नये. माझ्यासारखा अडाणी माणूस तर केवळ हीच गंमत पाहायला जातो. हिंदी चित्रपटांनी अशा पाश्चात्य चित्रपटांचे थोर अनुकरण केले, तेव्हापासून ते तसे उत्तम चालत आहेत. पण आपली विचित्र भारतीय संस्कृती आड येते. नाहीतर ते याहीपेक्षा धडाक्याने चालतील.

आपल्या चित्रपटांत इतर सर्व महत्त्वाच्या गोष्टी आहेत. नाच, गाणी, रडारड, अपघात, योगायोग, आलिंगन, मिठी हा मसाला आहेच. तो उत्तमच आहे. पण अजून त्यात चुंबन नाही. शृंगाररसाच्या दृश्यांत नायक नायिकेचे चुंबन घेतो असे आपल्याला पाहायला मिळाले तर किती मज्जा होईल की नाही ? ( स्टंट चित्रपटांत नायिका नायकाचे चुंबन घेते असे दाखवल्यास चालेल ! ) मी तर पाचसात वेळा तो शिनेमा पाहीन हे आत्ताच सांगून ठेवतो.

सेन्सॉर बोर्डाच्या चावटपणामुळे आपल्या हिंदी चित्रपटांच्या निर्मात्यांची स्थिती किती केविलवाणी झालेली आहे हे कोणाच्या कसे लक्षात येत नाही ? तुमची आमची करमणूक व्हावी म्हणून बिचारे लाखो रुपये खर्च करतात. शृंगाराचेही सीन घालतात. पण जास्त कौशल्य दाखवायला त्यांना वावच नसतो. मागे कृष्णराव मराठे नावाचे गृहस्थ सेन्सॉर बोर्डावर होते. त्यांनी तर म्हणे नायक आणि नायिका यांच्यांत किती फूट अंतर असावे याचा एक आराखडाच तयार केला होता. काय हे ! नायक आणि नायिका यांच्यांत तुम्ही जितके अंतर दाखवाल तितके निर्माते आणि तुम्ही आम्ही रसिक प्रेक्षक यांच्यातील अंतर वाढत जाते कसे या शहाण्यांना कळत नाही ? याउलट, नायक-नायिका यांच्यांत काही अंतरच राहिले नाही तर प्रेक्षकांचा खिसा आणि निर्मात्याचा गल्ला यांतही काही अंतर उरत नाही. असे हे कोष्टक आहे. आमच्या हिंदी निर्मातांना ते बरोबर ठाऊक आहे. पण सरकारच्या हट्टापुढे त्यांचे बिचाऱ्यांचे काही चालत नाही हो. मग नुसते चोरटे आवाज, सूचक संभाषण, नुसते तोंड हुंगणे, असले काही थातुरमातुर करून त्यांना वेळ मारून न्यावी लागते. कुठल्या चित्रपटात ते मला आता आठवत नाही. पण नायक नायिकेच्या आरशांत पडलेला प्रतिबिंबाचे चुंबन घेतो असे दाखवले होते. काय करतील ते बिचारे, प्रतिबिंबाचे तर प्रतिबिंबाचे. दुधाची तहान ताकावर भागवावयाची झाले !

सरकारने हा हट्ट आणि बुरसटलेली विचारसरणी अजून तरी सोडावी. चित्रपटात चुंबन घ्यायची परवानगी द्यावी. ( "चुंबन द्यायचे नाही, फक्त परवानगी. ते घेणारे घेतील. तुम्ही नुसते हो म्हणा की !" – लोकसभेत कुणी तरी हे आर्ग्युमेंट करील काय ? ) मग पाहा काय गंमत होते ती, नुसती झिम्मड उडेल थेटरवर झिम्मड. चित्रपटसृष्टीची सध्याची हलाखी संपेल. अनुभवी, शिकाऊ मंडळींना आपले कोठे चुकत होते ते कळेल, हे. एकूण झाला तर फायदाच होईल.

— ग्यानबा

● ● ●

नेहरू संस्मरण

# □ पंडितजींची पदयात्रा

१९५९ सालातली गोष्ट आहे. भारत सेवक समाजाचे शंभर पदयात्रींचे एक पथक श्री. चंद्रभान शर्मा यांच्या नेतृत्वाखाली पंडीतजींचा आशीर्वाद घेण्यासाठी म्हणून त्यांच्या निवासस्थानी आले होते. ते पदयात्री पथक वीस दिवसांत ३३० मैलांचा पायी प्रवास करून भारत सेवक समाजाच्या राजस्थान येथील भीलवाडा येथे भर–णाऱ्या अधिवेशनाला हजर राहणार होते.

प्रथमपासूनच पंडितजींना भारत सेवक समाज या संस्थेविषयी आस्था होती. कार्य–बाहुल्यामुळेच पंडितजींना या संस्थेच्या कार्यात लक्ष घालता येत नव्हते किंवा त्यांनी आरंभिलेल्या कार्यासाठी आपला वेळ देता येत नव्हता.

पंडितजींना या पदयात्रींचा जथा भेटताच त्यांनी आपली इच्छा व्यक्त केली, "मलाही वाटतं की तुमच्यात सामील व्हावं. तुमच्याबरोबर थोडी पदयात्रा करावी. परंतु तुमच्याप्रमाणे इच्छेला येईल त्याप्रमाणे हिंडण्याफिरण्यास मी तुमच्यासारखा स्वतंत्र नाही, मोकळा नाही. सुरक्षा पोलिसांचा रात्रंदिवस माझ्या भोवताली जणू गराडाच असतो त्यांच्या या कैदेतून माझी सुटका नाही!"

परंतु तरीदेखील भावनावेगात नेहरू स्वतःच्या व पदयात्रींच्या समाधानासाठी व पदयात्रेचे उद्घाटन करण्यासाठी त्यांच्याबरोबर चार पावले चालत निघाले.

नेहरूंच्याबरोबर असलेल्या पोलिस सुरक्षा दलाला आता काय करावे म्हणून मोठी चिंताच पडली. पंडितजी त्या पदयात्रींच्या जथ्यासमवेत पायी चालतच निघाले. त्यांनी अडविण्याचे धाडस कोण करणार? सुरक्षा पोलिस दलाच्या अधिकाऱ्याला मोठी काळजी लागली. पंडितजी त्या पदयात्रींच्या समवेत हर्षोत्फुल्ल मनाने पायी चाललेच होते. शेवटी विलिंग्डन रोडच्या नाक्यापर्यंत पदयात्रींचा मेळावा आला. पंडितजी त्यांच्याबरोबर पुढे निघालेच होते. शेवटी धीर करून सुरक्षा दलाच्या प्रमुखाने थोडे पुढे होऊन म्हटले, "पंडितजी, आजच्या आपल्या कार्यक्रमांत पदयात्रेचा समावेश नाही." पंडितजी सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्याच्या प्रश्नाने भानावर आले. एकदम थांबले व हसून म्हणाले-- "हा घ्या माझ्या कैदेचा पुरावा."

पंडितजी तिथेच थांबले व त्यांनी पदयात्रींच्या नेत्याला सहज विचारले– "एका दिवसात किती मैल पदयात्रा करणार आहात?"

"अकरा मैल," नेता उत्तरला.

"आणि समजा, बरोबर अकराव्या मैलावर जंगल लागलं तर? तुम्ही ठरविल्या–प्रमाणे तिथेच का आपला मुक्काम ठोकणार आहात?" पंडितजींनी शंका प्रदर्शित केली.

"तसं काही नाही. पाऊस किंवा इतर काही अडथळा न आल्यास साधारणत: दिवसाला अकरा मैल प्रवास करण्याचा आमचा बेत आहे. समजा, आम्ही ठरविल्याप्रमाणे दिवसा अकरा मैलाचा प्रवास न झाल्यास तो रात्री पुरा करावा लागेल."

पदयात्रींच्या हातांत असलेले झेंडे व फलकावर लिहिलेल्या घोषवाक्यांवर पंडितजींची नजर गेली. ते पाहून वे स्वत:शीच काहीसे हसले व म्हणाले, "अरे वा ! तुमची ही पदयात्रा म्हणजे चालते बोलते छोटेसे प्रदर्शनच. तुम्ही तुमच्याबरोबर सारं काही घेतले आहे. मग तर तुमची ही पदयात्रा चांगलीच रंगणार ! गाजणार ! बराच गाजावाजा होणार! म्हणजे हे झालं डबल प्रदर्शन."

भारत सेवक समाजाच्या खास आमंत्रणावरून पंडितजी राजस्थानमधील भीलवाडा येथील अधिवेशनाला हजर होते. पंडितजी मंचकावर येत आहेत असे पाहून एक साधू पंडितजींना मुद्दामच ऐकू जाईल अशा जोरजोरात भारतात प्राचीन युग आणण्यासंबंधात शिरा ताणून ओरडत होता.

यावर पंडितजींना संधी मिळताच ते उत्तरदाखल म्हणाले, "नुकतेच एका साधुमहाशयांनी भारतात प्राचीन युग आणण्यासंबंधात आपले विचार प्रकट केले. परंतु साधुमहाशयांच्या म्हणण्याप्रमाणे ते कसे बरे शक्य आहे ? भारत आज प्रगतीच्या रोखाने घोडदौड करीत आहे. त्याला मी पाच हजार वर्षे मागे खेचून कसे बरे आणू? भारतात आज साधनसंपत्ती वाढत आहे. ही करोडोंची साधनसंपत्ती कुठे बरे टाकून देऊ ? आज भारतात बैलगाड्यांच्या बरोबरीने आगगाडी, मोटारगाड्या ‍ैडत आहेत. त्यांना मी कसं बरं रोखू ?"

भारतसेवक समाजाच्या याच अधिवेशनाच्या वेळी संस्थेने आरंभिलेल्या व पूर्ण केलेल्या कार्याची आकडेवारीनिशी लंबीचौडी यादीही सभेला सादर करण्यात आली. परंतु अधिवेशनाला हजर असलेले पंडितजी ती आकडेवारी मख्खपणे नुसते ऐकतच होते. पंडितजी यावर आपले मत प्रकट करतील अशी संस्थेच्या चालकांची अपेक्षा होती. परंतु तसे काहीच घडले नाही.

पंडितजींना 'कल्चर' चे खासकरून आकर्षण असते अशी संस्थेच्या चालकांनी समजूत करून घेतली होती. चर्चेच्या वेळी बैठकीत बसलेल्या एका सज्जन गृहस्थाने आपले हळूच तोंड उघडले व म्हटले, "आमच्या संस्थेतर्फे रात्रीच्या वेळी 'कल्चरल प्रोग्रॅम' आम्ही खासकरून कामगारांच्यासाठी सादर करीत असतो."

यावर पंडितजी झटकन मागे मान वळवून म्हणाले, "थकून भागून रात्रीच्या वेळी झोपेसाठी आतूर झालेल्या कामगारांना 'कल्चरल प्रोग्रॅम' तुम्ही जबरदस्तीनेच पाजत असणार ! ते खुशीने काही 'कल्चरल प्रोग्रॅम' ऐकत नसतील ! ते स्वीकारणारही नाहीत म्हणा !" असे म्हणून पंडितजीच खुद्द जोरजोराने हसू लागले व इतरही त्यांच्या हसण्यात सामील झाले.

— प्रेषक : प्रभाकर चेंदवणकर

# एकटा....

सौ. स्नेहलता दसनूरकर

धावत्या गाडीच्या खिडकीतून प्रकाश बाहेर पाहत होता. चांगले फटफटीत उजाडले होते. गाडी अशी तुफान वेगाने धावत होती; कुणाची तरी खोडी काढून मग धूम पळणाऱ्या मुलासारखी. मागे वळूनसुद्धा पाहायचं नसतं मग. अगदी सुरक्षित जागी जाऊनच थांबायचं. तशीच जीव घेऊन पळतेय गाडी.

एक स्टेशन आलं. तेव्हा प्रकाशबरोबर असलेले नानासाहेब म्हणाले, " चला प्रकाशभाऊ, खाली उतरू या. काही तरी खाऊ पिऊ या. "

खाली उतरल्यावर प्रकाश म्हणाला, " मी फक्त कॉफी पिईन. बाकी नको मला काही ! "

" का रे ? "

" घरीच खाईन एकदम ! घरी जाईन ना तेव्हा आमची ब्रेकफास्टची वेळ झालेलीच असेल. मग बाबा खायला लावतील जबरदस्तीने. पोटात जागा ठेवली पाहिजे ना ! " आणि नानासाहेबांकडे पाहून तो प्रसन्नपणाने हसला.

" अरे, म्हणून काय झालं ? काल संध्याकाळी सात वाजता जेवलेला तू. बारा तास झाले की ! "

नानासाहेबांनी त्याला एक केक कॉफीशी खायला लावलीच.

आता एकच स्टेशन. मग पुढच्या स्टेशनवर उतरायचंच. डब्यात आल्यावर प्रकाशने सुटकेस उघडून सोपकेस, कंगवा आणि टॉवेल घेतला. आणि तो डब्यातल्या लॅट्रिनमध्ये गेला. तोंडावर साबणाचा फेस चोळीत असताना तो मनाशी म्हणत



अन् हे काय ?
बाबांच्या कोटात हे बिल कसलं?
लेडीज हँडकर....
प्रकाश काय ते उमगला

होता, "खूप ताजंतवानं दिसायला हवं. नाही तर काय व्हायचं, तोंड उतरलेलं असायचं झोप अपुरी झाली आहे. म्हणून आणि बाबांना वाटायचं, सुटीच अंगी लागली नाही ह्याच्या !"

खरं म्हणजे फर्स्ट क्लासमधून प्रवास केलेला आहे. तिथे जागा मिळवण्यासाठी काय धावपळ, रेटारेटी, अवघडत उभ्या उभ्या पेंगणं असा त्रास थोडाच झालाय. पण प्रकाशने रात्रीचा प्रवास कधीच केलेला नाही. त्याला हा अनुभव घ्यायचा होता. म्हणून अनायासे हे नानासाहेब सोबतीला आहेत तर त्याने रात्रीच्या प्रवासाची संधी घेतली. रात्री अकरा वाजेपर्यंत तो जागा राहिला होता. आणि सकाळी आपोआपच सहा वाजता जागा झाला होता. नेहमीच्या मानाने ही झोप अपुरीच.

आरशात स्वतःचं तोंड पाहता पाहता त्याच्या मनात आलं, "बाबांनी मला पाहिलं त्याला आता दोन महिने होत आले. खूप सुधारलेली दिसेल माझी तब्येत त्यांना." आजोळी पाठवताना त्याच्या पाठीवर थाप मारून बाबा म्हणाले होते, "खूप चैन करायची हं पका. आता तीन महिने फक्त खाना, पीना, सोना, मजा करना ! गाल गुबगुबीत झाले पाहिजेत. एस्. एस्. सी. च्या अभ्यासामुळे उतरलेली तब्येत पुन्हा ठिकाणी आली पाहिजे हं. म्हणूनच तुला आजोळी पाठवतो आहे मी !"

हे खरं आहे. मात्र एस. एस. सी. चा अभ्यास भलताच केला आहे प्रकाशनं म्हणजे काय आहे; आपल्याला काही कमी नसेल, स्कॉलरशिप वगैरेवाचून आपलं काही अडणार नसलं तरी अभ्यास करायला हवाच. एक तर ही परीक्षा जादुगारीण असते. कधी कधी शहाण्याला वेड्यात काढते. भल्या भल्या जीव तोडून अभ्यास करणारांना खट्‌दिशी नापासच करून टाकते. आपण आपलं सावध असावं ते बरं. शिवाय चांगल्या कॉलेजात प्रवेश मिळवायचा तर मार्क भरपूर असावे लागतात. आणि भरपूर मार्क मिळाले तर आपला रुबाब वाढतो तो वेगळाच. म्हणून प्रकाशने खरे म्हणजे दहावीपासूनच अभ्यासात मन घातलं होतं. अकरावीत तर तो भलताच गंभीरपणे अभ्यास करीत होता. खेळ बिळ सारं पार बंद !

म्हणून तर परीक्षेनंतरच्या दुसऱ्या दिवशीच बाबांनी त्याला आजोळी जाणं भाग पाडलं होतं. त्याची मुळीच इच्छा नव्हती. हा घरात नसला म्हणजे बाबांना एकटं एकटं वाटणार की नाही ? नाही म्हटलं तरी बाबांच्या सकाळच्या चहाच्या वेळी आणि दोन्ही वेळच्या जेवणाच्या वेळी तर तो बाबांच्या जवळच असतो. पुन्हा सुटीच्या दिवशी दुपारचे चार तास तो त्यांच्या अवतीभोवती राहतो. त्यांना कॅरम खेळणं भाग पाडतो. आणखी एक आहे. रात्री जर बाबांना कोणी " आता उठा बघू त्या खुर्चीवरून. दहा वाजले. निजा आता," असं मागे लागलं नाही, तर बाबा खुश्शाल फाइली बघत नि कधी कधी काही तरी टाईप करीत अवेळपर्यंत जागे राहतात.

हा प्रकाशचा गेल्या वर्षीचा शोध आहे. त्यापूर्वी तो संध्याकाळी सप्पाटून खेळायचा. घरी आलं, जेवलं, की झोपलं. जेवता जेवताच झोप त्याच्या डोळ्यांवर रेंगाळत असायची. त्यामुळे रात्री बाबा किती वेळपर्यंत जागे असतात ह्याचा त्याला पत्ताच नसायचा. पण अकरावीत आल्यावर, खेळ बंद झाला. आणि अभ्यासासाठी तो रात्री दहा वाजेपर्यंत जागा राहू लागला. तेव्हा हे त्याच्या लक्षात आलं. पूर्वी प्रकाश नि बाबा एकाच खोलीत झोपत. पण गेल्या वर्षी त्याने अभ्यासाच्याच खोलीत झोपायला सुरुवात केली. त्याच्या नि बाबांच्या खोलीमधलं दार उघडं असायचं. तिथून त्याला टेबलाशी असलेले बाबा दिसायचे. मग तो पडल्या पडल्याच म्हणायचा, "बाबा, दहा वाजले. आता तुम्ही निजता की मीच उठू नि पुन्हा अभ्यासाला लागू ? "

" झालं बेटा. हे एवढं पंधरा मिनिटांत संपेल. तू झोप." पण प्रकाश पंधरा मिनिटं मुद्दाम जागा राहायचा आणि नेमका पंधरा मिनिटांनी म्हणायचा, "बाबा, संपली ती पंधरा मिनिटं केव्हाच ! " मग मात्र बाबा हसतच खुर्ची मागे ढकलून उठायचे.

"तू अगदी पक्का आहेस हं प्रकाश ! " असं म्हणायचे. आणि फाइली आवरायला लागायचे. बाबांच्या खोलीतला दिवा बंद होईपर्यंत तो डोळे ताणून जागा राहायचा.

आजोळी तसा तो दर सहा महिन्यांनी जातोच. पण एखाद्या आठवड्याने परत फिरायचा; ह्या खेपेचं राहणं सोडलं तर. आजीसुद्धा म्हणायची, " हा इकडे आला की जावईबापू एकटेच असतात. आहे कोण बापाला लेकाशिवाय अन् लेकाला बापाशिवाय. जाऊ द्या त्याला."

अन् निघताना दर वेळी आजी बजावून सांगायची, " बापाची काळजी घे बरं पका. तुझ्यावर भारी जीव आहे रे त्याचा ! "

दोन वर्षांपूर्वी प्रकाश आजोळी गेला होता तेव्हा आजी नव्या बदलून आलेल्या शेजारीणबाईंच्या चौकश्यांना उत्तरं देत होती. प्रकाश पलीकडच्या खोलीत होता. त्याला सारं ऐकू येत होतं.

" पाहुणा नव्हे. लेकीचा लेक आहे. "

" कुठे दिलीय् लेकीला. "

" दिली होती म्हणायची. लेक नाही आता. दहाव्या वर्षीच आईवेगळं झालंय् लेकरूं. बदल्या होतात बापाच्या. आता नुकतेच पुण्याला गेलेतन–बदलून.... "

" च् च् ...... राहणार असेल नातू सुटी संपेपर्यंत ? "

" छे, हो कसला राहतोय ?"

आजी डोळे पुसत असणार. प्रकाशच्या आईची आठवण निघाली की तेच चालतं. प्रकाशच्या डोळयांत पण चुरचुर व्हावयाला लागते. त्याने डोळयांवर आडवा हात धरला. आजीचा आवाज येतच होता,

" बापाचा भारी लाडका आहे. लग्न नाही केलं त्याच्या बापानं. माझी लेक वारली तेव्हा. एकुलतं एक पोर हे. जरा त्याला दृष्टीआड होऊ देत नाही. तळ-हातावरच्या फोडासारखा जपून सांभाळलाय. उगीच आपली इकडची पण ममता राहावी म्हणून त्याचा मामा घेऊन येतो त्याला–चार–आठ दिवसांसाठी. सारं तेहेतिसावं वरीस होतं बघा जावईबापूंना माझी लेक वारली तेव्हा. वरीसभराने


# सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २. टेलिफोन ३८३३७

- राहण्याची व भोजनाची उत्तम सोय
- हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह आणि अनेक प्रकारच्या सुखसोयी.
- टिळक जन्म-शताब्दिदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

आम्ही आमचं दु:ख गिळलं अन् त्यांना लग्नाचा आग्रह केला. म्हटलं प्रकाशची नका काळजी करू. आम्ही सांभाळू त्याला. प्रकाशच्या मामीनंसुद्धा पुढं होऊन सांगितलं की माझा मोठा मुलगा समजते मी प्रकाशला. आपण निर्धास्तपणे लग्न करावं. पण नाही घेतलं त्यांनी मनावर !"

"आजकाल अशी माणसं दुर्मिळ हं. देवमाणूस म्हणायचा हा !"

"तर काय हं !"

प्रकाशला अशा वेळी आठवतं, बाबांच्या खोलीत पलंगाच्या समोरच्या भिंतीवर आईचा फोटो आहे. कितीदा तरी बाबा त्या फोटोकडे टक लावून पाहत असतात. आणि अशा वेळी जर त्यांना हाक मारून त्यांच्याशी बोलायला जावं तर आवाज किती जड असतो त्यांचा.

टॉवेल, ती सोपबॉक्स वगैरे पुन्हा सुटकेसमध्ये ठेवताना प्रकाशने सुटकेसचं झाकण हातातच ठेवून एक आडवी डबी उघडून पाहिली. तिच्यात एक सुंदर टाय आणि टायपिन आहे. मामा मध्ये मुंबईला गेला होता त्याच्याबरोबर प्रकाशही गेला होता. तिथल्या खरेदीत प्रकाशने बाबांसाठी ह्या वस्तू आणल्या आहेत बाबांच्या वाढदिवसासाठी भेट म्हणून द्यायला. आजोळी जाताना बाबा पैसे देतात ते खर्च न होता तसेच परत आणावे लागतात. त्यातूनच केलीय ही खरेदी. आज बाबांचा वाढदिवस त्याच्या लक्षात आहे. म्हणून तर तो परत यायला निघाला हट्टाने. आई होती तेव्हा हा वाढदिवस किती छान साजरा व्हायचा. आई बाबांना रजा घ्यायला लावायची. गोडाचं जेवण, नवे कपडे, फिरायला जाणं, छानपैकी सिनेमा, आईस्क्रीम, रात्री ओवाळणं. बाबांबरोबर त्याची पण चैन. आता आई नाही. पण आचाऱ्याला सांगून प्रकाश बाबांना आवडणारे पक्वान्न करायला लावतोच.

आज काय आचारी हा दिवस लक्षात ठेवून करणार होता ? आता बाबा काय स्वत:च्या तोंडाने सांगतील ? आचारी सांगतो,

"पकाबाबू, तुम्ही नसलात की एकेक वेळी साहेब रात्रीचं जवतच नाहीत. दूध पितात ग्लासभर, बस्स !"

टाय नि पिन दहावेळा तरी प्रकाशने पाहिली असेल. तिच्यावर छानपैकी 'एस्' ची आकृती आहे. बाबांच्या नावाचं आद्याक्षर तेच. त्याच्यावर बारीक चमकदार खडे जडवलेले आहेत. बाबा चकीतच होतील. पाहून म्हणतील,

"ओहो, खूपच सुंदर. पण कशाला आणलंस हे पका ?" शाबास, आता काय तो लहान आहे ? त्याला अशा गोष्टी आता कळायला हव्यात.

खूपच चकीत होतील बाबा. खिडकीतून बाहेर पाहता पाहता त्याच्या मनात विचार चालले होते. एवढ्याचसाठी तर त्यांना कळवलं नाही आणि समजा, त्यांना येऊ का, असं पत्रातून विचारलं असतं तर त्याचं उत्तर आलं असतं,

"प्रकाश, काय ठरलं आहे आपलं ? कॉलेज उघडेपर्यंत तू तिथेच राहायचं आहेत. तुझ्या रिझल्टच्या दिवशी मी तिथे येणार आहे. राहा ना मजेत. मी ठीक आहे."

ओहो ! पुणं दिसायला लागलं.

पटकन् सुटकेस घेऊन दाराशी उभं राहावं म्हणून उत्सुक झालेल्या प्रकाशला नानासाहेब म्हणाले, "अरे, तरी अजून पंधरा मिनिटं लागतील." तसा ओशाळून तो खाली बसला.

नानासाहेब म्हणाले होते, "घरापर्यंत पोचवायला येऊ ?" पण प्रकाश गडबडीने म्हणाला होता, "छे छे, आता सारं पुणं माझ्या ओळखीचं झालं आहे. तुम्ही दुपारी या सावकाश बाबांना भेटायला. प्रकाशला आता आपल्याबरोबर कोणी नको होतं. बाबांना चकीत करायचं होतं ना. चहा वगैरे घेऊन बसले असतील स्टेनोला घेऊन समोर, मजकूर सांगत. बाबांना ऑफिस टाईम असा पाळताच येत नाही. रात्रभर फाइलीत डोके खुपसून बसत असतील. कोण त्यांना 'झोपा' म्हणून सांगायला होतं. मग सकाळी फोन करून स्टेनोला बोलावून घेऊन 'बेधडक !' मजकूर सांगायला सुरुवात, त्या बिचाऱ्या स्टेनोचं मरण.

प्रकाशची ऑटोरिक्शा जेव्हा कंपाऊंडमध्ये शिरली तेव्हा त्याला वाटलं आवाज ऐकून बाबा उठून खिडकीशी येतील. गडी पळत आला होता. त्याच्या हातात सुटकेस देता देता त्याने बाबांच्या खोलीच्या खिडक्यांकडे पाहिले. खिडक्यांवरचे पडदे अजून तसेच आहेत.

घरात आल्यावर गड्याने त्याला म्हटले, "तोंड धुऊन घेताय् तोवर दूध आणतो."

"बाबा कुठेत ?"

"उठले नाहीत अजून."

वाटलं होतं तेच झालंय्, जागले असणार रात्रभर. प्रकाशच्या ओठाच्या कोपऱ्यात हसू उमटलं. आता बघू या कसे जागताहेत !

"मी बाबांच्या बरोबर दूध घेईन. गाडीत कॉफी झाली आहे. मी उठवतो बाबांना." तो म्हणाला. आणि घाईघाईने बाबांच्या खोलीकडे गेला.

खोलीचं दार बंद होतं ! तो स्वतःच्या खोलीत गेला. बाबांच्या खोलीचं तिकडच्या बाजूचंही दार बंद होतं ! !

प्रकाश परत स्वयंपाकघरात आला. स्वयंपाक काय काय करायचा ह्याबद्दलच्या सूचना त्याने आचाऱ्याला दिल्या.

"भाजी, लिंबू वगैरे सारंच आणायला सांगा केसूला."

"साहेब आज जेवायला कुठे बाहेर जाणार म्हणून म्हणाले होते. मग मी केसूला म्हटलं होतं, काही नको भाजीबिजी आपल्या दोघांना !"

"छे छे ! आज नाही जायचे बाहेर जेवायला. मी आलोय आता. कुणाचं बोलावणं असेल तर कळवतील ते 'येत नाही' म्हणून."

मग प्रकाश आंघोळीला गेला.

तो जेव्हा आंघोळ करून आला तेव्हा बाबा बॅसीनपाशी तोंड धूत होते.

"कमालआहे प्रकाश. अचानक आलास ?"

"तुमचा वाढदिवस आज. मी कसा राहीन तिकडे? "

प्रकाशचं लक्ष बोलता बोलताच बाबांच्या केसांकडे गेलं. काळेकुळीत केस. सुंदर दिसताहेत बाबा. तसे ते देखणे न् रुबाबदार आहेतच. पण हल्ली केसांत काळ्या-पांढऱ्यांची खिचडी झाली होती. आज एकही पांढरा केस नाही!

त्याची नजर लक्षात येऊन अभावितपणे डावा हात डोक्यावरून फिरवीत बाबांनी म्हटले, "गंमत काय झाली प्रकाश. आपल्या बंडूकडे कसलासा एक हेअरडाय आणला आहे त्याने. कधीचा माझ्यामागे लागला होता की, 'एकदाच तुमच्या केसांना लावून बघू या.' मी नकोच म्हणायचा. परवा सलूनमध्ये गेलो होतो तर पुन्हा लकडा चालू केला, 'एकदाच लावू या.' तर म्हटलं 'लाव'. महिन्याभरात होतात केस पहिल्यासारखे. मला काय माहीत की तू एवढ्यात येशील."

"पण छान दिसतात बाबा हं. बंडूला म्हणावं, दर कटिंगला लावीत जा."

बाबा चांगलेच तरुण दिसताहेत. तसे बाबा वयस्कर वाटतच नाहीत. फक्त प्रौढ वाटतात. पण आता असे दिसताहेत जसे काही धाकट्या मामाच्या वयाचेच आहेत.

बैठकीच्या खोलीत लेडीज छत्री पाहून प्रकाश मनात म्हणाला, स्टेनो आल्या होत्या वाटतं सकाळी. बोलावलं असणार त्यांना. पण मी आल्याचं कळल्यामुळं पिटाळलं असणार परत. बाबा म्हणजे असे आहेत. अगदी खरंच !

त्याने बाबांची उलट तपासणी चालवली "आज एवढा उशीर का झाला उठायला? उशीरा झोपले असणार! रात्री किती वाजता झोपला होतात? रोज किती वाजता झोपत होतात? मी बजावून गेलो होतो, रात्री फाइलींना हात लावायचा नाही, तुम्ही कबूल केलं होतंत. करीत होतात रात्री पण काम?"

"बापरे प्रकाश, वकील चांगलाच होशील तू. कशाला टेक्निकल सबजेक्टस् घेतलेस एस्. एस्. सी. ला ?"

बाबा आंघोळीला गेले तेव्हा प्रकाश बाबांच्या खोलीकडे वळला. बाबांची खोली म्हणजे प्रचंड घोळ झालेली असणार. गडी आपल्याकडून स्वच्छता ठेवतो. पण टापटीप? जियली वस्तू तिथे ठेवणं बाबांना माहीतच नाही. प्रकाशलाच लक्ष द्यावं लागतं.

अरे वा ऽ! आश्चर्य आहे. खोली चित्रासारखी आहे. एकाही वस्तूने जागा सोडलेली नाही. वर्तमानपत्रे, फाईल्स, कपडे, बूट! कुणीच कुणाच्या जागेवर

आक्रमण केलेलं नाही. त्यानं बाबांच्या कपड्यांचं कपाट उघडलं. सारे कपडे व्यवस्थित ! हँगर्सवर अडकवलेले. आणि हे काय आहे ह्या कप्प्यात ? ओः ! सुगंध येतो आहे तो ह्या फवाऱ्याचा होय ? गोड वास आहेः हे नवं आहे ! सारं कपाट सुगंधी लहरी फेकीत आहे.

केशवला तर प्रकाशनेच बाजारात पाठवले आहे. बाबा स्नान करून यईपर्यंत त्यांच्या खोलीतला केर निघायला हवा. प्रकाशने लांब दांडीचा झाडू घेऊन खोली झाडायला आरंभ केला.

फिक्क्या तांबड्या रंगाचे कागदाचे दोन कपटे भुईसरपटच राहत होते. झाडू-बरोबर पुढे सरकायला तयार नव्हते. शेवटी प्रकाशने ते उचलून घेतले. उलटून पाहिले. सिनेमाची बॉक्सची दोन तिकिटं !

म्हणजे काल निनेमा झालाय्. हे बरं केलं बाबांनी. सिनेमासाठी ढकलून काढावं लागतं तेव्हा निघतात बाहेर !

रिझल्ट जवळ जवळ यऊ लागला आहे. पण दिवस मजेत जात आहेत. बाबांनी हल्ली दिवसभराचा कार्यक्रम बदलला आहे. ते सकाळी फाइलीत जास्त वेळ गुरफटतात. मग स्टेनो आल्या की जेवायची वेळ होईपर्यंत काम चालते. कधी कधी स्टेनो पण जेवायला असतात. बाबांच्या स्टेनो खूप फॅशनेबल आहेत. प्रकाशपेक्षा चांगल्या दुपटीने मोठ्या असतील. पण प्रकाशचा खूप मान राखतात. त्याच्याशी गप्पागोष्टी करतात.

बाबांचा रोजचा वापरायचा सूट लाँड्रीत द्यायला झाला आहे, ड्रायक्लिनिंगला ! प्रकाशने केशूला बोलावले. आणि बाबांच्या कोटापँटचे खिसे रिकामे करून त्यांतल्या वस्तू दुसऱ्या सुटात ठेवायला आरंभ केला. ही सिगरेटकेस... हा लायटर... डायरी... अं... हे... बिल. कसले ? अं... लेडीज हँडकर... आणि हे... वाळलेलं फूल गुलाबाचं, बरोबर ही एक... एक केसांना लावायची पिन ?


**टोपींची कथा—डोक्याची व्यथा !**

सध्या मुंबईत टोप्या मिळणे कठीण झाले आहे.

**त री ही**

**एन्. व्ही. गोखले**

**प्रार्थना समाजजवळ, मुंबई ४**

यांचेकडे सर्व प्रकारच्या टोप्या भरपूर मिळतात.
तसेच गंजिफ्रॉक्स्, सॉक्स् वगैरे होजियरी
व अद्ययावत तयार कपडेही उपलब्ध आहेत.

केशवचं लक्ष कुठे आहे ? केशव गॅलरीतून खाली पाहतो आहे.

त्या साऱ्या वस्तू भराभर त्या त्या खिशात टाकून प्रकाशने केशवला म्हटले, "आता नको केसू. मग देईन. तू जा तुझ्या कामाला." केशव मुकाटयाने गेला.

मग बाबा आल्यावर प्रकाश म्हणाला, "बाबा माझे कपडे लाँड्रीत द्यायचे आहेत. तुमचे पण असतील ना ? रोजचा सूट ड्रायक्लिनिंगला द्यायला झालाय् अगदी !"

बाबांनी हॅंगरवरून सूट काढून घेतला. त्याच्या खिशांतल्या वस्तू काढून टेबलावर ठेवायला सुरुवात केली. डायरी, सिगरेटकेस, लायटर, आणि... ते दचकले. त्यांनी प्रकाशकडे पाहिले. तो स्वत:चे कपडे लाँड्रीच्या वहीत टिपून ठेवण्यात दंग होता. खाली पाहतच म्हणाला, "तुमचा कोट, पँट, टाय पण ना ? माझे चार नि तुमचे तीन !"

एका हातावर सारे कपडे घेऊन ते झुलवीत प्रकाश खाली केशवकडे निघाला. तो दिसेनासा झाल्यावर बाबांनी ते सुकलेले गुलाबाचे फूल नि ती पिन वेस्टपेपर बास्केटात टाकली. ते बायकी हातरुमालांचे बिलपण फाडून टाकून दिले.

सुटीच्या दिवशी प्रकाश आणि बाबा फिरायला जाणार होते. प्रकाश तोंड धुवायला गेला होता. तो परत आपल्या खोलीत आला, तेव्हा बाबा फोनवरून कोणाशीतरी बोलत होते,

"छे छे ! आमचा फिरायला जाण्याचा कार्यक्रम ठरलेला आहे.— आता शक्य नाही बदलणं. आणि योग्यही नाही..... अं हं... नाही. माफ कर !"

"तुम्ही जा ना बाबा, कुठे जायचं असलं तर फिरायला, काय मी मित्राच्या बरोबर ही जाईन."

"छे छे, तसं काही फार महत्त्वाचं नव्हतं. त्यात काही अर्थ नाही. आपण आपल्या बेतात काही बदल करायचा नाही. चल !" आणि बाबांनी अंगावर कोट चढवला.

जेवताना बाबा म्हणाले, "प्रकाश जरा मुंबईला जावं लागणार आहे महत्त्वाच्या कामासाठी. जाऊन येऊ एका दिवसात ? म्हणजे... आज संध्याकाळी जाईन आणि परवा सकाळी परत येईन, चालेल ?"

"जा ना. माझी काळजी नका करू. मी लहान थोडाच आहे आता !"

"तू असं कर, एक–दोन दोस्त बोलाव तुझे रात्रीच्या जेवणापासूनच. म्हणजे तुला एकटं वाटणार नाही, परवा नाश्ता झाल्यावर निरोप द्यावयाचा मित्रांना. मजा करा. अं ? काय ?"

हो ना. खूप मजा येईल !"

खरं म्हणजे केशव सोबतीला असतो. दोस्तांना बोलावण्याची काय गरज ? पण बाबांना अवघड वाटेल म्हणून तो म्हणाला, "रिझल्ट लागायच्या आधीच रिझल्ट

साजरा करून घेतो आम्ही. नंतर उगीच ह्याला क्लास मिळाला, त्याला नाही; असा विरस नको व्हायला. "

त्यामुळे बाबा प्रसन्न मनाने मुंबईला गेले.

प्रकाशचा एक मित्र त्याला रस्त्यात भेटला आणि एकदम आवेगाने म्हणाला, " तू महाबळेश्वरला आलास नि मला न भेटताच निघून गेलास ? तुला माहीत होतं मी महाबळेश्वरला आहे हे. "

" अरे, पण मी कधी आलो होतो महाबळेश्वरला ? "

" हं,. बोला. खोटं करून सवरून. तुमच्या बाबांना पाहिलं म्हटलं आम्ही. परवाच्या रविवारी लांबून दिसले आम्हांला ते. बरोबर कोणतरी बाई होत्या. तू दिसला नाहीस त्यांच्याबरोबर. म्हटलं, मला भेटल्याशिवाय हा जाणारच नाही. "

" म्हणजे बघ, तूच कबूल करतो आहेस मी नव्हतो त्यांच्याबरोबर म्हणून. आणि तूच रागावतो आहेस. "

" म्हणजे काय ? तू खरंच आला नव्हतास त्यांच्याबरोबर ?"

" अं हं. मी आजीकडे गेलो होतो ना. मग तिथून आल्यावर मला प्रवासाचा कंटाळा आला. आमच्या आजोळचं गाव थंड आहे. आणि अरे, काय मजा. करवंदं, बोरं......" आणि मग गाडी त्या रुळावर गेली. आजोळच्या मजा नि महाबळेश्वरची मजा ह्यांची तुलना ! कशीही झाली तरी आजोळची मजाच खरी मजा! ... पण बाबा मुंबईला जातो म्हणाले होते !

प्रकाश खाली अंगणात कुत्र्याला काही शिकवीत होता. फिरायला जाण्याची वेळ झाली म्हणून तो वर आला. बाबा फोनवर बोलत होते; त्याचे लक्ष वेधले.

" अं हं...... अशक्य... नाही. नाही जमणार... सुटीच्या दिवशी माझा आणि प्रकाशचा हा ठरलेला कार्यक्रम असतो...... तू माझ्यावर अशी वारंवार खोटं


श्री. प्रफुल्लदत्तांची दोन संग्राह्य पुस्तके

दुर्गावाडीतील दैवते कि. २ रु.

तपोवनातील दुर्वा कि. १॥ रु.

किंमतीशिवाय टपाल खर्च वेगळा

बळवंत पुस्तक भांडार, मुंबई ४

बोलायची वेळ आणू नकोस...... मी तुला आधीच ही जाणीव दिलेली आहे......तू हे जाणून वागायला हवंस...... भलतेच हट्ट करता कामा नये...... परवा एवढं समजावून सांगितलं तुला ते वाया गेलं ?...... मला प्रकाशचं मन आधी सांभाळायला हवं. माझ्यावर त्याचा पहिला हक्क आहे...... ह्यात निष्ठुरपणा कसला ? तू गैरसमज करून घेऊ नकोस...... अन्याय तुझ्यावर ? शाब्बास ! दोन डगरींवर हात ठेवल्यासारखी माझी अवस्था झाली आहे...... रूस. मग आता मी तरी काय करू ?...... नाइलाज आहे माझा रेणू...... ओ: !" आणि बाबांनी एकदम हातांतला रिसिव्हर स्टॅन्डवर दाबला. क्षणभर ते तिथेच थांबले. हलक्या पावलांनी प्रकाश पुन्हा खाली गेला. त्याने वाळूतला एक मोठासा खडा उचलून दूर भिरकावला. कुत्र्याने धावत जाऊन तो तोंडात पकडून परत आणला.

बाबा गॅलरीतून म्हणाले, "चला .प्रकाशबाबू. फिरायला जायचंय ना आपल्याला ? कपडे बदला झटपट."

"बाबा, आधी सांगायचंच विसरलो. मी एका मित्राकडे जाऊन येऊ का ? तो उद्या गावाला जाणार आहे."

"अस्सं ? जा ना जरूर जा. फिरायला काय आपण नेहमीच जातो नाही काय ? मग मी...... अस्सं करू या. मी पण जातो क्लबात. नाहीतर एखाद्या फ्रेंडकडे. तुला तुझ्या मित्राकडे सोडेन आणि मी पुढे जाईन."

कपडे करीत असताना प्रकाश ऐकत होता. बाबा टाय बांधताना, बुटांच्या लेस बांधताना, शीळ घालीत होते. आणि कारमध्ये बाबांच्या शेजारी बसलेल्या प्रकाशला जाणवलं, बाबांच्या अंगाला सुगंध येतो आहे.

टिळकरोडवर मध्येच कार थांबवायला लावून प्रकाश म्हणाला, "मी उतरतो इथेच. ह्या आडव्या रस्त्यावरच्या एका लहान्या गल्लीत राहतो माझा मित्र. तुम्ही जा आता."

"मी घर बघतो तुझ्या मित्राचं. म्हणजे तुला परत......" बाबांनी समोरच्या किल्लीकडे नेलेल्या हातावर आपला हात ठेवून त्यांचा हात मागे घेत प्रकाश म्हणाला, "तसं नको. मी आपला बसने परत येईन. आमच्या गप्पा रंगण्यावर आमची बैठक कितीवेळ टिकते ते अवलंबून राहणार. कदाचित आम्ही फिरायलाही जाऊ. मग परस्परच घरी येईन मी !"

"बरं बरं. तुला जसं आवडेल तसं !" बाबांनी मान्य केलं.

आडव्या रस्त्यावर चाललेल्या प्रकाशने वळून पाहिले. हात हलवला. तशी बाबांनी गाडी स्टार्ट केली. प्रकाश एक मिनिटभर चालत राहिला. मग आल्यावाटेने परत फिरला. टिळक रोडवर आल्यावर थोडा घुटमळला. मग चालत राहिला. शेवटी त्याने पेशवेपार्क गाठला.

पार्कमध्ये इकडे तिकडे फिरून त्याने बराच वेळ घालवला. जेव्हा तो 'अर्जुन'

चित्त्याच्या पिंजऱ्यापाशी आला, तेव्हा तेथेच दहा मिनिटे 'अर्जुन'कडे बघत राहिला. त्याला तो काय आज बघत होता काय? पण आज अर्जुन नव्याने बघितल्यासारखा तो पाहत होता. अर्जुन पिंजराभर सारखा फिरत होता. बघे लोक त्याला हाक मारीत होते. पण तो पाहायला तयार नव्हता. फिरतच होता एकटा !"

रिझल्ट लागला. बाबांनी टोपल्यामधून पेढे वाटले. प्रकाशचं अभिनंदन करायला बाबाचं सारं ऑफिस लोटलं होतं. बाबा उत्साहाने म्हणाले,

"पका, तुला मोठी काळजी होती परसेंटेज किती पडेल म्हणून! घे आता कुठल्याही कॉलेजची बिशाद नाही मार्कांच्या बेसीसवर तुला अॅडमिशन नाकारायची !"

"मग मी...... आपण असं केलं तर बाबा...... पण......!"

"काय रे, बोल ना."

"म्हणजे मी असं म्हणत होतो बाबा, मुंबईच्याच सर्वांत उत्तम कॉलेजात प्रवेश घेतला तर? म्हणजे मला व्ही. जे. टी. आय्. किंवा आय्. आय्. टी. साठी ट्राय करता येईल."

"अरे, पण आधी काय ठरलं होतं आपलं ? इथल्याच कॉलेजात प्रवेश घ्यायचा. बी. ई. पर्यंत इथंच सारं करायचं नि मग फॉरिनला–"

"पण... ते तर आहेच म्हणा. पण मित्र म्हणतात... म्हणजे माझे पुष्कळसे मित्र मुंबईलाच जाणार आहेत बाबा आणि एखादे वेळी तुमची बदली झाली तर मग ? पंचाईत येणारच की आणि काय होईल बाबा, मी मुंबईला राहिलो की मधून मधून छोटया मोठया सुट्यांना इथे येऊ शकेन ना तसा एखाद्या सुटीला आजीकडे पण जाऊ शकेन. आजी खूप थकली आहे आता. खरं म्हणजे आता मी तिला वारंवार भेटायला हवं."

"म्हणजे मी इथे एकटंच राहायचं प्रकाश ?"

"आणि मी फॉरिनला जाईन तेव्हा? तुमची बदली झाली तर? आणि सुटीत येईनच की मी अगदी. दर रविवारी येत जाईन तुम्हांला भेटायला.."

आरशाच्या टेबलापुढे गेलेल्या बाबांचं लक्ष समोरच्या भिंतीकडे गेले. आणि त्यांनी केशवला हाक मारली,

"इथला फोटो काय झाला केसू ?"

"प्रकाशबाबूंनी सांगितलं नाही कारण वाटतं. गडबडीत सामान भरताना तो फोटो सामानात ठेवला त्यांनी अन् म्हणाले, "बैठकीच्या खोलीतला फोटो आहेच की इथे. हा आईचा फोटो मला जास्त आवडतो त्या फोटोपेक्षा, म्हणून घेऊन जातोय मी माझ्या खोलीत लावायला." केशवने सांगितले.

• • •

# दिहांगच्या तीरावर



आझाद हिंद सेनेच्या
नेफा-आसाम-ब्रह्मदेशमधील क्रांतिकार्यावर आधारित
एक साहसरम्य प्रदीर्घ कथा

लेखक

□ सुधाकर डोईफोडे

एखाद्या व्यक्तीच्या अगर समाजाच्या आयुष्यात एक असा क्षण येतो की, त्यामुळे त्या समाजाचे अगर व्यक्तीचे स्वरूपच अंतर्बाह्य बदलून जाते आणि तोच का हा समाज, तीच का ही व्यक्ती, असा दुसऱ्याला प्रश्न पडतो !

माझ्याबाबतही असंच झालं. मी आपल्या प्रिय मातृभूमीसाठी काय केलं हे फारच थोड्यांना माहीत आहे. एका गोटातील लोक मला 'त्या' कामगिरीमुळे आदरणीय समजतात. इतरांच्या दृष्टीने मी 'इंग्रजनिष्ठ' पेन्शनर आहे. आज मी खरोखरच निवृत्त जीवन जगत आहे. इंग्रजांची मी निष्ठेने चाकरी केली ही गोष्ट खरी आहे. परंतु, त्या दरम्यान मी काय केले ते कुणालाच फारसे माहीत नाही. माझ्या आयुष्यातील 'तो' काल माझ्या त्यापूर्वीच्या कालाशी पूर्णपणे विसंगत आहे. जणू ते जीवन जगलेली व्यक्ती आणि त्यापूर्वीचे जीवन जगलेली व्यक्ती ही दोन निरनिराळी माणसे असावीत, असे वाटण्याइतपत त्यात फरक आहे ! पण ही जीवन जगलेली व्यक्ती एकच होती !

...तो मी होतो !

खरं म्हणजे या पाल्हाळाचा तुम्हांला कंटाळा आला असेल. मला काय सांगायचं आहे ते मी चटकन् सांगून टाकावं अशी तुमची इच्छा असणार ! माझी 'ती' कामगिरी कोणती तेही तुम्हांला ऐकावं असं वाटत असेल. मी तीच कामगिरी आता सांगणार आहे.

...पण त्यासाठी माझं त्या कामगिरीपूर्वीचं आयुष्यही तुम्हांस समजावून घ्यावं लागेल !

माझं नाव आमोद विश्वनाथ कुंटे ! आज मी कलकत्त्याला स्थायिक झालो असलो तरी मी महाराष्ट्रीय आहे याचा तुम्हांस नावावरून बोध होईलच. महाराष्ट्रातील गर्भश्रीमंत घराण्यात माझा जन्म झाला. माझे वडील वरिष्ठ आय्. सी. एस्. अधिकारी होते. माझे आजोबाही सनदी नोकर होते. इंग्रज सरकारची इमानेइतबारे सेवा केल्यामुळे माझ्या आजोबांना सरकारने रा. ब. हा किताब दिला. वडिलांची स्वामिभक्ती तितकीच प्रबळ ! तेव्हा वडिलांना 'सर'कीचा लाभ झाला ! चढत्या श्रेणीने मी 'लॉर्ड' होणार, असे वडिलांचे मित्र कौतुकाने म्हणत.

माझं बालपण आनंदात व सुखात गेलं हे सांगणं नकोच. नावाप्रमाणेच माझ्या आयुष्यात आमोद भरून राहिला होता. माझ्यासाठी वडिलांनी काही म्हणून करायचं शिल्लक ठेवलं नाही. उत्तमातील उत्तम कपडे, उत्तम आहार ! माझ्या साऱ्या गरजा व सुखसोयींकडे त्यांचं लक्ष होतं. मी शिकून मोठं व्हावं, आपल्या दयाघन सरकारच्या छत्राखाली राहावं, त्याच्यासाठीच झटावं, पैसा, मानमरातब मिळवावा, असं त्यांना वाटत होतं.

त्यांची ही इच्छा मला पूर्णपणे मान्य होती ! आपण मोठं झालं पाहिजे. इंग्रज

हे जगात सर्वश्रेष्ठ आहेत, त्यांच्या कृपाछत्राखाली राहण्यातच आपलं आणि देशाचं हित आहे, असं मला प्रामाणिकपणे वाटू लागलं. थोडा विचार केल्यावर माझी तशी खात्रीच झाली.

माझ्या सहाध्यायांपैकी बहुतेकांना माझे हे विचार पटत नसत. इंग्रजांचं राज्य आपल्या देशावरून गेलंच पाहिजे अशा मताचे ते होते. यांतील बहुतेक खालच्या वर्गांतील होते. थोडेबहुत वरच्या वर्गांतील पण होते. पण त्यांची संख्या कमीच! इंग्रजांच्या राज्यात कशी शांतता आहे, सुख–समृद्धी आहे, प्रत्येकाला आपल्या विकासाचा मार्ग कसा मोकळा आहे हे मी त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करी; पण त्यांना ते पटत नसे. ते म्हणत, "आम्ही इंग्रजांना हाकलून देऊ!"

"म्हणे हाकलून देऊ! हाकलून द्यायला इंग्रज काय चिमण्यापाखरे आहेत की गुरेढोरे? अरे, जगातील कोणतीही सत्ता त्यांना आव्हान देऊ शकली नाही, ज्यांच्या साम्राज्यावर कधीही सूर्य मावळत नाही त्या इंग्रजांना तुम्ही हाकून देणार! असं झालं तर माशांनीच समुद्र गिळला, अंधारानं सूर्य लपविल्यासारखं होईल! अरे, बेडकांच्या उड्यांनी काय सिंह घाबरतो? ढेकणापुढे हत्ती पराभव पावतो? खुळी कल्पना! मरा बेटेहो, दगडावर डोकं आपटून मरा!

...आणि नंतरच्या काळात त्यांपैकी काहीजण डोकं आपटून मेलेही! पण इंग्रजी भितीचा कपचाही उडाला नाही!

यथावकाश माझं शिक्षण पूर्ण झालं! मी सायन्सचा पारंगत पदवीधर झालो. उच्च शिक्षणासाठी मी विलायतला रवाना झालो. यासाठी वडिलांना फारसे श्रम पडले नाहीत. एकतर मी हुशार होतोच. शिवाय, वडिलांनी मुंबईच्या गव्हर्नरांकडे शब्द टाकताच त्यांनी विलायतेत कुणाला तरी पत्र लिहिलं आणि एडिंबरो विश्वविद्यालयाचं द्वार माझ्यासाठी खुलं झालं!

माझा लष्करी साहित्य निर्मितीकडे लहानपणापासूनच ओढा होता. या शाखेचं शिक्षण एडिंबरोतच मिळणं शक्य होतं. एडिंबरोची निवड मी आणखी एका कारणामुळे केली होती. एडिंबरो ही स्कॉटलंडची राजधानी! स्कॉटलंड एकेकाळी स्वतंत्र राष्ट्र होतं. ते इंग्रजांनी जिंकून आपल्या देशाला जोडलं. वास्तविक, स्कॉटलंडने स्वातंत्र्यासाठी धडपड करायला पाहिजे. पण त्यांनी तसं केलं नाही. ते आपखुशीने ब्रिटिश राज्याचे घटक बनले!

माझी मनोभूमिका स्कॉटिशांसारखी होती! आपणही त्यांच्याप्रमाणे आपखुशीने ब्रिटिश राज्याचे घटक बनावे व आपली प्रगती साधून घ्यावी असं मला वाटे. विशाल ब्रिटिश साम्राज्यात हिंदुस्थानने मानाचा घटक म्हणून नांदावं. त्यातच आपलं हित आहे असं मला वाटे! यावर कुणी, स्कॉटिश व इंग्रज हे एकाच संस्कृती–धर्माचे व भारतीय वेगळे असा आक्षेप घेतील. अशांना मी सोव्हिएट युनियनचे उदाहरण देईन. सोव्हिएट युनियनमधील घटक राज्ये वेगवेगळ्या धर्मांची

व संस्कृतींची ! त्यांनाही झारनं जिंकूनच कह्यात आणलं. पण आज हाच समाज एकवटून जगाला नव्या तत्त्वज्ञानाचे धडे देऊ लागला आहे. आव्हान देऊ लागला आहे ! ब्रिटिश साम्राज्याचं असं का होऊ नये ?

माझं शिक्षण पूर्ण झालं आणि मी हिंदुस्थानला परतलो. भारतात माझं मोठ्या थाटानं स्वागत झालं. खुद्द गव्हर्नरसाहेबांचे प्रायव्हेट सेक्रेटरी धक्क्यावर आले होते. केवढा बहुमान ! मला फार धन्य वाटलं. वडिलांना तर आकाश ठेंगणं झालं त्यांच्या राजनिष्ठेचं चीज झालं होतं. आणि हीच गोष्ट माझ्या सत्काराच्या सभेत कित्येक नेटिव्ह व इंग्रज अधिकाऱ्यांनी कौतुकाने उच्चारली होती !

माझ्या विवाहानंतर थोड्याच काळात बंगालमधील एका ब्रिटिश कंपनीनं लठ्ठ पगारावर माझी नेमणूक केली !

रिचर्डसन् आर्म्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी ! हत्यारे बनविणारी हिंदुस्थानातील सर्वांत मोठी कंपनी ! सर्व अधिकारीवर्ग ब्रिटिश आणि त्यात मी एकटाच भारतीय ! माझ्यावर टाकलेला विश्वास अपूर्व होता. त्यांच्या विश्वासास पात्र ठरणं हेच माझं ध्येय होतं.

मी वर्णन करीत असलेला काळ १९३५ चाः जगाच्या रंगभूमीवर हिटलरचा उदय झालेला होता. त्याने आपल्या रणगर्जनांनी जगाचा कोपरान् कोपरा दणाणून टाकला होता. जगात शुद्ध आर्यन् वंशाचे राज्य झाले पाहिजे, १९१४ च्या अपमानाचा बदला घेतलाच पाहिजे असा त्याने निर्धार केला होता. इंग्रजांशी आपले भांडण नाही, पण रशियन व इतर स्लाव्ह वंशियांना जगण्याचा हक्क नाही असे तो म्हणे. हिटलरच्या वेडाचाराला आळा घालावा असे म्हणणाऱ्यांपेक्षा शान्ततावादाखाली गप्प बसणारे लोक ब्रिटनमध्ये प्रबळ होते, त्यामुळे १९३६ साली स्पेनमध्ये ज० फ्रॅन्कोने जर्मनीच्या उघड मदतीने बंड उभारले तरी ब्रिटिश सरकार शान्त राहिले.

त्या काळात स्पेन म्हणजे एक मोठी प्रयोगशाळाच झाली होती. सर्व राष्ट्रांचे नागरिक या ना त्या बाजूकडून लढत होते अन् त्यांना निरनिराळे कारखाने शस्त्रे पुरवीत असत. रशियाने प्रस्थापित सरकारला विमानं पुरविली की त्याला वेधणाऱ्या नव्या तोफा इटालीने फ्रँकोला पुरवाव्या. ब्रिटननं मॉर्टर्स पुरविल्या, की जर्मनीने चिलखती गाड्या पुरवाव्यात असं चाललं होतं. प्रत्येक राष्ट्र आपापल्या शस्त्रास्त्रांची चाचणी या मैदानावर घेतं होतं. आमच्या कारखान्याची वजनानं हलकी परंतु भारी पल्ल्याची हत्यारं सरकारी सेनेच्या हाती होती. सरकारी बाजू पराभूत झाली तरी आमच्या शस्त्रांनी चांगलीच कामगिरी बजावली होती. भावी महायुद्धाची शक्यता लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारनं आमच्या शस्त्रांच्या कर्तबगारीची नोंद घेतली.

स्पेनमधील लढाईतील यशाने हुरूप येऊन जर्मनीनं पोलंडवर हल्ला चढविला

आणि सारं जग युद्धाच्या वणव्यात सापडलं ! लवकरच जपाननं पर्ल हार्बरवर अचानक हल्ला करून युद्धात उडी घेतली. पाहता पाहता त्यानं अर्धाअधिक चीन घशात घालून इंडोचायना, फिलिपाईन्स, इंडोनेशिया, मलाया व ब्रह्मदेश जिंकून घेतला. ब्रिटिश, भारतीय व अमेरिकन सैनिकांचा पराभव करून जपान भारताचे पूर्व-द्वार ठोठावू लागला !

शत्रूवरील संकट तीच आपली संधी असं मानणारे काही भेकड लोक असतात. ब्रिटिश सरकारला शत्रुवत् मानणाऱ्या काँग्रेस पक्षास या घटनेनं आनंद झाला होता. ब्रिटिशांना अडचणीत सापडलेलं पाहून त्यांच्याकडून स्वातंत्र्याच्या सवलती उपटण्याचा त्यांचा डाव होता !

...... आणि तो त्यांनी लपवून ठेवला नव्हता !

८ ऑगस्ट बेचाळीसला मुंबईत जाहीर सभेत गांधींनी भाषण करून जनतेस उठावाचा आदेश दिला. 'करेंगे या मरेंगे' ही घोषणा उघडपणे म्हटली गेली. आणि भारतीय लोक पिसाट झाल्याप्रमाणे चेकाळून उठले ! त्यांनी मोर्चे आरंभिले, सत्याग्रह केला ! रेल्वे उखडणे, तारा तोडणे या विध्वंसक कृत्यांचाही त्यांनी अवलंब केला. बंगाल प्रान्तात तर दहशतवाद्यांचं आगर! तेथे कहर झाला. भावनावश बंगाल्यांना चेतवणारे नेते मिळाले आणि सारा बंगाल वणव्यासारखा पेटून निघाला ! रेल्वे, कचेऱ्या व मोठ्या व्यक्तींवरील बॉम्बहल्ले तर नित्याचेच झाले ! सुरक्षितता अशी राहिलीच नाही. दुष्काळाने गांजलेल्या लोकांना चिथावणे फारच सोपे ! त्यामुळे बंगाल्यात दहशतवादी कृत्यांना ऊत आला. आपण काय करीत आहोत आणि त्याचे परिणाम काय होतील याची कुणासही जाणीव नव्हती !

त्या दिवशी आमच्या कारखान्याच्या व्यवस्थापक मंडळाची बैठक होती. वातावरण मोठं गंभीर होतं. सर रिवर्डसन् चिरूट तोंडात धरून खुर्चीवर रेलून बसले होते. ते छताकडे शून्य दृष्टीने पाहत तोंडातून धूर काढत होते.

मि. केंपबेल आपल्या चष्म्यातून शक्य तेवढे डोळे ताणून कसलासा रिपोर्ट वाचत होते. वाचता वाचता ते अस्वस्थ होत. मध्येच त्यांच्या चेहऱ्यावर तिरस्काराच्या आठ्या उमटत. आठ्या विरत तेव्हा त्यांची जागा संतापाने घेतलेली असे.

तंत्रविशारद विल्यम्स पलीकडे बसले होते. ४५ वर्षांचा हा वेल्श गृहस्थ निर्विकार भाव चेहऱ्यावर आणण्याचा प्रयत्न करीत होता, पण त्यांचा अस्वस्थपणा झाकला जात नव्हता.

डाव्या बाजूस माझ्याशेजारी मि. बटलँड बसले होते. आपण तयार केलेल्या नव्या स्फोटक द्रव्याचा फॉर्म्युला मला सांगण्यासाठी ते घुटमळत होते, पण माझे तिकडे लक्ष नव्हते. आज लवकर घरी येण्याबद्दल करुणाने मला बजावले होते. आजची मिटिंग एवढी गंभीर विषयावर असेल याची जाणीव नसल्यामुळे मी तिला तसे आश्वासन दिले होते.

आणि इथे तर वेगळाच नूर होता. हे भयंकर निःशब्द वातावरण जणू नरडे आवळीत होते !

अखेर या शान्ततेचा भंग खुद्द सर रिवर्डसन यांनीच केला. "सभ्य गृहस्थहो !" ते सावरून बसत घोगऱ्या आवाजात म्हणाले, "आजचा प्रसंग मोठा गंभीर आहे. ब्रिटिश साम्राज्यावर भयंकर संकट आले आहे. हे संकट दूर करण्यासाठी सरकार प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. आपल्या कारखान्यातील शस्त्रास्त्रे शत्रूला भारी पडत आहेत...... पण आपल्या युद्ध-प्रयत्नांत शत्रू खीळ घालण्याचा प्रयत्न करीत आहे ! मि. केम्पबेल......!"

"येस सर !" मि. केम्पबेल उभे राहिले आणि चष्म्यातून डोळे ताणीत म्हणाले,

"हुकूम, सर !"

"हे पाहा, मघाचा रिपोर्ट नीट वाचा !"

"ऑल राईट, सर !"

तो रिपोर्ट ऐकताच माझ्या अंगास दरदरून घाम फुटला. दोस्तांच्या पूर्वेकडील युद्धमोहिमेतील महत्त्वाचा दुवा असलेला आमचा कारखाना उडवून देण्याचा भयंकर कट शिजला होता. बंगाली दहशतवाद्यांनी कामगारांच्या रूपाने कारखान्यात शिरकाव करून घेतला होता. त्यांनीच हा बेत आखला होता. त्यांना याच कारखान्यातील कुणा अधिकाऱ्याची साथ असावी; अन्यथा त्यांना आत शिरकाव करून घेणे व निरनिराळ्या विभागांशी संपर्क साधणे केवळ अशक्य होते. या दहशतवाद्यांची चर्चा ऐकून एकाने माहिती दिल्यामुळे हा धोका समजून आला होता. वेळेवर माहिती मिळाल्यामुळेच कारखाना वाचणार होता. पण 'त्या' अधिकाऱ्याचा शोध लावणेही काही कमी महत्त्वाचे नव्हते.

मि. केम्पबेल रिपोर्ट संपवून घाम पुसत खाली बसले. आणि पुन्हा भयाण शांतता पसरली.

"खात्रीने कुण्यातरी मोठ्या अधिकाऱ्याचेच हे काम असले पाहिजे," मि. विल्यम्स शांततेचा भंग करीत म्हणाले. हे म्हणताना त्यांनी आपले डोळे झाकून घेतले होते.

"पण हा गृहस्थ कोण असेल याचा आपण तपास का करू नये ?" मि. बटलँड उठून म्हणाले.

"तसा आम्ही तपास करण्याचा प्रयत्न केला," मि. केम्पबेल उत्तरले. "परंतु माहिती देणारा अडाणी आहे. त्याने दहशतवाद्यांची चर्चा आडून ऐकली, पण कुणासही तो ओळखू शकला नाही. उद्या हल्ला करण्याचा आदेश मात्र त्याने नीट ऐकला !"

"उद्या दुर्गापूजा आहे." रिवर्डसन पुढे म्हणाले. "त्यानिमित्त आपल्या कारखान्यास सुटी आहे. अशा वेळी रात्री हा कारखाना उडवून देण्याची योजना आहे."

"पण मग पोलिसांना का कळवीत नाही ?" मि. विल्यम्सनी विचारले.

"अर्थात् !" रिवर्डसन् पुढे म्हणाले, "ती सर्व सोय झाली आहे. दहशतवाद्यांनी आवारात पाऊल टाकताच त्यांचा खातमा करण्यात येईल. पण खरा प्रश्न वेगळाच आहे..." सरसाहेब थोडे थांबले.

सर्वांचे श्वास रोखले होते !

ते पुढे म्हणाले, "...प्रश्न हा आहे की, त्यांना ही माहिती पुरविणारा कोण असावा ?"

"ज्याला त्यांच्याबाबत आपुलकी वाटू शकेल असा म्हणजे तो उच्चपदस्थ भारतीय असू शकेल." विल्यम्सच्या तोंडून वाक्य निघाले.

"म्हणजे नक्की कोण ?"—बटलॅंड.

विल्यम्स काहीच बोलले नाहीत पण त्यांनी माझ्याकडे अर्थपूर्ण नजरेने पाहिले. आता मात्र मला ते असह्य झाले ! हे बेटे माझ्यावर संशय घेतील, अशी मला मघापासून भीती वाटत होती. आणि आता विल्यम्सनी तसा सूचक इशाराही केला होता. माझा राग अनावर झाला. मी ताडकन् उभा राहून म्हणालो,

"सर...!"

"सर, सन्माननीय गृहस्थांना माझा संशय येत असावा. इतर सद्गृहस्थांनाही तसेच वाटत आहे की काय, याचा कृपया खुलासा करावा !"

माझा वक्तव्याचा बॉम्बस्फोटाप्रमाणे परिणाम झाला. चौघेही माझ्याकडे आं वासून पाहू लागले.

मी पुढे म्हणालो, "आमची राजनिष्ठेची परंपरा सर्वांना माहीत आहे, त्याची कुणास आठवण करून देण्याची गरज नाही. माझ्या आजवरच्या नोकरीत कुणाला वावगे आढळले नाही. मग आजच हा संशय का घेण्यात येत आहे ?"

माझ्या भाषणाने सारेच हबकले होते. मी एकदम मुद्याला हात घालून त्यांना जाब मागेन असे वाटले नव्हते.

क्षणभर तेथे निरव शांतता पसरली.

अखेर केम्पबेलनी कोंडी फोडली.

चष्मा पुसत ते उभे राहिले. त्यांनी सर्वत्र नजर फिरवली. नंतर घसा खाकरून ते म्हणाले,

"मि. कुन्त्ये, कोणावर आळ घेण्याचा प्रश्नच नाही. निदान आमचा तरी तुमच्यावर वहीम नाही. मि. विल्यम्सचाही तुमच्यावर अविश्वास नसावा. (तेथे विल्यम्सनी मान हलवून त्यांना होकार दिला.) आपल्या जाज्वल्य राजनिष्ठेची आम्हांस जाणीव आहे. आपणांवर आजवर जी कामे सोपविण्यात आली ती आपण निष्ठेने व तडफेने पार पाडली आहेत याचा आम्हांस अभिमान वाटतो. (उरलेल्या तिघांनी टाळ्या वाजवून त्यांच्या मतास अनुमोदन दिले.) ...फितुरी कुणी केली याचा तपास



**माझा राग अनावर झाला...**

पोलिस करतील. तूर्त आपण कारखान्याच्या संरक्षणाचा विचार केला पाहिजे...'

या व्याख्यानाचा उत्तरार्ध खुद्द रिवर्डसन यांनी केला.

"...आज रात्री त्या प्रसंगी पोलिस असतीलच पण आपल्यापैकी कुणीतरी त्या वेळी असणे आवश्यक आहे. ही जबाबदारी कुणावर सोपविण्याऐवजी स्वखुषीने हे काम कुणी अंगावर घेण्यास तयार आहे काय ?"

सभागृहात पुन्हा शांतता पसरली.

माझ्या मनात विचारांची चक्रे उलटसुलट फिरू लागली. केम्पबेलनी माझ्यावर वहीम नसल्याचे सांगितले. विल्यम्सनी त्याला मान डोलावली तरी त्यांची मने माझ्याबद्दल साफ नसावीत असेच मला वाटत होते. त्यांच्या संशयाची निवृत्ती करण्याचा हाच शेवटचा एक क्षण होता !

हाच एक ! एक शेवटचाच !!

"मंडळी," मी घोषणा केली, "ही जबाबदारी मी स्वखुषीने घेतो."

सारे चकीत होऊन माझ्याकडे पाहू लागले. मी उठून रिवर्डसनसमोर जाऊन उभा राहिलो.

"सर, तुम्हांला ही कामगिरी माझ्यावर सोपविणे आवडणार नाही काय ?"

रिवर्डसन उभे राहिले. त्यांचे डोळे पाणावले. माझ्या खांद्यावर हात ठेवून ते म्हणाले, "यंग मॅन ! माझं मन तुझ्याबद्दल साफ आहे. ही जबाबदारी तू स्वतः होऊन घेतलीस हे छान झाले. तुझ्या कामगिरीचा ब्रिटिश सरकारला कधीही विसर पडणार नाही."

थोडा वेळ थांबून ते प्रत्येक शब्दावर जोर देत म्हणाले,

"लक्षात ठेव, दहशतवाद्यांचा हल्ला रात्रौ १२॥ च्या सुमारास होईल. बाकीचा तपशील केम्पबेलकडून घे. गुडलक !"

साडेबारा वाजता ! म्हणजे एक तास अवकाश आहे. बाहेर किर्र अंधार होता. ब्लॅकआउटमुळं शहरातील सर्व दिवे मालवण्यात आले होते. दूरवर कोठूनतरी बंगाली भजनाचे आर्त सूर ऐकू येत होते. मी माझ्या नेमलेल्या जागेवर अवघडून बसलो होतो. माझ्या दोन्ही बाजूंस १०–११ तरी सशस्त्र पोलीस होते. आम्ही कारखान्याच्या आवारात मुख्य दारापासून आतल्या बाजूस एक फर्लांग अंतरावर होतो. गेटवर आज नेहमीचे पहारेकरी नव्हते. त्या गेटजवळील चौकीवर पोलिस इन्स्पेक्टर मि. थंडर पोलिसांसह दबा धरून बसले होते. शिवाय कारखान्यातील मोक्याच्या जागीही पोलीस होतेच. वेळ जाता जात नव्हता. मी अधीर होऊन पुन्हा घड्याळात पाहिले. रेडियम घड्याळाने ११।। ची वेळ दाखविली. अजून केवढा वेळ होता !

मी अतिशय अस्वस्थ झालो होतो. पुढे येणार असलेल्या प्रसंगाने नव्हे तर त्या मिटिंगनंतर माझ्या घरी घडलेल्या प्रकाराने !

मिटिंगनंतर मी घरी गेलो तो वेळ झाल्याबद्दल करुणा रुसवा धरणार हे गृहीत धरूनच. मी हॉलमध्ये डोकावून पाहिले. करुणा रेडिओ ऐकत होती. ती रेडिओ अतिशय हळू आवाजात लावून तन्मयतेने ऐकत होती. माझी चाहूलही लागली नव्हती. मी आणखी जवळ जाताच निवेदिकेचे शब्द स्पष्टपणे ऐकू आले आणि मी शतशः दचकलो ! तो काँग्रेस रेडिओ होता !

१९४२ च्या चळवळीत भूमिगत झालेल्या काँग्रेस समाजवादी गटाच्या उपद्व्यापी लोकांनी ' काँग्रेस रेडिओ ' नावाने कार्यक्रम प्रसारित करण्यास आरंभ केला होता. काँग्रेस रेडिओ प्रक्षोभक भाषेत जनतेस राज्यकर्त्यांविषयी चिथावणी देई. राजद्रोहाचे उघड उघड उदाहरण होते ते...

...... आणि माझ्यासारख्या राजनिष्ठाची पत्नी तो कार्यक्रम मन लावून ऐकत होती ! मी संतापाने किंचाळलो,

" करुणा ! "

करुणा अक्षरशः भ्याली ! रेडिओ बंद करून ती चटकन उभी राहिली. तिचे हातपाय कापत होते. तिने टेबलाचा आधार घेतला.

क्षण–दोन क्षण कुणीही बोललं नाही.

मी तिच्याजवळ गेलो आणि तिच्या खांद्याला धरून हलवीत विचारले,

" तू हे काय चालविलं आहेस ? "

करुणेनं मान वर केली. तिचे डोळे चकाकले. तिने कसलासा निश्चय केला असावा. ती शान्तपणे स्वच्छ शब्दांत म्हणाली,

" मी काँग्रेस रेडिओ ऐकत होते ! स्वातंत्र्याचा गजर ऐकत होते ! ! "

करुणेचे उद्‌गार तापल्या तेलाप्रमाणे माझ्या कानांत घुसले.

" करुणा, तू काय बोलते आहेस याची तुला जाणीव आहे काय ? "

"हो आहे ! मी काँग्रेस रेडिओ ऐकत होते. मी स्वातंत्र्याचा गजर ऐकत होते ! मी राजकारणी नाही. मला ते कळत नाही. पण स्वातंत्र्याची इच्छा मात्र कळते. भूक, तहान यांप्रमाणे स्वातंत्र्याची इच्छा नैसर्गिक आहे. रानचं पाखरू सोन्याच्या पिंजऱ्यातही राहत नाही, जनावर चांदीच्या दावणीस भुलत नाही ! मग आपण तर माणसं......"


ती पुढे वाकून म्हणाली, "तुम्हांला नाही वाटत आपण स्वतंत्र व्हावे म्हणून ?"

"शटअप् !" मी ओरडलो, "कोणतं स्वातंत्र्य आणि कोणतं पारतंत्र्य ! आपले कोण, अन् परके कोण याचा काही विचार ? ज्या राजवटीत आपल्या कर्तबगारीला वाव मिळाला ते स्वातंत्र्य, ज्या राजवटीत आपल्याला अडाण्यांचे हुजरे व्हावे लागेल ते पारतंत्र्य, समजलीस ! ज्याने आपल्याला नवी दृष्टी दिली, सुबत्ता दिली, आपल्याला वैभवावर चढविले ते आपले आणि ज्या गुंडांनी जाळपोळ आरंभली, खून केले, दरोडे घातले ते परके आपले शत्रू, समजलीस !"

करुणा काहीच बोलली नाही, पण तिला माझे म्हणणे पटले नाही, असे तिची मुद्राच सांगत होती. अपप्रचाराने तिला चांगलेच झपाटले होते तर ! मी बेचैन झालो. माझ्यासारख्याच्या पत्नीने गुंडांबद्दल सहानुभूती बाळगावी या विचारानें मला तीव्र वेदना झाल्या. त्या रात्री मला जेवणही गेले नाही. शून्यपणे मी माझ्या कामगिरीसाठी कारखान्याकडे परतलो. मनातील अस्वस्थता दाबून ठेवून पो. इ. थंडर यांच्याशी बंदोबस्ताबाबत विचारविनिमय केला आणि ठरल्याप्रमाणे आपापल्या जागा धरल्या.

घड्याळाचा काटा धीमेधीमे पुढे सरकत होता. तो आता १२–१० वर आला. आम्ही सारेच अधीर झालो. मी माझ्या रिव्हॉल्वरवर हात ठेवून चुळबुळत होतो. दहशतवादी केव्हा येतात आणि केव्हा त्यांना लोळवितो असं मला झालं होतं.


सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण



**हरिभाऊ विश्वनाथ कंपनी**

संगीत वाद्यालय

दादर, मुंबई २८.

देशभक्त ! म्हणे या दरोडेखोरांना देशभक्त म्हणा ! जागतिक शान्ततेसाठी लढणाऱ्या दोस्तांना शस्त्रे पुरविणारा कारखाना उडविणाऱ्यांना म्हणे स्वातंत्र्यवीर म्हणा ! हे म्हणे स्वातंत्र्य कमावणार ! अरे, कुणापासून आणि कशासाठी ? स्वराज्य सुखासाठीच ना मग आता काय आपण दुःखात आहोत आणि स्वातंत्र्यानंतर काय स्वर्ग अवतरणार आहे ? पण हे खुळचांच्या डोक्यांत शिरत नव्हते. अपप्रचाराने ते वेडे झाले होते. त्यांच्यापुढे युक्तिवाद व्यर्थ होता !

गेटजवळ बारिकसा उजेड चमकला आणि चमकत नाहीसा झाला. थंडर यांनी तो इशारा केला होता. गुंड आले म्हणायचे !

आम्ही सावरून अगदी तयार बसलो. मिट्ट काळोखात काही दिसत नव्हते. किलकिले असलेले दार त्यांनी हळूच ढकलले. किंचित् कुरकुरत ते उघडले, त्यानंतर एक-दोन क्षण तसेच गेले आणि चौकीतून आवारात एकदम प्रकाशाचा प्रखर झोत फेकला गेला !

झोत पडताच ते दहशतवादी भयंकर दचकले. क्षणभर ते जमिनीस खिळल्यासारखे झाले. पण सावरून त्यांनी लगेच पळण्याचा प्रयत्न केला. आम्ही लगेच गोळीबार केला. पहिल्याच फैरीत दोन तेथेच गारद झाले. बाकीच्यांनी आवारातील आडोशांचा आधार घेऊन उलट गोळीबार सुरू केला.

"शरण या ! ताबडतोब हत्यारे टाका. नाहीतर सर्वांना ठार करण्यात येईल !" थंडर ओरडला.

उत्तरादाखल दोन गोळ्या त्याच्या दिशेने आल्या पण सुदैवाने तो बचावला !

दहशतवाद्यांच्या या कृत्याने थंडर भडकून गेला. आम्ही बेभानपणे गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. ५ पैकी तिघे उरले. थोड्या वेळाने आणखी एक पडला. उरलेले दोघे दाराकडे सरकण्याचा प्रयत्न करीत होते. पण पोलिसांनी तो मार्ग अडविला होता. आणखी एकजण रक्त ओकत कोसळला. आता एकजण उरला. त्याच्या सुटकेचे सारे मार्ग बंद झाले होते. पोलिसांचे कडे अधिक आवळले गेले आणि थोड्याच वेळात तो कह्यात आला.

मी मोचीवरून खाली आलो तेव्हा तो निःशस्त्र केलेला तरुण खाली मान घालून बसला होता. त्याचे वय जेमतेम २० वर्षांचे असेल, सावळा रंग व खुरटलेले शरीर, वरवर दीन वाटणारा चेहरा पण डोळ्यांतील ती निर्भय झाक !

एका पोलिसाने बखोटे धरून त्याला उभे केले. तरुणाचा चेहरा पाहताच जमादार ओरडून म्हणाला,

"साब ये तो अशोषकुमार है !"

म्हणजे एक कडवा क्रान्तिकारक तरुण आमच्या हाती लागला होता तर !

अशोषकुमार हा बंगालमधील गाजलेल्या सूर्यसेनच्या टोळीतील तरुण होता. सूर्यसेनच्या अंतानंतर कुणीतरी उरल्या सुरल्या तरुणांना एकत्र करून दरोडे,



एक कडवा क्रांतिकारक
आमच्या हाती लागला होता–

घालण्यास सुरुवात केली होती. त्याला बरेच नवे अनुयायीही मिळाले होते. अशोपकुमार हा त्या टोळीचा प्रमुख सदस्य होता. धाडसाच्या बहुतेक मोहिमांत तो पुढे असे. इंग्रजी राजवट व तिला प्रामाणिक असणाऱ्या भारतीयांचा तो अत्यंत द्वेष करीत असे. तो ज्या टोळीतर्फे काम करीत असे त्या टोळीचा नेता कोण ते मात्र पोलिसांना अजून हुडकून काढता आले नव्हते. नवीन नेता अतिशय बुद्धिमान व धूर्त असावा. कोठलीही मोहीम हाती घेताना ती काळजीपूर्वक आखण्यात येई. या टोळीने घातलेला प्रत्येक छापा यशस्वी झाला होता. अयशस्वी झालेला हा एकच ! आणि तो त्यांना चांगलाच महागात पडला होता. ४ दहशतवाद्यांचे प्राण गमवावे लागले व म्होरक्या आमच्या हाती सापडला.

थंडर तेथे आला तेव्हा अशोपकुमार पोलिसांच्या कोंडाळ्यात उभा होता. थंडरने त्याच्याकडे रोखून पाहिले. आपला कट फसून आपण पोलिसांच्या तावडीत सापडलो याचे अशोपला चांगलेच वाईट वाटत असावे. पराभवाची वेदना त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. होणाऱ्या परिणामांना तोंड देण्याचा त्याचा निर्धारही त्याच्या चेहऱ्यावर चमकत होता. या ठिकाणी व अशा परिस्थितीत त्याला छेडण्यात काहीच अर्थ नव्हता. थंडरने त्याची तावडतोब चौकीवर रवानगी करण्याचे ठरविले.

गोळीबाराच्या प्रकारामुळे कारखान्याभोवतालच्या वस्तीत चांगलीच गडबड उडाली. कारखान्याच्या कामगार चाळीतून व अधिकाऱ्यांच्या क्वार्टर्समधून लोक पळत कारखान्याकडे गोळा झाले. पोलिसांनी त्यांना दूरवर रोखून धरले.

नेमके काय घडले ते कुणालाच माहीत नव्हते. जो तो दुसऱ्याला 'काय झाले'

म्हणून विचारत होता. पोलिसांनी अशीषकुमारला व्हॅनमध्ये बसविलेले पाहताच लोकांना हळूहळू झालेल्या प्रकाराची कल्पना आली. कामगारांचा जमाव व्हॅनच्या बाजूस सरकू लागला. ज्या कारखान्याने त्यांना काम दिले, त्यांच्या पोटापाण्याची सोय केली, त्यांच्या जीवनाबद्दल शाश्वती निर्माण केली तो कारखाना उडवून देणाऱ्या नराधमांबद्दल त्यांना निश्चितच संताप आला असणार ! हे कामगार संतापून अशोषचा खुर्दा उडवितील याची मला जाणीव झाली...अशीष सुरक्षित राहणे आवश्यक होते. तो जिवंत राहिल्यासच आम्हांला हा कट व त्याच्या पुढाऱ्याची माहिती मिळणे शक्य होणार होते. मी लगेच व्हॅन मागील गेटने काढण्याबद्दल थंडरला सूचना दिली. जमाव मोटारीपर्यंत पोचेपर्यंत ती निघून गेली होती. मी त्या मोटारीमागे पळणाऱ्या जमावाला उद्देशून ओरडलो, "शाबास कामगारांनो...... शाबास......! तुम्ही......" जमावाच्या बाजूने एक दगड सप्पकन येऊन माझ्या कानशिलावर आदळला. सारेजण माझ्याभोवती फिरत आहेत असे मला वाटू लागले. माझे माझ्या शरीरावरील नियंत्रण जाऊ लागले. माझी शुद्ध हरपू लागली. आणि याच वेळी जमावाच्या घोषणा मला ऐकू आल्या. त्या घोषणा होत्या, "अशोष-कुमार जिंदाबाद" आणि "वंदे मातरम् !"

मी शुद्धीवर आलो, तेव्हा मी माझ्या घरी कॉटवर आहे, असे मला आढळून आले. समोर खुर्चीवर डॉक्टर होते व पायथ्याशी करुणा उभी होती. पलीकडे माझे नोकर छातीशी हात बांधून उभे होते. बराच वेळ मला परिस्थितीचे आकलन होत नव्हते. जे दिसत होते ते मनात ठसत नव्हते. मी काय पाहत आहे, ते नक्की उमगत नव्हते. साऱ्यांचे चेहरे मला दिसत होते, पण त्यावरील भाव कळत नव्हते. मी सर्वत्र शून्य नजर फिरवीत होतो पण ती दृष्ये मनावर उमटत नव्हती. डॉक्टर मला उद्देशून काहीतरी बोलत असावेत. त्यांचा आवाज मैलोगणती दुरून आल्याप्रमाणे भासत होता. आणि शब्द ग्रहण करून त्यांचा अर्थ लक्षात घेण्यास माझा मेंदू तयार नव्हता.

ही अवस्था २-४ तास तरी टिकली असेल. हळूहळू माझा मेंदू जागृत होऊ लागला तसतसा शरीरावर त्याचा ताबा चालू लागला. करुणेच्या चेहऱ्यावरचा आनंद मला वाचता आला. म्हाताऱ्या मोलकरणीनं वर पाहून हात जोडलेले माझ्या नजरेने टिपले. डॉक्टरांचे शब्द ओघळून न जाता कानांत साठून राहू लागले. डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे मला समजले की मी दोन दिवस बेशुद्ध होतो. साधा दगडच पण वर्मी मार बसल्यामुळे कठीण प्रसंग ओढवला होता ! खवळलेल्या जमावाला पोलिसांनी लाठीमार करून पिटाळून लावले होते. त्यामुळे माझ्यावर अधिक प्रसंग ओढवला नाही. मला डॉक्टरांच्या औषधाने जेवढा गुण आला असेल त्यापेक्षा करुणेच्या शुश्रुषेमुळे व व्रतामुळे आला होता. तिने म्हणे गेल्या दोन दिवसांत पाणीही घेतले नव्हते !

मी करुणेकडे पाहिले. तिचा चेहरा ओढल्यासारखा दिसत होता. काळजीमुळे असेल अगर व्रतामुळे, पण तिच्या मनावर फारच ताण पडलेला दिसत होता. पलंगाचा आधार घेऊन ती उभी होती.

"करुणा...!" मी हाक मारली.

करुणेनं मान वर केली. हळूहळू ती माझ्याजवळ आली. खाली वाकून तिनं विचारलं,

"काय ?"

-"काही नाही. इथं बस !"

करुणा माझ्याशेजारी बसली. मी तिचा हात हातांत घेतला. तिचा हात किती फिकट होता. खरं म्हणजे आजारी मी होतो पण माझ्यापेक्षा तीच फार खंगलेली दिसली. मी म्हटले,

"कशाला हा त्रास करून घेतलास ! मी तुला..."

"पुरे पुरे...!" करुणा माझ्या तोंडावर हात ठेवून म्हणाली, "काही बोलू नका. डॉक्टरांनी तुम्हांला बोलणं मना केलं आहे, नाही का डॉक्टर ?"

"हो हो तर ! तुम्ही शांतपणे पडून राहायचं ! आणि बरं का मोशाय्..." डॉक्टर हसत बंगालीत म्हणाले, "राग अनुरागदेखील दोन दिवसांनी !"

नंतरच्या हास्यानं वातावरण मोकळं झालं.

डॉक्टरांचे उपचार आणि करुणेची शुश्रूषा यांमुळं माझ्या प्रकृतीत भराभर सुधारणा होऊ लागली. केवळ एकच दगड मला गेले १५ दिवस अंथरुणावर खिळवून ठेवण्यास कारणीभूत झाला होता. मी बंगल्यातच आता फिरू लागलो. अशक्तपणा कायमच होता म्हणून लेखन, वाचन, चर्चाही बंद होती. करुणेशी संवाद व रेडिओवरील मनोरंजक कार्यक्रम या दोनच बाबींना डॉक्टरांची परवानगी होती. बातम्या ऐकता येत नसत. करुणाही बाहेरील घडामोडींबद्दल फारशी बोलत नसे. परंतु तिच्या तुटक वाक्यांवरून जो संदर्भ लागला, तो काही चांगला नव्हता. बाहेर शत्रूचा जोर वाढला होता. देशात चळवळीची सूत्रे शांततावाद्यांकडून समाजवादी तरुणांकडे गेली होती ! दहशतवादी कार्यास ऊत आला होता. त्यांची हिम्मत वाढली होती. सुभाषचंद्र बोस यांनी तर कहरच केला ! देशातून ते अफगाणिस्थान, रशियामार्गे जर्मनीस पळाले होते व पाणबुडीतून ९० दिवसांचा प्रवास करून १९४३ च्या मध्यात जपानला पोचले होते. आज देशातील सारे पुढारी एकतर अटकेत होते अगर भूमिगत ! एकटे सुभाषबाबूच ब्रिटिश हद्दीबाहेर शत्रूच्या गोटात मुक्त होते. ते काय करणार इकडे सारा भारत डोळे लावून होता.

यातील बऱ्याच घटना मी अंथरुणावर खिळण्यापूर्वी घडल्या होत्या पण मी त्यांवर कधी विचार केला नव्हता. मला तेवढा वेळ नव्हता आणि तशी आवश्यकताही वाटत नव्हती !

आज २१ जून ! आज माझा वाढदिवस ! मी जिवावरच्या प्रसंगातून पूर्णपणे बरा झालो होतो. करुणेनं हा वाढदिवस थाटात साजरा करण्याचं ठरविलं होतं. शहरातील शेकडो प्रमुख मंडळींना आमंत्रणं होती. कलेक्टर, पोलिस अधिकारी, बडी गोरी अधिकारी मंडळी, माझ्या कारखान्याचे संचालक मंडळ ! यांशिवाय नेटिव्ह लोकांपैकी बारिसाल जिल्ह्यातील एका तरुण जमीनदार सरित बरेन, निरनिराळे उद्योगपती आले होते. पार्टीस आलेले वरिष्ठ अधिकारी सचित दिसत होते. काल दहशतवाद्यांनी सरकारी गाडीवर हल्ला करून अशीषकुमारला सोडवून नेले होते. सरकारला हा चांगलाच दणका बसला होता. त्या प्रकारामुळे साऱ्यांचीच झोप उडाली होती. यामुळे पार्टीतील वातावरणही गंभीर झाले होते. माझे अभीष्टचिंतन करणाऱ्यांच्या भाषणांतही हाच सूर कळत न कळत उमटत होता. मे. कलेक्टरसाहेबांनी अशा बिकट परिस्थितीतही माझ्यासारखे लोक सरकारनिष्ठ आहेत, याबद्दल आनंद व्यक्त केला. सर रिचर्डसन यांनी माझ्या स्तुतिपर भाषणात मी तयार केलेल्या नव्या मशीनगन्स तयार करणाऱ्या प्लॅण्टबद्दल प्रशंसोद्गार काढले. या नव्या शोधामुळे मशिनगन्सचा कारखाना अत्यंत सुटसुटीतपणे कोठेही उभारता येईल, हे त्यांनी सांगताच सभेत टाळ्यांचा कडकडाट झाला. इतर मंडळींनी पण अशीच भाषणे करून मी जिवावरच्या प्रसंगातून उठल्याबद्दल आनंद प्रदर्शित करून अभीष्टचिंतन केले.

पार्टी संपली, मी व करुणा पाहुण्यांना निरोप देत होतो. सर्वांनी मला प्रकृतीची काळजी घेण्यास सांगून निरोप घेतला. हळूहळू सरित बरेनखेरीज सर्व मंडळी निघून गेली. सरित मात्र एका कोचावर शून्य दृष्टी लावून बसला होता. बारिसाल परगण्यातील या तरुण जमीनदारास कुठली चिंता जाळीत होती हे मला कळत नव्हते. मी जवळ गेलो तो त्याने माझ्याकडे नजर फिरविली.

"काय सरित, बरं आहे ना ?" मी विचारलं.

उत्तरादाखल तो केवळ हसला.

"काही कमी जास्त ?" मी विचारलं, "सर्व खुशाल..."

सरितनं माझ्यावर दृष्टी रोखली. तो हळूच म्हणाला,

"परिस्थितीनं कोणतं वळण घेतलं हे पाहतच आहेस. या स्वातंत्र्य आंदोलनानं सारा समाज ढवळून निघत आहे. माझ्या जहागिरीत याचं लोण पसरलं आहे. त्यातच सुभाषबाबू बाहेर गेल्यामुळे परिस्थिती फारच गंभीर झाली आहे..." आणि तो पुढं सरकून हळूच म्हणाला,... "याचा केव्हातरी स्फोट होणार ! हा स्फोट सरकारचा कपाळमोक्ष करणार, हे ठरलेलेच आहे. आता प्रश्न फक्त अवधिचाच आहे !'

सरितचे हे उद्गार ऐकून मी चांगलाच गांगरलो. एका राजनिष्ठ जमीनदाराचा मुलगा अशा प्रकारे बोलेल याची मला जाणीव नव्हती. दहशतवाद्यांना तो घाबरला

असावा. मी त्याला तसं स्पष्ट विचारलंही ! त्यावर त्यानं जे उत्तर दिलं ते ऐकून मी झोपेत आहे, की जागा याचाच प्रश्न पडला ! एकेका शब्दावर जोर देत सरित ठामपणे म्हणाला, "मला स्वातंत्र्यवीरांची भीती वाटण्याचं काहीच कारण नाही. कारण ते माझे मित्र आहेत. एवढंच कशाला, नीट ऐक ! मीही त्यांच्यापैकीच एक आहे ! !"

या धक्क्यातून सावरण्यास मला बराच वेळ लागला.

सरितनं स्वतःची जी नवी ओळख करून दिली ती अनपेक्षित तर होतीच पण भयंकरही होती. आपला दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे त्याने स्वच्छपणे मला सांगितले होते. ही बातमी बाहेर फुटल्यास त्याला केवढा धोका होता हे त्यालाही कळत असेल ! मग तो माझ्याजवळ अनवधानानं बोलून गेला, की त्याच्यामागं निश्चित कारण असेल ? काय बरं असू शकेल ?

माझा काहीच तर्क चालेना ! मी विचारलं,

"सरित, तू हे विचार करून बोललास ?"

"होय पूर्णपणे ! आमोद, खरंच, हे पारतंत्र्य तुला खुपत नाही ? ही परिस्थिती पालटावी, आपण स्वतंत्र म्हणून जगावं असं तुला वाटत नाही ? अरे, स्वातंत्र्याच्या लालसेने हजारो आबालवृद्ध आपले प्राण अर्पित असताना तुला मात्र ही परवशता मृत्यूहून वाईट असं वाटत नाही ? आमोद, आपण दास्यात आहोत हाच विचार माझं मन सतत जाळत असतो. या विचारानं मला रात्ररात्र झोप येत नाही. स्वातंत्र्यासाठी मी, माझं कुटुंब, जहागीर सारं सारं समर्पण करीनच. नव्हे आज ते तसं होतच आहे. पण आमचे प्रयत्न अपुरे पडत आहेत. इंग्रजांना शान्ततापूर्ण मार्गानं घालवून देता येईल असं आम्हांला वाटत नाही. त्यासाठी सशस्त्र उठावच पाहिजे! आज हा विषय तुझ्याजवळ काढला आहे यात मी मोठं धाडस करीत आहे. तू आम्हांला साथ न दिल्यास माझा शेवट ठरलेला आहे. एवढं असूनही मी तुझ्यावर विश्वास टाकला आहे. कारण आमच्या पुढील योजनेसाठी तू आम्हांला हवा आहेस. भारतमातेच्या मुक्ततेसाठी आम्हांला तुझी मदत हवी आहे. आम्ही तुझ्याकडे आशेने पाहत आहोत. बोल, करशील तू आम्हांला मदत ? देशील स्वातंत्र्यवीरांना साथ ?"




बोलता बोलता सरितचा कंठ भरून आला. त्याच्यानं पुढं बोलवेना. मी दिङ्मूढ होऊन त्याच्याकडे पाहत होतो. ब्रिटिश सरकार ज्यांना आपला आधारस्तंभ समजत होतं त्या जमीनदारांपैकी एकजण क्रांतिकारकांना सामील असावा, याचा मला धक्काच बसला. स्वातंत्र्याचं वारं इथवर पोचलं तर !

सरित पुन्हा बोलू लागला,

"...... आजचा दिवस शुभ दिवस आहे. २१ जून ! आज भारताच्या स्वातंत्र्याचा सरनामा म्हटला जाणार !" त्यानं घड्याळाकडे पाहिलं, तो एकाएकी रेडिओकडे गेला आणि म्हणाला, "ऐकायचा आहे तुला तो दिव्य संदेश ! ऐक."

सरितचा आवाज वातावरणात विरला आणि रेडिओची वाणी घुमू लागली ! टोकियोवरील हिन्दी निवेदक सांगत होता,

"यह रेडिओ टोकियो है । अब आप भारतीय स्वातंत्र्यवीर बाबू सुभाषचंद्र बोसका संदेश सुनिये !"

'सुभाषचंद्र बोस !' आम्ही दोघेही ताडकन् उभे राहिलो ! धीरगंभीर आवाजात सुभाषबाबू बोलू लागले,

"देशबांधवहो ! आजचा क्षण महान मंगल क्षण आहे. लाखो भारतीयांनी स्वातंत्र्य संग्राम सुरू केला आहे. भारतीय जनता जमेल त्या मार्गाने साम्राज्यशाहीशी लढा देत आहे. आज साम्राज्यशाही शेवटचे आचके देत आहे. तीवर शेवटचा प्रहार करण्याची हीच वेळ आहे. उठा, कंबर कसा ! स्वातंत्र्य हवे तर त्याची रक्ताने किमत दिली पाहिजे. देशबांधवहो, उठा. हिन्दुस्थानचा स्वातंत्र्य लढा आपण आतून–बाहेरून लढू. आजच्या प्रसंगी मी आझाद हिन्द सरकारची स्थापना झाल्याचे जाहीर करीत आहे ! परमेश्वर, पूर्वज व ज्यांनी ज्यांनी हे एक राष्ट्र आहे हे सिद्ध केले; आत्मत्याग, वीर कृत्ये हा ठेवा ज्या झुंझार वीरांनी ठेवला त्यांचे स्मरण करून अखिल हिन्दी जनतेने स्वातंत्र्यध्वजाखाली यावे व ब्रिटिशांविरुद्ध अंतिम संगर लढावा. अंतिम यश मिळेल, अशी श्रद्धा ठेवून शत्रू देशपार होईपर्यंत व देश स्वातंत्र्याने अलंकृत होईतोपर्यंत शौर्याने हा लढा करावा ! जयहिन्द !"

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा स्फूर्तिदायक संदेश मी ऐकला. मी सरितकडे पाहिलं. तो मारावला होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. नेताजींची वाक्यं माझ्या कानांत घुमू लागली, 'स्वातंत्र्याची किमत रक्तानेच दिली पाहिजे ! स्वातंत्र्याचा लढा ! ते स्वातंत्र्य जे इंग्रज येण्यापूर्वी आम्हांला प्राप्त होते, ज्यात आमचे पूर्वज मुक्तपणे वावरले होते !'

"सरित !" मी म्हणालो, "मी तुमचाच आहे ! मीही स्वातंत्र्यासाठी लढणार !"

सरितनं डोळ्याचं पाणी पुसलं. आवेगानं त्यानं मला घट्ट मिठी मारली.

आम्ही एकदम ओरडलो !

"जयहिन्द, चलो दिल्ली !" [पुढील अंकी चालू]

# ४० वर्षांपूर्वी आणि आजही पर्ल काढा

आमच्या आजी आम्हां सर्वांना नित्य नेमानें पर्ल काढा देत असत. त्यामुळें घरांतील आबालवृद्धांचें आरोग्य अगदी दृष्ट लागण्यासारखं होतं. आणि आजही माझ्या कुटुंबांतील लहान थोर सर्व माणसं पर्ल काढा कटाक्षानें नियमितपणें घेतात. त्यामुळें उष्णतेच्या सर्व तक्रारी दूर होतात. अपचनाचा त्रास, पोट जड होणं, थकल्यासारखं वाटणं वगैरे वगैरे कांहीं नाहीं. शीतल व चवदार पर्ल काढ्यामुळें पचनशक्ति सुधारते, शौचास साफ होते, आरोग्य उत्तम रहाते. तुम्ही पर्ल काढा घेण्यास आजच सुरवात करा व तुमचें आरोग्य अबाधित राखा.

**पर्ल कंपनी**

भायखळा स्टेशनसमोर, मुंबई २७






समीक्षक

**प्रा. आनंद यादव**

आशयदृष्टया नवीन काही भर टाकणारी एखादी कलाकृती जन्माला आली तर तिच्याविषयी तात्कालिक स्वरूपाची एक प्रतिक्रिया होते. ह्या प्रतिक्रियेत जाणकार टीकाकारांपासून सामान्य वाचकांपर्यंत सर्वच असतात. ह्या प्रतिक्रियेचे स्वरूप त्या कलाकृतीतील फक्त आशयासंबंधीच असते. आणि तो आशय नवीन असल्याने व नाविन्याचे आकर्षण सर्वांनाच असल्याने तिचा उदोउदो होत असतो. नाविन्याच्या जिज्ञासेने ती कलाकृती सर्वत्र वाचली जाते. या गडबडीत व प्रतिक्रियेत तिचे साक्षेपी मूल्यमापन बाजूला पडते. कलात्मक दृष्टीने तिच्याकडे फार उशिरा किंवहुना बराच काळ पाहिले जात नाही. मग तिच्या आशयाची झालेली वाहवा तीच सर्व कलाकृतीची वाहवा असा अतिव्याप्तीचा दोष असलेला दृष्टिकोन बराच काळ तिच्याकडे पाहताना टिकून राहतो. मराठी वाङमयात केशवसुत, हरिभाऊ, भास्करराव तांबे, कुसुमाग्रज यांच्याबाबतीत असे झालेले आहे, हे आपणांस आढळून येते. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रानंतर व त्यांनी दिलेल्या कलात्मक दृष्टिनंतर हा धोका टळेल असे वाटत होते. पण एका बाजूला सौंदर्यशास्त्राची वारेमाप चर्चा होत असतानाच प्रत्यक्ष समीक्षणाच्या बाबतीत मात्र वर उद्धृत केलेला दोष निर्माण झाल्याचे आजही वारंवार पाहायला मिळत आहे. ‘वासूनाका’ ह्या ( कलाकृती नसलेल्या ) पुस्तकाच्या ( हाच शब्द योग्य वाटतो ) बाबतीत जाणकार टीकाकारांनी परीक्षणे लिहून अशीच गफलत केलेली आज दिसून यत आहे. नकळत ी समीक्षणे भलत्याच

**सामाजिकदृष्ट्या हे पुस्तक विघातक आहे**
**कलात्मकदृष्ट्या ते काडी-किंमतीचेही नाही**

वाटेला लागलेली आहेत. ललित वाङ्मयात दिसून येणारे सौंदर्य बाजूला राहून, त्यातील संस्कृतीविषयी ही टीका बोलू लागलेली आहे. आणि गंभीरपणाने सबंध पुस्तकाचीच वकिली करत आहे, ... अशा वेळी फक्त हसू येते.

दुसरी गोष्ट ललित वाङ्मयाचे वाचन कलात्मक दृष्टीने व्हावे अशी जरी अपेक्षा असली, तरी फक्त त्याच दृष्टीने वाचन करणारे जाणकार समाजात तुलनेने फारच थोडे असतात. त्यांच्यांतही कलात्मक दृष्टी, कलात्मक मूल्ये ह्या बाबतींत एकमत नसते. कित्येक वेळा त्या बाबतीत गोंधळ असतो. पण असे होणे एखाद्या वेळेस परवडते; कारण ही बाब फक्त कलाक्षेत्रातच घडामोडी करीत असते. तिचा समाजातील सामान्य वाचकांशी फारसा संबंध येत नाही. पण जेव्हा हे टीकाकार संस्कृतीसारख्या सामाजिक बाबीला ललित वाङ्मयात धुंडतात नि तिचा शोध लावल्याचे मोठ्या आत्मविश्वासाने सांगतात, तेव्हा घोड्याच्या पागेत घुसून काही खेचरांनी केलेल्या धुडगुसाची आठवण होते.

पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. कलेची मूल्ये काहीही असली तरी समाजात बहुसंख्येने असलेला सामान्य वाचक हा कलाकृतीतील आशयाने प्रेरित होऊनच ललित वाङमयाचे वाचन करीत असतो. त्या वेळी कलेची मूल्ये बाजूला पडलेली असतात. कलामूल्यांचा तो विचार न करता कलाकृतीत आलेल्या विचारांनी, त्यातील पात्रांच्या कृतींनी, त्यातील जीवनपद्धतींनी, त्यातील भाषा-पद्धतींनी प्रेरित होऊनच तो तिच्याकडे पाहत असतो. प्रत्यक्ष वास्तव जीवनात तसे करण्याकडे त्याची अप्रत्यक्ष, प्रच्छन्न स्वरूपात प्रवृत्ती होत असते. ललित साहित्याची मूल्ये काहीही असली व ती सदैव बद्रलत असली तरी सामान्य वाचकाची ही दृष्टी समाजात कायम स्वरूपाची असते, हे आजपर्यंत तरी दिसून आलेले आहे.

हा सामान्य वाचक समाजात फार मोठ्या प्रमाणात आहे. कॉलेजांतील

पहिल्या दोन वर्षांतून, सर्व माध्यामिक शाळांतून, कारकून-वर्गांतून, कारखान्यांतून, स्वयंपाकघरांतून, सुखवस्तू श्रीमंत वर्गांतून, खेड्यापाड्यांतून सर्वत्र पसरलेला आहे. या सामान्य वाचकाची शाश्वत स्वरूपाची वर उद्धृत केलेली दृष्टी लक्षात घेऊन जर त्याला एखादे पुस्तक समजावून द्यायचे असेल तर त्या पुस्तकाची कलात्मक मूल्ये काय आहेत, ही बाब प्रथम सांगण्यापेक्षा त्याच्यात ' सामाजिक आशय ' काय आहे हेच प्रथम सांगणे कर्तव्य आहे. आणि जर एखाद्या कलाकृतीत ' सामाजिक आशय ' प्राप्त समाजाच्या दृष्टीने व सामान्य वाचकांच्या दृष्टीने अत्यंत हिणकस, विघातक, घाणेरडा, नैतिक अधःपात करणारा असेल तर ती कलाकृती सामान्य वाचकांच्या माथ्यावर ( केवळ कलात्मक मूल्ये श्रेष्ठ व चांगुली जोपासली आहेत म्हणून ) मारू नये. कारण आपणांस त्याची मर्यादा ठाऊक असते. त्या मर्यादेच्या बाहेरची बाब त्याच्यावर लादण्यात शहाणपणा नसतो. कारण, कलात्मक मूल्याशी त्याला फारसे कर्तव्य नसते. त्याच्यासाठी फार तर टीकाकारांनी ती कलाकृती कलात्मकदृष्टया श्रेष्ठ आहे असे आणि एवढेच नमूद करून ठेवावे आणि आपल्या कलाक्षेत्रात मग हवा तो वादविवाद घालत बसावे.

पण ' वासूनाका ' च्या बाबतीत ह्यातले काहीही साधलेले नाही. कारण सामाजिकदृष्टया तिच्यातील आशय अत्यंत हिणकस व विपर्यस्त आहे आणि कलात्मकदृष्टया ह्या पुस्तकाला काडीचीही किंमत नाही. शोध शोध शोधूनही तिच्यात काही कलामूल्ये जोपासल्याचे दिसून येत नाही. म्हणून सामाजिकदृष्टया हे पुस्तक जप्त करावे आणि कलात्मक मूल्यांचे मुखवटे पांघरून वाङमय टीकाकारांनी ह्या पुस्तकाची वकिली करू नये. तसेच ' वतागवाडी 'सारखी उत्कृष्ट कलाकृती निर्माण करणाऱ्या कलावंताने आपल्या पूर्वपुण्याईवर इथे जगू पाहू नये. व्यक्तीला ( कलाकृतीला नव्हे ) वाचविण्याचे आणि स्वतःची कातडी बचावण्याचे ते एक ढोंग होईल. आणि टीकाकार व लेखक या दोघांनाही गुन्हेगार मानावे लागेल.

**कारण सामाजिकदृष्टया—**

ह्या पुस्तकात ' पांढरपेशांच्या जीवनातील चिवट, गढूळ, हिंदकळणारा गाळही नाही, किंवा ' लेखकाला आलेल्या निर्मम करुणेपोटी 'ही ह्या कथांचा जन्म झालेला नाही. एकतर हा गाळ सर्वच प्रकारच्या जीवनांत, सर्व गावांत, सर्व समाजांत, सर्व काळी अशा टोळक्यांच्या स्वरूपात वावरत असतो. पण ह्या टोळक्यांच्या अशा स्वैर, पूर्वेतिहास नसलेल्या, विकृत चाळ्यांना, केवळ चाळ्यांसाठी चाळे करणाऱ्या चटावलेल्या विकारी मनांना समाजात नैतिकदृष्टया स्थान नसते. आणि अशा टोळक्यांच्या ह्या कृत्यांना आपण त्या सर्व समाजाची अगर जीवनाची ' संस्कृती ' मानण्याचाही मूर्खपणा कधी करत नसतो. कोणत्याही समाजातील, जीवनातील संस्कृतीचे स्वरूप पाहायचे असेल तर त्याचे निकष वेगळे

असतात, हे समाजाचा अभ्यास करणाऱ्यांना सांगावयास नको. समाजातील संस्कृतीचे स्वरूप सांगण्याचे कार्य समाजशास्त्रज्ञांनी डेटा गोळा करून त्यांच्या पद्धतीने खुशाल करावे; ललित वाङ्मयाच्या टीकाकारांनीही लुडबुड करू नये. कोणत्याही संस्कृतीचे दर्शन हे उद्योग नसलेल्या आणि काहीही कारण नसताना व स्वतःच्या बायका असतानाही केवळ 'दादा'गिरी करणाऱ्या किंवा डिटेक्टिव्ह गोष्टी वाचून केवळ स्टंटगिरीसाठी लैंगिक विकृती मिटक्या मारत बाळगणाऱ्या टग्यांच्या टोळक्यांच्या द्वारा होत नसते किंवा मनाची बीभत्सवृत्ती तृप्त करण्यासाठी केलेल्या सवंग नि हलकट बडबडीवरही त्यांचे तत्त्वज्ञान अवलंबून नसते.

संस्कृतीला परंपरा असते. एका विशिष्ट दिशेने ती वाटचाल करीत असते. डबक्यासारखी ती एकाच जागी कुजत राहत नाही. काळाच्या संदर्भात तिला विशिष्ट अर्थ प्राप्त होत असतो. जीवनाची ती एक पद्धती असते. प्राप्त स्वरूपात ती तशी का आहे, याला सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीयही इतिहास असतो. हे सर्व सांगितले की, सांस्कृतिक स्वरूप कळत असते. 'वासूनाका'त हे कुठे आहे? 'वासूनाका'त आहे ती टोळक्यांनी केलेली बीभत्स बडबड, केवळ लैंगिकतेसाठी केलेल्या भानगडी, नाक्यावरील हलकट गप्पा, गल्लींतल्या टोळक्यांनी मांडलेला उच्छाद, आणि लहान वयातही स्टंटगिरीसाठी प्यालेली दारू, सट्टेबाजी, वेश्यागमन आहे. त्यांचे करणे म्हणजे उग्र वास्तवाचे दर्शन आहे, असे सांगण्यात विपर्यास, तर्कदुष्टपणा आणि वकिली आहे.

## स्वयंसिद्ध कलाकृती नाही

'वासूनाका'त 'वाल पाखाडी'ची संस्कृतीच सांगावयाची असेल तर या सर्व टगे आणि पौगंडावस्थेत विकृत झालेल्या लैंगिक विकाराच्या कंपनीचा 'अर्थ' लावणे आवश्यक होते. 'वासूनाका' ही स्वयंसिद्ध कलाकृती असेल तर ती कुठे आहे? आहे फक्त लैंगिक बहिर्मुख वासनेचे, विकृत, वरचेवर तकलुपी, थिल्लर मन. या मुलांच्या मनांचा वेध घेण्याचा इथे कुठेही प्रयत्न नाही. ही पोरे कोणत्या वर्गातून पुढे आलेली आहेत, हे कळत नाही. आपल्या आई–वडिलांशी, बहिण–भावांशी, नात्यागोत्यांशी ही कशी वागतात, याचा इथे पत्ता नाही; किंबहुना त्यांचे हे सगेसोयरे फक्त नावापुरतेच इथे येतात. त्यांच्यापासून ही पोरे तोडून काढलेली आहेत. नोकरी कधी करतात नि वरिष्ठांशी ही कशी वागतात, तसेच वरिष्ठांचे यांच्याशी संबंध कसे असतात, हे कळत नाही. यांचा चरितार्थ कसा चालतो? पोटा-पाण्याच्या धडपडीला यांच्या जीवनांत काहीच स्थान नाही का? आई–वडिलांनी यांना असे कसे सोडले? आई–वडील यांच्याकडे कोणत्या दृष्टीने पाहतात? आई–वडिलांची संस्कृती नि आणि यांची टगेगिरी, संभोगगिरी यांचा नेमका काय संबंध आहे? त्यात काही संघर्षच नाही का?

बायको असूनही वेश्येकडे जाणे ही मनाची विकृती आहे, की चटक आहे ? आठ–दहा वर्षांचा जो काळ दाखविला आहे त्या काळात यांच्या मनात लैंगिक वासना-विकार याशिवाय दुसरे काहीच येत नाही का ? जर असेच असेल तर लैंगिक-दृष्टयाच ही अशी वासनातृप्त होऊनही अशीच का फसफसतात आणि यांच्या इतर भाव–भावना थंड का झाल्या ? बायको–पोरांशी यांचे संबंध-संघर्ष, प्रेम, राग-लोभ, नाते काय आहे ? अॅडव्होकेट पंडित, पोक्याची आई, मामूचे आई–वडील, इतरांचे ( कुठेही उल्लेख नसलेले ) आई–वडील यांच्या दृष्टीने या पोरांचे स्थान व स्वरूप काय आहे ? या प्रश्नांची उत्तरे जर ' वासूनाका 'त मिळाली असती तर ती वालपाखाडी–संस्कृतीचे दर्शन घडविणारी आणि स्वयंसिद्ध कलाकृती झाली असती. ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे तटस्थपणे, गंभीरपणे, सगळ्या प्रामाणिकतेशी मिळाली असती तर यांच्या संस्कृतीचे नेमके स्वरूप कळले असते. पण इथे हे सर्व टाळलेले आहे. आणि जे आहे ते बीभत्स, चकाट्या मारणाऱ्या, वाहवलेल्या सवंग मनाचे, कळपाने राहणाऱ्या माणसातल्या जनावरांचे, लैंगिक तेवढेच टिपणाऱ्या हलकट आणि कलाबाह्य लेखणीचे, स्वतःच्या कामी विकृती-वासनांना प्रच्छन्न स्वरूपात चघळचघळ चघळणाऱ्या लेखकाच्या विकारांचे हे दर्शन आहे. त्याने वेळ नि सुटी मिळेल तेव्हा 'वासूनाक्या'-वर जाऊन तिथल्या टोळक्यांच्या ह्या लिंग–गप्पा ( एक खरी नि दहा खोट्या ) नोटबुक नि पेन्सिल घेऊन मिळवलेल्या दिसतात. आणि त्याच नोट्स नि टिपणे एकमेकाला किंवा एकएक व्यक्तीच्या नावे सारख्या प्रमाणात वाटून हे चोपडे घाईघाईने खरडून काढलेले दिसते. याच्या पाठीमागे ना विचार ना प्रगती, ना दिशा ना सलगता, भलत्याच कामगंडाने ह्या गोष्टी चघळलेल्या आहेत. ( वास्तविक, अशा घटना व भानगडी सर्वच गावांत, समाजांत नि संस्कृतीत व काळात पाण्यावरच्या पाला-पाचोळ्याप्रमाणे तरंगत असतात. पण लेखकाला ती माहिती नवीनच वाटली. तीच माहिती त्याने तशीच मनोमन सगळ्या वालपाखाडीला चिकटवली. ) 'वालपाखाडी'तल्या अशा लिंग-घटनांचे तुकडे कापून घेऊन त्याने एकत्र जोडले आहेत व बाकीचा समाज व संस्कृती बाजूला फेकून दिलेली आहे, म्हणून या ' वासूनाका 'तील आशय भडक, विकृत, विपर्यस्त आणि अश्लील स्वरूपात आलेला आहे. पुस्तक जप्त व्हावे असे वाटते, ते याचसाठी.

कलात्मकदृष्ट्या हे पुस्तक कवडीच्याही किंमतीचे नाही. हा फसलेला कलात्मक प्रयोगही नाही. ( कारण प्रयोगात Sincerity असते. घाटाच्या दृष्टीने नवी गंभीर धडपड असते. फसलेल्या प्रयोगातही कलेच्या काही खुणा दिसत असतात. तिचा फसलेला आकार ध्यानात येत असतो. ) ' वासूनाका 'त तो कुठेही दिसून येत नाही. आणि त्या दृष्टीने धडपड केल्याचे काहीही पुरावे मिळत नाहीत. ... उलट सर्वत्र वाहवलेपणा नि नाकातोंडात पाणी जाईल, इथपर्यंत बुडून त्या

आशयाच्या मिटक्या मारण्याची अकलात्मक दृष्टीच दिसून येते.

## निर्जीव चित्रण

कारण 'वासूनाका'त जी आठ-दहा पोरांची टोळी दाखविली आहे, त्यातील एकालाही स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा चेहरा नाही. पोक्या लक्षात राहतो ते केवळ निवेदन करतो म्हणून. मामू त्या कंपनीचा दादा म्हणून. ('मेहमान' ही एकच कथा तेवढी टग्याचे व्यक्तिमत्त्व उभी करते.) बाकीची मंडळी आठ-नऊ जणांची गँग तयार करण्यासाठी घेतलेली दिसतात. अधून मधून एखादा किस्सा त्यांच्या नावावर आहे. किंबहुना ही सर्वच पात्रे एकाच चेहऱ्याची वाटतात. कारण त्यांनी स्वतःचे असे स्वतंत्र अस्तित्वच कुठे सिद्ध केले नाही. सगळी एकाच प्रकारच्या घटना करतात. एकाच वासनेने बरबटलेली आहेत. या एकाच प्रकारच्या घटना व वासना व्यक्त करीत असतानाही प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वानुसार त्या त्या कृतींना वळण मिळणे अशक्य नव्हते. पण काही नाही. पोरींना ते 'घुमवतात' एवढेच सर्वत्र कळत राहते. यांची जात कोणती ? कोणकोणत्या परिस्थितीत प्रत्येकजण आज दिसतो, तसा निर्माण झाला ? ती अशी वागण्याची निरनिराळी परिस्थितीजन्य, शारीरिक, मानसिक, घरगुती, लैंगिकविषयक अशी काही कारणे, अशी काही काही सुसंगती दाखविली असती तर 'अनामिके'तील वेश्यांप्रमाणे प्रत्येकाला व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले असते. पण हे सगळे निर्माण करायला लेखकाला माहिती मिळाली नसावी, वेळ मिळाला नसावा अगर तो वाहवत गेलेला असावा. आणि शेवटचे मतच जास्त बरोबर वाटते. कारण सर्वच बाबतींत त्याची ही तऱ्हा झालेली आहे.

सर्वच कथांत एकाच प्रकारच्या भानगडी आहेत. त्यांच्यांत तिळमात्र विविधता नाही. त्यांच्या आधाराने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडणे आवश्यक असते. ते कुठेही घडत नाही. विविधता ही विविधतेसाठी नको असते. तिच्यामुळे कथेतील पात्रांच्या जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविण्यासाठी ती हवी असते. पण हे दर्शनही नाही नि विविधताही नाही. आहे ते एकच एक प्रकारच्या हलकट भानगडींच्या द्वारा केलेले अचकट-विचकट प्रदर्शन. ललित साहित्यात असे प्रदर्शन वर्ज्य असते. दर्शन हवे असते. शोध-वेध, मनाचे एकापाठोपाठ एक उलगडलेले पापुद्रे कलावंत पकडत असतो. इथे फक्त फिल्मी चित्रीकरण आहे. या चित्रीकरणाला लैंगिकतेचाच एकच एक भडक रंग आहे. तोच तो रंग प्रत्येक पात्राला व त्याने केलेल्या भानगडींना असल्यामुळे घटनांत शेवटी विकृती निर्माण झालेली आहे. (प्रत्यक्षातील विकृती आणि वाङ्मयीन विकृती ह्या भिन्न भिन्न असतात हे जाणकारांना सांगणे न लगे.) पहिल्या एक-दोन कथांतच ह्या घटनांचा रंग निश्चित होतो. पुढे या रंगावर त्याच रंगांची फेकाफेक करून थापे मारलेले आहेत. म्हणून मूळ चित्रातील कलात्मक छटा जाऊन एकाच रंगाने ती विकृत नि भडक झालेली आहेत.

एकाच आवडीच्या रंगात लेखक वारेमाप रंगून गेल्याने त्याचीच Abnormal वृत्ती सर्वत्र दिसून येते. तो जर नॉर्मलवर असता तर त्याला कळून आले असते की, प्रत्यक्ष जीवनातील विकृती दाखविण्यासाठी वाङ्‌मयीन कलाकृतीही अशी विकृत करण्याची गरज मुळीच नसते.

यातील कोणतीही भानगड कुणाच्याही नावावर चालण्यासारखी आहे. कोणत्याही कथेचे शीर्षक इतर कोणत्याही कथेला देता येण्यासारखे आहे. इतक्या ह्या कथा, कथांतील पात्रे, कथांतील भानगडी एकाच स्वरूपाच्या आहेत. ह्या भानगडींना समाजाच्या संदर्भात विशेष असा अर्थच प्राप्त होऊ शकत नाही. सगळचाच फिल्मी, यांत्रिक नि निर्जीव वाटायला लागतात. त्यांत प्राणच भरत नाही. ललित वाङमयाच्या कलाकृतीत जो चैतन्याचा प्रत्यय यावा लागतो, तो इथे कुठेच येत नाही. (चैतन्य म्हणजे अनुभवातील सत्यता व तिचा प्रत्यय, असा अर्थ अभिप्रेत आहे.) सगळेच चघळचघळ चघळलेले वाटते. स्वतःच्या रंग-रेषा हरवून बसते. याच्या उलट 'वेशांचे जीवन' हा एकाच स्वरूपाचा आशय असलेल्या अरविंद गोखले यांच्या 'अनामिका' कथा-संग्रहातील कथा पाहाव्यात. वास्तविक, 'संभोग' हा त्या वेश्यांच्या जीवनांतील एकमेव धंदा. गोखले यांच्यांत जर 'भाऊ पाध्ये'मधील काम-गंड विकृतपणे आला असता तर 'अनामिका'चा 'वासूनाका' व्हायला फार वेळ लागला नसता. पण गोखल्यांची कलावंताची भूमिका क्षणभरही ढळलेली नाही. तोल लेशभरही कुठे गेलेला दिसत नाही. यामुळेच त्या एकाच प्रकारच्या जीवनातील प्रत्येक कथा, कथेतील प्रत्येक वेश्या, व्यक्ती आपले स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करते आणि त्याचबरोबर त्या जीवनावर, त्या संस्कृतीवर, त्यातील विदारकतेवर, असहाय्यतेवर, संभोगाच्या यांत्रिकतेवर प्रभावीपणे प्रकाश पडतो. सगळचाच वेश्या; पण त्यांच्या स्वभावांचे, व्यक्तित्वाचे पैलू अत्यंत कलात्मकतेने गोखल्यांनी कोरलेले आहेत, म्हणून प्रत्येक व्यक्तीत प्राण भरला आहे. संभोगाचा एकमेव धंदा असलेल्या जीवनांतील 'उग्र वास्तवते'चे विविध पैलू दाखवले आहेत. कथांतील, घटनांतील विरोध, विसंगती, ताण यांनी कथांना सघनतेचा पीळ भरला आहे.–'वासूनाका'त ही सघनता शोध शोध शोधूनही मिळत नाही. कुठल्याही पात्राच्या मनात संघर्ष नाही. सगळे ढिसळ, भरड, वरवरचे. ना शोध, ना वेध, ना दर्शन.

हे सगळे आहे असे कधी म्हणता आले असते ?–त्यांचे आई–वडील, बहीण–भाऊ, त्यांची आर्थिक परिस्थिती, त्यांची बायका–पोरे, त्यांच्या इतर भाव–भावना, त्यांच्या पूर्वायुष्याचा त्यांच्यावर झालेला परिणाम, त्यातून तो 'वासूनाका टाईप' होईपर्यंत त्यांचा झालेला विकास, त्यांचे शिक्षण या सर्वांशी त्यांचे मन कसे वागते, या सर्वांशी घडणाऱ्या विरोध, विसंगती, शरणागती आणि या सर्व संदर्भात निर्माण होणारे परस्पर तणावे यांचे दर्शन घडले असते, तर ही टोळी जिवंत वाटली असती. या कथांतून प्राण भरला असता त्यांच्या कृतींना प्रत्ययाचा अर्थ आला

असता. सबंध पुस्तकभर रंगवलेला ' मामू ' वेडा झाला. हे त्याच्या स्वभावाशी सुसंगत आहे काय ? पोक्याला बायको असून पोक्या वेश्येकडे का जातो ? त्याची आई, बहीण, बायको या स्त्रियांकडे तो कोणत्या दृष्टीने पाहतो ? डाफ्या व डाफ्याच्या वहिणीचे संबंध कसे होते ? येप्पी अशी का वागत होती ? फोमण्या परसू, त्याचे हिंदुधर्मशास्त्राविषयीचे बोलणे आणि येप्पीबरोबर राहणे यांतील सुसंगती नेमकी कोणत्या स्वरूपाची होती ? डाफ्या कोण ? त्याच्या आई–बापाचा पत्ता काय ? पोक्याच्या आईचा पोक्यावर संपूर्ण विश्वास आहे का ? नसेल तर मग ती त्याला पूरक–पोषक एवढेच कसे बोलते ? ढापण्या मामासारखा जख्ख म्हातारा ह्या वयातही ककीसारख्या पोरीच्या मागे का लागतो ? त्याचा ह्या विकृतीचे स्वरूप काय सर्व प्रश्नांची व प्रत्येक कथेत निर्माण होणाऱ्या अशा अनेक प्रश्नांची उत्तरे जर मिळाली असती, तर 'वासूनाका' ही ' कलाकृती ' झाली असती. घटनांच्या बाबतीत तिच्यात तारतम्य आहे, तोल आहे; भडकपणा व विकृती नाही असे म्हणता आले असते. अशा प्रकारच्या घटनांमुळे सर्वच कथा शेपूट–तुटक्या वाटतात. त्यांना आकारच येत नाही. त्या चिघळलेल्या वाटतात.

यामुळे सगळी पात्रे बाहुल्यासारखी साधनीभूत आणि यांत्रिक वाटतात. ' वासूनाका 'वर लेखकाला मिळालेल्या टिपणांचा भार वाहणारी वाटतात. त्यामुळे ती निर्जीव चित्रे झालेली आहेत. त्यांचे मनच समजत नाही. (वास्तविक चित्रांना मन नसते, प्राण नसतो, त्यांची हालचाल दुसऱ्या कुणीतरी करवावी लागते, हे सत्य आहे.) मानवी जीवनातील लैंगिकतेचा, बीभत्सतेचा, अपवादात्मक घटनांनी युक्त असा एक अती क्षुद्र कोपरा; त्यालाच सर्व जीवन मानण्याचा अतिव्याप्त दोष इथे सर्वत्र निर्माण झाल्यामुळे ही सगळी पात्रे खोटी आणि कळसूत्री वाटतात, हे उघड आहे.

या पुस्तकात ज्या घटना घेतलेल्या आहेत; त्यांच्या निवडीत तर अशा रीतीने प्रमाणबद्धता नाहीच पण हे घेतलेले प्रसंगही प्रमाणबद्धतेने मांडलेले नाहीत. दिशाहीनपणे ते घरंगळत राहिलेले आहेत. या घरंगळत राहण्यामागेही चघळ वृत्तीच आहे. मामूची आणि मानूची मानगड सांगण्यासाठी मोन्या येतो. अर्थात त्या वेळी पोक्याही त्यांची भानगड सांगून मोकळा होत नाही. आपला साग्रसंगीत मूळ संदर्भात अनवश्यक इतिहास सांगून मग ' सिनेमात मामू आणि मानू ' स्वतःच्याच शेजारी बसले होते ही बाब सांगतो. ' घमाल ' मधील पहिली एक–दोन पाने अनवश्यक नमनालाच गेलेली आहेत. ' इशारा'मध्ये माहिती फक्त ' सू ' ची सांगायची असते. पण ती जिथे राहते त्या पापामियाच्या चाळीची लैंगिक माहिती चघळपणे दिलेली आहे. या माहितीने ' सू ' च्या स्वभावावर काहीच प्रकाश पडत नाही; उलट निवेदनातील चघळपणा मात्र दिसतो. प्रत्येक कथेतील प्रत्येक प्रसंग असा गटार न मिळालेल्या सांडपाण्याप्रमाणे दिशाहीनतेने वाहत जातो आणि एकदाचा मूळ

हेतूला येऊन मिळतो. मूळ कथा-हेतूच्या संदर्भात त्या वाहण्याला काडीचेही स्थान नसते. अशी मिटक्या मारत लिहिण्याची वृत्ती सर्वच कथातून भरून उरलेली आहे.

'वालपाखाडी'चे वातावरण निर्माण करण्यातही तारतम्यबुद्धी नाही. ह्या पोरांच्या कंपनीची घरे मनासमोर काहीकेल्या उभी राहत नाहीत. मामा सुर्वे याचे घरही धर्मशाळेसारखे वाटते. मुलींची खणा–नारळाने ओटी भरणाऱ्या, लग्नाला जाणाऱ्या पोक्याच्या आईचे घर आहे. अॅडव्होकेट पंडिताचे घर आहे. मामूला विरोध करणारी त्याची आई व आबा आहेत. बाबलची सुशिक्षित मुले आहेत. बायजीचा घरंदाज नवरा होता. मारवाड्याची दुकाने आहेत, कंपनीच्या भानगडीत न पडणाऱ्या पब्लिकची घरे आहेत. या सर्वांनी 'वालपाखाडी'त स्वतःचे असे काही वातावरण निर्माणच केले नाही का, असा प्रश्न पडतो. कारण ही सगळी मंडळी 'वालपाखाडी'त उपऱ्यासारखी दिसतात. त्यांना तिथे काहीच स्थान नाही असे दिसून येते. दिसते ते फक्त भानगडी करणारे टोळके व भानगडी करणाऱ्या बदफैली स्त्रिया आणि पोरी. वातावरणाचा हा एकच रंग सर्वत्र फसफसून उतू गेलेला दिसून येतो. बाकीच्या रंगावर लेखकाने स्वतःच्या विकृतीमुळे डांबर फासले आहे. आणि वालपाखाडी = वासूनाका मंडळाची संस्कृती असे अतिशयोक्त नि अतिव्याप्त दोषांनी युक्त असे स्वरूप दिले आहे.

## अश्लील भाषा

या सर्व बाबतींत जे झाले तेच भाषेच्या बाबतीतही झाले आहे. भाषा ही ललित वाङ्मयात साधनीभूत असते. तिला साध्याचे स्थान कधी देता येत नाही. एखाद्या जीवनक्षेत्रातील भाषा जर त्या विशिष्ट जीवनक्षेत्रातील अनुभवांतून प्रेरणा घेऊन वाङ्मय निर्मिती होत असेल, तर ती त्या विशिष्ट वाङ्मयात प्रभावी साधन म्हणून कार्य करीत असते. पण केवळ तिच्यातील संकेत, शब्द, वाक्-प्रचार, ढब यांच्याच-साठी तिचा ललित वाङ्मयात वापर झाला तर तिचे प्रदर्शन होते. साधनाचे स्वरूप जाऊन तिला साध्याचे स्वरूप येते. एकदा जर असे भाषेला साध्याचे स्वरूप ललित वाङ्मयात आले तर तिच्या आधाराने निर्माण होणाऱ्या कलाकृतीचा घाट बिघडतो. जे सांगावयाचे त्यातील Sincerity बाजूला जाऊन सवंगपणा प्राप्त होतो. मूळ आशय त्या भाषेतील अनाहूत येणाऱ्या अर्थामुळे विकृत होतो. 'वासूनाका' पुस्तका-तील भाषेच्या बाबतीत नेमके असे झाले आहे. लेखकाने तिच्या नादी लागून; कलाकक्षेच्या बाहेर वाहवत जाऊन एक स्टंट केलेला आहे. त्यामुळे ती आपल्या स्थानावरून भ्रष्ट झाली आणि लेखकाच्या इच्छेमुळे चघळ आणि भरड झालेली आहे. ती भाषा आपण आत्मसात केली आहे हे दाखविण्यासाठी लेखकाने तिचे अवाङ्मयीन नागडे प्रदर्शन केले आहे. तिच्यातील आवश्यकता व अपरिहार्यता त्यामुळे कुठेच राहिली नाही. पानोपानी याची उदाहरणे आहेत.

पहिल्याच कथेत भानूच्या शरीराचे वर्णन करण्याची लेखकाला आवश्यकता वाटली. त्याने तिचे वर्णन केले, " भानू एक ' वासूनाक्या 'वरची ' पणती ' होती. प्रश्नच नाही. तिला नहाणही आले नव्हते, त्या वेळीच मी तिचे भविष्य वर्तविले होते, की ही पोरगी ' वासूनाक्या ' वर मानगडी माजवणार." भानूच्या शरीराच्या ठेवणीची कल्पना यायला एवढे वर्णन पुरेसे आहे. पहिल्या वाक्यातील ' पणती ' हा शब्दच इतका प्रभावी की त्यावरून तिच्याविषयी पुरुषांना काय वाटत होते याची संपूर्ण कल्पना येते. ही संपूर्ण कल्पना येऊनही लेखक तिथेच थांबलेला नाही, तर त्याचा कलात्मक तोल ढळून त्याच्या मनाचे गटार वासनेच्या कलाबाह्य वळणाने पुढे गेलेले आहे. लगेच तो पुढल्या परिच्छेदात पुन्हा तिचे वर्णन कसे करतो पाहा. "...भानूचा दाणा सणसणीत भरू लागला होता ! आणि चालताना तिचा पुठ्ठा काय उडत होता. माझ्या तोंडाला पाणी सुटले होते....मी म्हणत असे, "क्या चीज है ! पणती है पणती ! " या वर्णनाने वरील वर्णनामुळे येणाऱ्या कल्पनेपेक्षा जास्त काय साधले ? काहीच नाही. दिला तो फक्त एक शॉक्. भाषेचा भीषण आणि चघळ उपयोग. कलाबाह्य लैंगिक शब्द वापरण्याचे बेमुर्वतखोर धाडस. चघळचघळ चघळण्याची लेखकाची वासनिक विकृती. म्हणून हा दुसरा उतारा अश्लील आहे. तो वाङ्मयीन हेतूसाठी आलेला नाही. अशी वाङ्मयीनबाह्य हेतूने प्रेरित झालेली म्हणून आणि अश्लील असलेली वर्णने पानोपानी आहेत. ' भ्यांचोद ' ही शिवी प्र. के. अत्र्यांनी सबंध पुस्तकात ३२–३३ वेळा आल्याचे आपल्या अग्रलेखात सांगितले. ' वासूनाका ' वाचण्याच्या अगोदर तो लेख वाचला, तेव्हा अत्र्यांचे चुकले असे वाटले. कारण ललित वाङ्मयाचा आस्वाद घेताना एखादा शब्द त्यात किती वेळा आला हे अत्रे कशाला मोजत बसले, असा प्रश्न पडला. पण ' वासूनाका 'त पानोपानी कारण नसताना औचित्य व प्रयोजन सोडून बांडगुळासारखा त्या शिवीचा उपयोग केला आहे. त्यामुळे अत्र्यांना ती शिवी मोजण्याची बुद्धी का झाली हे कळले.

' भ्यांचोद ', ' च्यायला ' इत्यादी अनाठायी उपयोजिलेले शब्द हे केवळ लेखकाची वासना चिवडण्यासाठी आलेले आहेत याचे पानोपानी पुरावे पसरलेले आहेत. ' खुजली 'मधील ककीची मावशी आणि मामू यांच्यामधील ककीच्या संदर्भातील संवाद पाहण्यासारखे आहेत. स्वतः मावशी ' मामू 'सारख्या मवाल्याशी आपल्या बहिणीच्या सख्ख्या मुलीविषयी काय म्हणते व कोणकोणत्या गोष्टींना होकार देते ते पाहण्यासारखे आहे. सभ्यपणाने वागणारी पोक्याची आई ककीच्या संदर्भात औरस मुलापाशी काय म्हणते ते पाहा. " ... खरं म्हणजे आमची आई म्हणेल, मुलगी आंधळी पांगळी, कशीही असेल तरी मी करीन. पण बारा बोड्याचा पोरी अंगाला सोनं लिपून आल्या तरी मी त्यांच्याकडे बघणार नाही... ..." यातील भाषेच्या वाङ्मयबाह्य धाडसाबद्दल वेगळे बोलण्याची आवश्यकता नाही. कोण-

तीही आई मुलाजवळ अशा भाषेत बोलेल का एवढाच इथे प्रश्न आहे. – ' फिरकी ' मध्ये बायजीची कथा सांगितली आहे. विषय ' बायजी ' हाच आहे. पण तिच्याविषयी निवेदन सरळपणे न करता लेखक ( पोक्या ) म्हणतो की, " बायजीचे ' स्टँडर ' काय वगैरे पर्वा करत नव्हतो. ' वासूनाक्या ' वर आम्ही तिच्याबद्दल तोंडाला येईल ते ' ओपन ' बोलत होतो," असे म्हणून तोंडाला काय काय येत होते त्याचा तपशील त्या भाषेमध्ये देतो. ( ते प्रत्यक्षातच वाचावे. ) – " तोंडाला येईल, ते बोलत होतो " एवढे सांगितल्यावरही त्याचा तपशील देण्याची कथेच्या संदर्भात काय अवश्यकता होती ? – ' दिल फेक ' मध्ये सत्यनारायणाच्या महापूजेच्या वेळी व्हालेंटिअरगिरीचे काम या कंपनीकडे येते. आणि ते ती इमानाने पार पाडते, असे लेखकाला पोक्याच्या द्वारा सांगायचे आहे. तो उतारा पाहा. "...... वालेंटिअरगिरीचे काम पूजाकमिटीने आम्हांलाच दिलेले असते. कारण कमिटीला पण माहीत आहे की बाहेरची माणसं जर भानगड करायला लागली तर आमची कंपनीच उपयोगी पडणार आहे. आम्ही पण वालेंटिअरगिरी इमानाने करतो. देवाच्या कार्यामध्ये आम्ही भानगड करणार नाही......." एवढे सांगितले असते तर त्यांच्या वालेंटिअरगिरीची पूर्ण कल्पना आली असती. काहीही सांगण्यासारखे उरले नसते. पण त्याच उताऱ्याच्या पुढे एक काहीही वाङमयीन-हेतू साध्य न करणारे "...... आज जर आम्ही कोठल्या पोरीची छेड काढली...... तर आम्ही गू खाल्ला असंच समजतो ! ' असे वाक्य आहे, या वाक्याचे मूळ कथेत काय प्रयोजन आहे ? ते नसते तर त्यांचा इमानीपणा सांगण्यात कोणती कमतरता पडली असती काय ? वास्तविक वरच्या म्हणीच्या अर्थाचे ' इज्जत जाणे, इज्जत खराब होणे ' असे वाक्प्रचार याच पुस्तकात इतरत्र अनेकवेळा आलेले आहेत. – ' आवाज ' मधील बाबलची बायको प्रत्यक्ष भोग घेणाऱ्या नवऱ्याजवळ "...... तुझी बायको आहे, बायको ! इतकी वर्षं तू माझ्याबरोबर शय्या केली आहेस......" अशा शब्दांचे वाक्य बोलते. पण तीच बायको ( की जिला ' शय्या ' शब्द योग्य ठिकाणी वापरण्याची अक्कल आहे ती ) परका पुरुष असलेल्या पोक्याजवळ मात्र आपल्या नवऱ्याविषयी; "......भडव्यानं ( नवऱ्यानं ) वाटेल त्या बाईला लागून यायचं आणि त्याच XX नं मला लागायचं !... मला रोग लागला," असा फुली घातलेला शब्द वापरते. हें सुसंगत आहे काय ? नसेल तर मग लेखक हे शब्द का वापरतो ?

या सर्वांचा अर्थच असा की भाषेचा वापर वाङमयीन साधन म्हणून झालेला नाही. नवी भाषा लेखकाला मिळाली म्हणून तिचा अनाठायी, चघळपणे, मिटक्या मारत, चाटत–हुंगत उपयोग केलेला आहे. ही त्याची अत्यंत निकृष्ट दर्जाची विकृती आहे. लैंगिक शब्द वापरल्याने वाङ्मयात अश्लीलता निर्माण होत नसते. पण ते अशा रीतीने वापरल्याने अश्लीलता निर्माण होते. अशा लैंगिक शब्दांचा व भाषेचा अशा रीतीने वाङ्मयबाह्य प्रेरणेने वापर झालेली अशी अनेक ठिकाणे या

पुस्तकात आहेत. म्हणून हे पुस्तक अश्लील आहे.

भाषेचा अशा रीतीने अश्लीलतेसाठी तर उपयोग झालेलाच आहे. ( तशी उदाहरणेही अनेक मिळतात. ) पण त्याचबरोबर लेखक मध्यमवर्गीय असल्याने व त्याची भाषा वेगळी असल्याने आणि 'वासूनाक्या'तील मंडळींची भाषा तो स्वतः न जगल्याने प्रस्तुत पुस्तकातील भाषेत अनेक प्रकारची आत्मविसंगती दिसून येते. अर्थात हिला आत्मविसंगती म्हणायची की, पोक्याच्या भाषेतील विसंगती म्हणायची, हा प्रश्न आहे. वाङ्मयीन दृष्टिकोनातून या भाषेकडे पाहिले तर ती पोक्याच्या भाषेतीलच विसंगती म्हणणे प्राप्त होते. नमुन्यासाठी काही उदाहरणे देत आहे.

"मामूची दणकट हाक, माझे काळीज चरकले, वळून पाहिले तर मामू वाल्या कोळ्याप्रमाणे उभा, अंगावर फाटकी गंजी, मांड्या न झाकणारी चड्डी, दाढी वाढलेली व केसांना तेलाचा टिपूस माहीत नाही," — डोकं ठिकाणावर ठेवून पोक्याला असे सरळ वाङ्मयीन विवेदन करता येते. "तिच्या प्रियकराच्या तिला कवेत घेण्याच्या प्रयत्नातून मोकळे होत, त्याच्या कानात कायसेसे म्हणाली आणि तिने त्याला चूप बसविले." अशी दीर्घ पल्ल्यांची, सरळसरळ प्रगल्भता दाखविणारी वाक्ये पोक्याचीच आहेत. "बायजी माझ्याजवळ आली. आपल्या साऱ्या शरीराला माझ्या डोळ्यांत कोंबत होती. तिच्या साऱ्या शरीराची शोभा लुटण्यासाठी मला आवाहनच करत होती. मी बायजीचा हात आवेगाने हातात घेतला. म्हणालो,

"I am very happy. You make me — तिने मला कडकडून आलिंगन दिले. माझ्या ओठांवर ओठ टेकले. मी बेभान झालो." शृंगार सुसंस्कृतपणाने व्यक्त करणारी ही सबंध उताऱ्यातील भाषाही पोक्याचीच. 'तिने आज्ञापिले.' 'पुण्यातील संस्कृती-संरक्षकाप्रमाणे...' इ. सुसंस्कृत वाक्प्रचारही पोक्याचेच. एवढे सगळे माहीत असलेला पोक्या "तिच्या मडगार्डावर नजर ठेवून आम्ही चाललो होतो", "गांडीवर तुम्ही लाथ मारलीत तरी त्याच्या तोंडामधून एक शब्द येणार नाही," "अरे, हा आकड्याचा नाद एकदम खराब. या पा दुसऱ्याच्याखाली माणूस आपली बायकोही झोपवील", अशी अनेक वाक्ये आणि मूळ कथेच्या संदर्भात तशा स्वरूपात येण्याचे काहीही प्रयोजन नसताना अवून-मधून ओकून जातो.

अशा वापराने भाषेचे स्वरूप फक्त सिद्ध झाले. कथेचे नाही. कलेचे नाही. ( पण भाऊ पाध्यांना ठाऊक आहे की भाषेचे स्वरूप सिद्ध करण्याचे ललित साहित्य हे स्थान नव्हे. त्यासाठी भाषाशास्त्राचे अफाट विश्व इतरत्र पसरले आहे.)

या शिवाय कित्येक ठिकाणी 'बाप' तर कित्येक ठिकाणी 'बापूस.' मामूची भाषा वेगळी तर प्रत्यक्ष त्याच्या आईची भाषा वेगळ्याच प्रदेशातली. त्या प्रादेशिकतेचा मामूच्या भाषेवर काडीचाही परिणाम नाही. अशा फुटकळ भाषिक

विसंगती अनेक सापडतात. भाषेची Pose घेण्याच्या हव्यासात हे असे तोंडघशी पडणे होते. ललित साहित्यात भाषा वापरण्यासाठी ती जगावी लागते ती याचसाठी. ( हे व्यंकटेशी माडगूळकरांच्या अगोदरच्या अनेक ग्रामीण लेखकांनी पूर्वीच दाखवून दिले आहे. ) नुसती माहिती करून तिचा वापर केला, की व्यवहार चालतो. पण वाङ्मयात हसे होते.

म्हणून ‘ वासूनाका ’तील भाषेचा ललित साहित्याचे साधन म्हणून विचार केला असता; ती अत्यंत खोटी, स्वतःचे सामर्थ्य न ओळखता वास्तवातून तशीच उठून ( शिवाय लेखकाच्या स्वतःच्या भाषेच्या संकरासह ) ‘ वासूनाका ’त फतकल घालून बसलेली दिसते. वास्तविक कलावंत, हा वास्तवातील भाषेत विस्कळित होऊन पडलेले सुप्त सामर्थ्य आणि सौंदर्य ओळखतो. तिच्यावर कलेच्या साधनाला पोषक असे, पण वास्तवतेला फारसा धक्का न लावणारे, स्वतःच्या कलात्म व्यक्तिमत्त्वानुसार संस्कार करतो आणि मगच तिचा वापर करतो. आशयाच्या बाबतीतही असेच असते. जीवनातील अनुभवातून कला आशयाची प्रेरणा घेते ती अशा अर्थाने. ललित साहित्यातील भाषा घडली जाते तीही अशाच अर्थाने हे कलात्म संस्कार ‘ वासूनाका ’तील भाषेवर मुळीच झालेले नाहीत. इतकेच नव्हे तर लेखकाच्या मध्यमवर्गीय भाषिक व्यक्तिमत्त्वाचा अवाङ्मयीन परिणाम त्या मूळ भाषेवर होऊन ती विकृत झालेली आहे. म्हणूनच त्याच कंपनीतला पोक्यासुद्धा त्यांना नेहमीच्या वाटणाऱ्या पण मध्यमवर्गीय माणसाला नवीन वाटणाऱ्या शब्दांना एकेरी अवतरणे देतो. काही ठिकाणी मध्यमवर्गीय भ्याडपणातून फुल्या घालतो. काही ठिकाणी तात्कालिक धाडस करून कारण नसताना घाणेरडे बोलून जातो. ‘ भ्यांचोद ’, ‘ च्यायला ’ इ. शब्द सावधपणाने सारखा वापरत राहतो. वास्तविक, ही जाणीव पोक्याची नाही. पोक्याची जर ही नेहमीच भाषा असती तर तिच्यात अकारण नागडे प्रदर्शन, अप्रयोजक अश्लीलता, उथळ व सवंगपणा आला नसता. ( त्याने ‘ पडघवली ’च्या नायिकेप्रमाणे ती भाषा Sincerly वापरली असती. ) मग असे का झाले ? याला कारण लेखकाच्या मनातील विकृती.

आशय, पात्रे, प्रसंग, वातावरण, भाषा, घटना इ. सर्व बाबतीत लेखकाची विकृती दिसून येत असल्याने हा फसलेला प्रयोगही नाही हे कटाक्षाने लक्षात ठेवले पाहिजे. वाङ्मयबाह्य कारणांनीही निर्मिती झालेली आहे. कदाचित हा स्टंट असेल; कदाचित स्वतःला कोणत्यातरी निमित्ताने गाजवून घ्यायचे असेल, कदाचित आर्थिक कारणही असू शकेल. कदाचित् धंद्याची बाबही असेल; काही नक्की सांगवत नाही. पण सामाजिकदृष्ट्या हे पुस्तक विघातक आहे आणि कलात्मकदृष्ट्या ते काही किंमतीचेही नाही; म्हणून पहिल्या कारणासाठी ते समाजातून नाहीसे करणे अत्यंत आवश्यक आहे. ●



# जे नव्हते ध्यानी मनी

## We never meant to go so far

या माविस रॉन्सनकृत पुस्तकाचा परिचय

लेखांक चवथा

[ माविस व बार्बारा यांचा दिल्लीतील वर्मांच्या घरचा पाहुणचार आटोपला आणि ...... ]

सेवाग्राम व ताजमहालच्या भेटी उरकून माविस व बार्बारा अजिंठ्याला आल्या. अजिंठा पाहून वेरूळला आल्यावर, त्यांची, इराणमध्ये हरवलेल्या कॉनीशी अचानक मुलाखत झाली. वेरूळला लेणी पाहून परत आल्यावर त्या आपल्या हॉटेलातील बाथरूमकडे वळल्या ...... तोच बाथरूमचा दरवाजा ढकलून कॉनी बाहेर आली. पर्शियातून भारतात येताच, जे. कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानाचा तिच्यावर दृढ परिणाम झाला......व ती कृष्णमूर्तींची आता अनुयायी झालेली होती.

माविसला ती एकदम उत्साहाने सांगू लागली—

" आपल्या आसपास आपल्या जीवनावर गंज चढविणाऱ्या ज्या असंख्य गोष्टी आहेत, त्यांपासून मी आता स्वतःची सुटका करून घेणार आहे. आपली बुद्धी व पैसा यांचा आपण काय उपयोग करतो या गोष्टीचा माणसाची जी आत्मिक अवनती होत आहे, त्याच्याशी काही संबंध नाही. ".

माविसला हे पटत नव्हते. तिने कॉनीला सांगण्याचा प्रयत्न केला—

" कृती करीत राहणे यावर माझा विश्वास आहे. जे योग्य आहे असे वाटते,

त्याकरता हालचाल करणे म्हणजे आयुष्य! कदाचित, आज जे योग्य वाटते, ते कालांतराने चुकीचे ठरेल. ठरेना का—! पण या भीतीपायी जीवनातून पळ काढणे चांगले नाही."

परंतु कॉनीला आता नवा साक्षात्कार झालेला असल्याने, ती कृष्णमूर्ती हा 'नवा ख्राइस्ट' आहे, वगैरे तिला सुनावू लागली. माविसने तिचा नाद सोडला.

आता मे महिना लागला होता. प्रवासात उष्म्याने दोघी हैराण होत होत्या त्यांना कळले की, सिलोनमध्ये बुद्ध–जन्माला २॥ हजार वर्षे झाली म्हणून मोठा समारंभ आहे. त्यासाठी त्या दोघी कोलंबोला आल्या.

कँडी या ठिकाणी बुद्धाचा एक दात ठेवलेला आहे. या पवित्र ठिकाणाहून प्रचंड मिरवणूक निघाली होती. पिवळी काषायवसने घातलेले बौद्ध भिक्षू हत्तींवर बसले होते. त्यांच्या तुकतुकीत हजामत केलेल्या मस्तकांवर छत्र्या धरलेल्या होत्या. पाऊस चांगलाच पडत होता, तरी मिरवणूक शांतपणे पावसातून चालली होती.

दोघींचा या समारंभानंतर कोलंबोतून पळण्याचा विचार होता. कारण फक्त कोलंबोच काय, 'सिलोन देशा – डासांच्या देशा' असा अनुभव त्यांना येत होता. त्यात बार्बाराच्या पायाला जी लहानशी जखम झाली होती तिचे सेप्टिक झाले. त्या अमृतसरला गेल्या तेव्हा तेथे साधी ठेच लागली होती. शिखांचे सुवर्णमंदिर पाहण्यास आत जाण्यापूर्वी, त्यांना पाय धुण्यास सांगण्यांत आले. एका छोटया घाण पाण्याच्या पाडळीत त्यांना पाय धुवावे लागले व बार्बाराची जखम चिघळत गेली. आता कोलंबोत हे सेप्टिक शरीरावर इतर ठिकाणी फुटू लागले. ठिकठिकाणी पुळ्या उठू लागल्या. माविसने तिला कोलंबो जनरल हॉस्पिटलात दाखल केले.

कोलंबोचे जनरल हॉस्पिटल भारतातल्या हॉस्पिटलसारखे होते. ४० कॉटस्‌ची सोय. जनरल वॉर्डात असताना १४० वर खाटा त्यात कोंबलेल्या होत्या व शिवाय व्हरांड्यात गाद्यांवर व चटयांवर शंभर सव्वाशे रोगी जमिनीवरच टाकलेले होते. क्षयरोगापासून टॉयफॉइडपर्यंतचे सर्व रोगी त्यांत होते. काविळ झालेली एक स्त्री चुकीने त्या हॉस्पिटलात दाखल झालेली होती. चूक लक्षात येईपर्यंत तिच्यावर भलतेच उपचार झाले व चूक लक्षात आली तेव्हा ती मृत्युपंथाला लागली व काही तासात मरण पावली.

चार मुताऱ्या या सर्व रोगी स्त्रियांसाठी होत्या. या मुताऱ्यांच्या आसपास व बाहेर रोग्यांनी इतकी घाण केलेली होती, की या नरकात दिवसातून दोनदा जाणे बार्बाराला हे मोठेच दिव्य वाटत होते. ज्यांनी भारतातल्या हॉस्पिटलचा अनुभव घेतला असेल, त्यांनाच या यातनांची कल्पना येईल.

पुरुष रोग्यांनी तंबाखूच्या पिचकाऱ्या टाकून हॉस्पिटलात सर्व भिंतींचे खालचे कोपरे हिडिस करून टाकले होते.

धर्मधीरन नावाच्या तामिळ माणसाकडे या काळात माविस राहत होती. एके

दिवशी ती बार्बाराला भेटायला हॉस्पिटलात गेली असताना, एकदम बरीच जखमी माणसे हॉस्पिटलात येऊ लागली. चौकशी करता तिला कळले की, पार्लमेंटसमोर तामिळ भाषिक व सिंहली भाषिक यांच्यांत दंगल उसळली आहे.

सिंहली भाषा सिलोनची राष्ट्रभाषा केल्यामुळे सिलोनमधील तामिळ भाषिक हिंदी लोक निषेधासाठी जमले होते व उभयपक्षी दगडफेक होऊन दंगा सुरू झाला होता. दुसऱ्या दिवशी सिंहली लोकांनी मोटरी जाळणे, तामिळ भाषिकांच्या घरांची तावदाने फोडणे, असा दहशतवाद सुरू केला. खेड्यापाड्यांतून तामिळ भाषिकांना मारहाण सुरू झाली व सर्वत्र घबराट माजली.

धर्मवीरनच घाबरून गेला. माविस व बार्बाराने शक्य तितक्या लवकर सिलोन सोडावे असे त्याने सुचविले. बार्बाराची जखम जरा बरी होऊन ती फिरू लागताच माविसने सिलोन–भेट संपवली व दोघी परत भारताकडे निघाल्या.

कॉनीने दोघींना, योगी अरविंदांच्या पाँडिचेरी येथील आश्रमासंबंधी बरेच सांगून त्यांचे कुतूहल वाढवलेले होते. दोघींनी पाँडिचेरीला जाण्याचे ठरवले.

पाँडिचेरी स्टेशनवर त्यांना उतरवण्यासाठी आश्रमाचा माणूस आला होता. त्याचे नाव बादवार. आश्रमात पोचेपर्यंत बादवारने त्यांना आश्रमाची माहिती सांगितली.

'आश्रमात जवळजवळ ११८० निवासी आहेत. त्यांत बरेच अमेरिकन वा युरोपियन आहेत. आश्रमाच्या प्रमुख माताजी या जवळजवळ ऐंशी वर्षांच्या असून त्या फ्रेंच आहेत...' वगैरे

मद्रास राज्यात दारूबंदी असली तरी पाँडिचेरीत दारूबंदी नव्हती. विलायती दारूची दुकाने रस्त्याच्या दुतर्फा दिसत होती. आश्रमात पोचताच दोघींना एका निवासात जागा देण्यात आली. बादवारने आश्रमाची बरीच प्रकाशने त्यांना चाळण्यास दिली. या सर्व इंग्रजी प्रकाशनांतून 'माताजी', 'माताजी' असा जो उल्लेख होता याचा अर्थ, निसर्गमाता, भारतमाता, की, एखादी देवता याचा उलगडा होत नव्हता. कदाचित ती आश्रमप्रमुख फ्रेंच वृद्धा म्हणजेच माताजी असू शकेल. माविसने ती प्रकाशने चाळली, परंतु त्यातले एकही विकत घ्यावेसे तिला वाटले नाही.

सायंकाळी पाच वाजता बादवार त्यांना पुन्हा जेवणासाठी नेण्यास आला. सामुदायिक भटारखान्याच्याजवळ आपापली ताट-वाटी घेऊन सर्वजण रांगेत उभे होते. भिंतीवर योगी अरविंदांचे व माताजींचे अशी मोठाली चित्रे होती. उदबत्त्या जळत होत्या. भिंतीवर ठळक शिकवण होती—

"प्रत्येकाने चांगले वागावे, कारण माताजी सर्व पाहत आहे."

पुन: माविसला प्रश्न पडला, ही माताजी म्हणजे तीच वृद्धा की काय? तसे असेल तर तिला सगळीकडचे दिसते कसे?

जेवण उरकल्यावर माताजी-दर्शनासाठी सर्वजण पटांगणात जमले. तिथे काही वृद्ध स्त्री-पुरुष कवाईत करीत होते. इतक्यात एकदम दिवे गेले. सर्वत्र क्षणभर काळोख झाला. थोड्यावेळाने दिवे लागले तर समोरच्या उंच व्यासपीठावर माताजी अवतीर्ण झालेल्या ! हिरव्या रंगाचा भारताचा मोठा नकाशा व्यासपीठावर माताजींच्या मागे झळाळते होता व पिवळा फेटा, पिवळा पायघोळ झगा घातलेली फ्रेंच वृद्धा– माताजी– पायांत उंच टाचेचे बूट घालून तिथे अवतरलेली होती.

हळू हळू दर्शनाचा कार्यक्रम सुरू झाला. ओळी पुढे सरकू लागल्या. एक एक माणूस त्यांच्यापुढे जाऊन पायांवर डोके ठेवून पुढे सरके. भक्तगण भारावल्या-सारखे दिसत होते.

माविस– बार्बारांची पाळी येताच माताजींनी फ्रेंचमध्ये विचारले " कसं काय ? सर्व व्यवस्था लागली ना ? "

उत्तराची अपेक्षा नव्हतीच. माताजींनी प्रसाद म्हणून लहान लहान पुड्या दोघींच्या हातांत दिल्या. दोघींनी उत्सुकतेने उघडल्या. त्यात चणे निघाले. चणे काढून घेतल्यावर एका शिष्याने–– कागद परत मागितला. दोघींनी पुडीचे कागद परत केले. हेच कागद पुनः वापरता येतात.

सकाळी ६। वाजता माताजींचे पुन्हा दर्शन होते, परंतु दोघी ताणून झोपल्या होत्या व त्यांना जाग आली नाही. थोड्या वेळाने आश्रम दाखविण्यासाठी बादवार आला.

आश्रम खूपच पसरलेला होता. भात, ऊसाची शेते त्यात होती. फळांच्या बागा होत्या. आश्रमाची बेकरी होती. दवाखाना–हॉस्पिटलांची सोय होती. आश्रमात एक छापखाना होता. छोटे छोटे उद्योगाश्रम होते. त्यांत अनेक कामगार नोकरीला होते.

आश्रमातील सर्व साधकांनी काहीतरी उपयुक्त काम रोज केलेच पाहिजे, अशी शिकवण असे. माताजी या बाबतीत मार्गदर्शन करीत. सेवाभावनेने हे काम करा-वयाचे असते. कुणी इंजिनिअर असला तर त्याला इमारत बांधणीचे काम मिळेल. सुतार असला तर सुतारकाम मिळेल. जवळजवळ अशा भावनेने दोनशेहून अधिक इमारती आज आश्रमात उभ्या झाल्या आहेत.

योगी अरविंदांची समाधी दोघींनी पाहिली. त्यावर मोठे छत्र होते व अनेकजण समाधीपाशी ध्यानस्थ बसले होते. अरविंदांनी अखेरची तीस वर्षे समाधीत घालवली व लेखन केले. या कालात फक्त माताजी त्यांचेपाशी जाऊ शकत असत. वर्षातून चार वेळा ते दर्शन देत व या दर्शनासाठी भारताच्याच नव्हे, तर जगाच्या काना-कोपऱ्यातून २०–३० हजार यात्रेकरू येत असत.

आश्रमात माताजींविषयी फारशी माहिती मिळत नव्हती. जी माहिती माविसने मिळवली ती अशी होती––" माताजींचे सर्व तरुणपणचे आयुष्य फ्रान्समध्ये गेले.

तिला पहिले मूल झाल्यावर तिला विरक्ती आली. १९२८ साली वयाच्या ५० व्या वर्षी, भारतात दौऱ्यावर असताना, योगी अरविंद हेच कृष्णावतार आहेत याबद्दल खात्री पटताच माताजींनी नवऱ्याचा त्याग केला व पाँडिचेरीत आश्रम उघडला, शाळा काढली. शाळेत सध्या तीनशेहून अधिक विद्यार्थी व सुमारे १०० शिक्षक आहेत. शाळेत वर्गात बसणे सक्तीचे नाही, परीक्षा नाहीत की गृहपाठ नाही. इयत्तावार वर्ग नाहीत, की विषयवार तास नाहीत.

विषयवासना ही वाईट आहे व विवाह–अवस्था ही कमी दर्जाची अवस्था आहे, अशी शिकवण योग्य आहे काय, असा माविसला प्रश्न पडला.

दुपारी चारनंतर माताजी टेनिस खेळत असत. वयाच्या मानाने तिचा खेळ बरा होत होता. डोळ्यांत सुरमा घातलेला तिचा चेहरा भेदक वाटत होता. तिच्याशी थोडा वेळ गप्पा मारताच माविसचे असे मत झाले की–" बाई चतुर आहे. आश्रमावर, आश्रम पाहायला येणाऱ्या पाहुण्यांचा जेवढा विश्वास, यापेक्षा तिचा अधिक नसावा !"

यामुळे सायंप्रार्थनेच्या वेळी जेव्हा माविसच्या ध्यानात आले, की सर्व आश्रमातील प्रार्थना या याच माताजींच्या आरत्या असतात...तेव्हा तिला काहीसा धक्का बसला. १९५६ साली योगी अरविंदांच्या आत्म्याने माताजींच्या ठिकाणी प्रवेश केला आहे, असे आश्रमवासी सांगत होते. आश्रमात जे अनेक उद्योगधंदे होते, त्यांतील कामगारांनी वेतनवाढीसाठी त्याच वेळी संप सुरू केला होता. आश्रमातील एका इंग्लिश साधकाशी माविस बोलत असताना तो सांगू लागला,

—" आश्रमवासियांची आत्मिक उन्नती अशीच चालू राहील, एक दिवस असा उगवेल की मृत्यूची धास्तीच उरणार नाही–माताजी या परमेश्वरी अंशच आहेत."

माविसने त्याला विचारले–" माताजी परमेश्वरी अंश असतील, परंतु इतर मालकांप्रमाणे माताजीही कामगारांना वाईट वागवतात हे कसे ?"

माविसचा हा प्रश्न ऐकून आश्रमातील साधक हादरलेच. माविस बोलत होती, ते माताजींना ऐकू जात आहे असे त्यांनी सांगितले. वातावरण तापतच चालले–तेव्हा माविस–वार्ताराने आश्रमातून पोबारा केला.

गाडीत बसल्यावरही माताजी डोळे वटारून आपल्याकडे पाहतच आहेत, ही भावना माविसला अस्वस्थ करीत होती.

रा. म. शास्त्री

●

[पुढील अंकी चालू]

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## • तत्त्वज्ञानाचे पेट्रोल

माओ–त्से–तुंगचे तत्त्वज्ञान अंगी बाणवल्याने पिंगपाँग चांगले खेळता येते, हा शोध लाल चीनमध्ये लागल्याला आता बराच काळ लोटला. हिंदुस्थानात ज्याप्रमाणे अठरा धान्यांचे कडबोळे करतात त्याप्रमाणे चीनमध्ये मार्क्सवाद, लेनिनवाद, स्टॅलिनवाद आणि माओवाद यांच्या सवगोलंकारातून पिंगपाँगचा गोल चेंडू साकार होत असावा. आणि अर्थातच तडकणाऱ्या कचकडयापेक्षा टणक साम्य-वाद अधिक टिकाऊ असल्याने परिणामी पिंगपाँग चांगले खेळता येत असले पाहिजे, अशी एकूण कार्यकारणपरंपरा या सदरात मी मागे लावली होती. त्या वेळी मला वाटले होते, साम्यवादाचा याहून अधिक कल्पक उपयोग काय असू शकेल ? आज बऱ्याच दिवसांनी या प्रश्नाचे उत्तर सापडले आहे.

काही चिनी लॉरी–ड्रायव्हरांनी माओ–त्से–तुंगच्या तत्त्वज्ञानाच्या बळावर अपघात न होऊ देता लॉऱ्या चालवल्या व सुरक्षिततेचे नवीन रेकॉर्ड प्रस्थापित केले अशी बातमी आली आहे. घ्या–! लॉरी नीट कशी चालवावी, हे शिकण्यासाठी ड्रायव्हिंग स्कूलमध्ये जायची जरुरी नाही, तर माओचे तत्त्वज्ञान समजून घेण्याची जरुरी आहे. सगळ्या जगातल्या लॉऱ्या अन् मोटार गाड्या पेट्रोलवर चालतात, पण चिनी गाड्या तत्त्वज्ञानावर चालतात असे दिसते. नाही म्हणायला इतर काही देशांतही वीज, सूर्य–प्रकाश असल्या गोष्टींवर मोटारी चालविण्याचे प्रयोग होत आहेत, पण तत्त्वज्ञानावर चालणाऱ्या अचाट गाडीपुढे हे प्रयोग अगदीच पुचाट वाटतात. खरे म्हणजे तत्त्वज्ञानाचा मार्ग बराच अवघड असतो अशी माझी समजूत होती. पण चिनी लॉरी त्या मार्गावरून सत्यम्, शिवम्, सुंदरम् आणि सुरक्षितम् अशा टप्प्या टप्प्याने थेट जाऊ शकते हे माओवादी मशिनने सिद्ध केले आहे. निर्वाणाच्या मार्गावर तात्त्विक अपघात होऊ नयेत म्हणून प्राचीन काळी बुद्धाने 'मध्यम मार्ग' दाखविला होता व याच मार्गाने बुद्धाचे अनुयायी चीनपर्यंत पोचले होते. पण त्या काळच्या रथांना हा मध्यम मार्ग ठीक असला तरी हल्लीच्या चिनी मोटार गाड्यांना 'माओ–मार्ग'च हवा.

१९६२ साली चीनने भारताच्या सीमेवर युद्धाच्या ज्वाळा पेटवल्या तेव्हा माओचे तत्त्वज्ञान किती ज्वालाग्राही आहे याची कल्पना आलीच होती. पण हे तत्त्वज्ञान पेट्रोलइतके ज्वालाग्राही असेल आणि मोटारीच्या इंजिनात त्याचा

जळण म्हणून उपयोग करता येईल, याची मात्र कल्पना नव्हती. हेच जळण चीनच्या कारखान्यातून वापरले तर चीनच्या औद्योगीकरणाचा प्रश्नही चुटकी-सरशी निकालात निघेल. पुष्कळ वेळा अस्मादिकांचा कंपू एखाद्या वादावर खडा-जंगी चर्चा करीत बसला की मध्येच सौभाग्यवती "चुलीत घाला तो तुमचा वाद !" अशा शब्दांत चर्चेचा समारोप करते. पण एखादा वाद खरोखरीच चुलीत घालून त्यावर स्वयंपाक करणे शक्य आहे हे तिला बिचारीला कळले तर ती म्हणेल, "चला बाई, तेवढेच कोळसेवाल्याचे बिल वाचले !"

## • निरक्षर वाङ्मय

पुस्तक लिहायला विद्वत्ता लागते का ? नाही, विरामचिन्हे लागतात. स्वीडन-मध्ये एका लेखकाचे १०० पानांचे एक पुस्तक प्रकाशित झाले असून त्याची किंमत सुमारे २४ रुपये आहे. पुस्तकात काय आहे ? – फक्त विरामचिन्हे ! चला, आता आपल्याला यशाची गुरुकिल्ली सापडली. पुस्तक लिहायला विद्वत्ता लागते असा माझा आतापर्यंतचा गैरसमज असल्याने मी त्या वाटेला जायला धजलो नव्हतो. पण विरामचिन्हे माहीत असली म्हणजे पुस्तक लिहिता येत असेल तर अविराम पुस्तकावर पुस्तक लिहून दाखवण्याजी या पठ्ठ्याची तयारी आहे.

"वाचकाबरोबर उगीच वितंडवाद नको म्हणून आपण हे असे पुस्तक लिहिले" असे प्रस्तुत स्वीडिश लेखक म्हणतो. हे समेटाचे धोरण तर "नांदा सौख्यभरे" या आपल्या राष्ट्रीय धोरणाला अनुसरूनच आहे, तेव्हा पुढल्या वर्षीचे साहित्य ॲकॅडमीचे बक्षीस जवळ जवळ खिशात पडल्यासारखेच आहे. पण या वाचकांचे बेटचांचे मात्र काही सांगता येत नाही. आम्ही आपले अगदी विचार-पूर्वक लिहायचे ( ) ; ?, . तर हे उलट म्हणायचे ". "–म्हणजे शेवटी वाद–विवाद आलाच की नाही ? तेव्हा माझी कल्पना आहे कीं, संपूर्ण अहिंसक म्हणजे ज्यांना विरामचिन्हेदेखील नाहीत असेच पुस्तक लिहावे. अशा पुस्तकाचे दोन मोठे फायदे होतील–एक म्हणजे लेखकाला लिहायचा त्रास नाही, अन् दुसरे म्हणजे वाचकाला वाचायचा त्रास नाही. शिवाय, एकही अक्षर नसलेले हे पुस्तक पुढेमागे अक्षर-वाङ्मय ठरेल, अशी माझी खात्री आहे.





# कुस्त्या व तालीम संघ

लेखक :
शि. वि. दामले

तालीम संघाच्या निर्मितीपूर्वी कुस्त्यांवर कोणत्याही प्रकारची बंधने न्व्हती. कुस्तीमध्ये पराभूत होणे ही अपमानास्पद गोष्ट समजली जात असे. एकदा पडलेल्या पैलवानांना जोड मिळणेही मुष्किल होत असे. या दूषित वातावरणामुळे मल्लविद्येची पिछेहाट झाली.

एकदा कुस्तीत पडला की, तो या क्षेत्रातून बाहेर पडला, ही अनिष्ट प्रथा नष्ट व्हावी, तालमी संघटित व्हाव्यात, वैयक्तिक वैरभावास वाव असू नये व खऱ्या अर्थाने या खेळाचा विकास होईल, असे पोषक वातावरण निर्माण व्हावे या हेतूने व्यक्तिश: माझ्या पुढाकाराने तालीम संघाच्या निर्मितीस चालना मिळाली.

सर्व तालमींच्या नामवंत वस्तादांना भेटून त्या सर्वांची एक बैठक मी ' महाराष्ट्रीय मंडळा 'मध्ये बोलावली. अध्यक्षस्थानी वस्ताद गणपतराव आंबेकर होते. विश्रामबागवाड्यामध्ये तालीम संघाची दुसरी सभा होऊन एक कार्यकारी मंडळ नेमण्यात आले. संघाचे कार्य पाहण्यासाठी दोन चिटणीस नेमले गेले. अध्यक्ष म्हणून श्री. बाबूराव सणस यांची निवड करण्यात आली.

पुण्यात नुकतीच कुस्त्यांची मोठी मैदाने झाली.
या मैदानांच्या निर्णयाबाबत
व 'पुणे तालीम संघा'च्या व्यवस्थेबाबत
कुस्तीशौकिनांत बरीच उलटसुलट चर्चा झाली.

या चर्चेतील ही एक बाजू....

कुस्त्यांची मैदाने नियमितपणे भरवणे, पैलवानवर्गामध्ये शिस्त निर्माण करणे व मल्लविद्येस मानाचे स्थान प्राप्त करून देणे हे उद्देश मनाशी धरून तालीम संघाचे कार्य सुरू झाले. परंतु हे उद्देश सफल होण्याचे दृष्टीने आवश्यक असणारे प्रयत्न मात्र संघाकडून झाले नाहीत. त्यामुळेच संघाचे कार्य व उद्देश यांत तफावत पडलेली दिसते. संघ स्वतःचे जबाबदारीवर एकही कुस्ती लावत नाही. कंत्राटदार कुस्त्या ठरवतात. आणि तालीम संघ त्यास मान्यता देतो. पंचांचे बाबतीतही तालीम संघाचे धोरण विचित्रच वाटते. पृथ्वीच्या पाठीवर कोठेही कुस्तीला एक अगर तीन पंच असतात. तालीम संघ मात्र दोनच पंच ठेवतो, त्यामुळे मतभेद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय देणे शक्य होत नाही. उदा० मार्चच्या तिसऱ्या आठवड्यामध्ये पुण्यातील डेक्कन जिमखान्याचे आखाड्यात पैलवान गुलाब भिताडेची कुस्ती झाली. या कुस्तीबाबत एक पंच म्हणतो, गुलाब भिताडेने कुस्ती मारली तर दुसऱ्या पंचाचे म्हणणे, भिताडेने कुस्ती मारली नाही. परिणामी निर्णयाबाबत गोंधळ निर्माण झाला. हिंद-केसरी चंदगिराम यांची कुस्ती जर्नेलसिंगबरोबर

जाहीर केली. पण आयत्या वेळी दुसरा जोड दिला. चार-पाच कुस्त्या झाल्याच नाहीत. आणि हे सर्व तालीम संघाच्या मान्यतेचा शिक्कामोर्तब होऊन झाले.

संघाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत एकही कुस्ती वेळेवर झालेली नाही. साडेचारचे मैदान जाहीर करावे व ते भरपूर उशिरा सुरू व्हावे, हा नित्याचा अनुभव आहे. प्रेक्षकांचे पैसे व वेळ यांचा जो अपव्यय होतो, त्याला जबाबदार कोण ? मैदानाच्या निकालाबाबतही शाश्वती राहिलेली नाही. आयत्या वेळी कोणाला तरी पकडायचे व पंच म्हणून उभे करावयाचे ही प्रथा झाली आहे. आज जर असा प्रश्न केला की, या पंचांनी किती कुस्त्या केल्या आहेत, त्यांनी कोणती मैदाने गाजवली आहेत, कुस्ती विषयाचा त्यांचा काय व किती अभ्यास आहे, तर मिळणाऱ्या उत्तरामुळे लाजेने मान खालीच घालावी लागेल.

**सूचना—**

(१) जाहीर केलेली मैदाने वेळच्या वेळी सुरू होतील, याची दक्षता तालीम संघाने काटेकोरपणे घेतली पाहिजे.

(२) कोणाही अलबत्या गलबत्यास पंच न नेमता तालीम संघाने काही कसोट्या ठरवून पंचांची निवड करावी. पंचांसाठी मार्गदर्शनपर वर्ग चालवावेत व त्यांद्वारा चांगले जाणकार पंच तयार करावेत.

(३) बरोबरीने कुस्त्या सोडविण्याची प्रथा बंद करावी व कुस्त्या बेमुदत व निकाली झाल्याच पाहिजेत, अशी प्रथा सुरू करावी. अपयश आले तरी आपण कुस्ती–क्षेत्राबाहेर फेकले जाणार नाही, असा विश्वास पैलवान मंडळींत निर्माण करावा.

(४) तालीम संघाने स्वतःचे जबाबदारीवर दर आठवड्यास कुस्त्यांची मैदाने भरवावीत.

(५) उदयोन्मुख पैलवानांना भरपूर संधी उपलब्ध करून द्यावी. मल्लविद्येचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणारे वर्ग चालवण्यात यावेत.

(६) संघाची शिस्त मोडणारांविरुद्ध कठोर इलाज करावेत.

(७) व्याख्याने, लेख, प्रात्यक्षिके इत्यादी प्रचाराची साधने वापरावीत.

(८) तालीम संघाने कुस्तीचे नियम छापून प्रसिद्ध करावेत. म्हणजे भांडणे कमी होतील.

(९) पंचांचे अधिकार निश्चित करावेत. आखाडा केवढा लांब-रुंद असावा, माती किती असावी या बाबतीत पंचांना अधिकार असावेत. ह्या अधिकारांबाबत पंचांना अपुरी माहिती असल्यानेच आंदळकर-खंचनाळे या मुंबईत वल्लभभाई पटेल स्टेडियमवर झालेल्या कुस्तीचे वेळी अपघात झाला व पंचांना कुस्ती बरोबरीने सोडवावी लागली.

(१०) कुस्तीबाबतचे सर्वाधिकार तालीम संघाकडे असू नयेत. तालीम संघाचे कार्य आदर्श व्हावे, असे चालकांना वाटत असेल तर त्यामध्ये स्वार्थ आणू नये. निःपक्षपाती व सुशिक्षित कार्यकर्ते मिळवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. पुण्यातील डेक्कन जिमखान्याचा आखाडा फक्त तालीम संघासच उपलब्ध करून दिला जातो. असे का ? महानगरपालिका जी मदत देते, त्यात महानगरपालिकेस अशी अट कशी घालता येईल. इतर संस्थांनाही महानगरपालिका मदत देते. तेथे अशी अट नाही मग येथेच ही मूर्खपणाची अट का, याचा खुलासा व्हावा.

## सरकारी मदत

मल्लविद्येचा विस्तार व्हावा म्हणून महाराष्ट्र शासन दरवर्षी एक लाख सत्तर हजार रुपयांचे अनुदान देते. पण हा पैसा

अनाठायी खर्च होतो आहे. या रकमेतून काही पैलवानांना दरमहा तीस अगर चाळीस रुपये दिले जातात. पण दुसऱ्या वर्षी दिले जात नाहीत. मग एकच वर्ष ही मदत देऊन काय मोठा उपयोग होणार ? तालमीच्या वस्तादांनाही या रकमेतून मदत देण्यात येते. पण किती वस्ताद रोज कुस्ती शिकवतात ? तालमीमध्ये येणाऱ्या मल्लांची उपस्थिती नोंदली जाते का ? याचीही पाहणी करण्यात येत नाही. तालमींना मदत द्यावयाची असेल तर तेथील स्वच्छता, अन्य वातावरण कसे आहे, याची पाहणी केली पाहिजे. तालमीमधून शिस्त येण्यासाठी 'रजिस्टर' ठेवण्यात आले पाहिजे. वार्षिक सभा घेऊन पदाधिकारी निवडले गेले पाहिजेत, अथवा तीन इसमांनी विश्वस्त म्हणून काम पाहिले पाहिजे. सरकारी मदतीच्या बुडाशी राजकारणाचा वास येतो. परंतु मल्लविद्येच्या निकोप वाढीस ते मारक आहे.

## 'हिन्दकेसरी' : एक फार्स

'हिन्दकेसरी' पद देण्याबाबत निश्चित योजना हवी. सध्या हा एक नुसता फार्स झाला आहे. एक कुस्ती खेळून अगर कुस्ती न खेळताही 'हिन्दकेसरी' झाल्याची उदाहरणे आहेत. 'हिन्दकेसरी'च्या कुस्त्यांना तिकिट लावण्यात येते, पण पैलवानांस काहीच मिळत नाही. इतकेच नव्हे तर, राज्यातर्फे निवड झालेली नसल्याने भाडे-खर्चही मिळू शकत नाही.

'हिन्दकेसरी' पदासाठी कुस्त्या लावताना प्रथम राज्य पातळीवरून निवड करण्यात यावी. प्रत्येक राज्यामधून निवड झालेल्या पैलवानांमध्ये जो विजयी ठरेल त्यासच हे पद देण्यात यावे. विजयी पैलवानांचा यथोचित गौरव करावा म्हणजेच खऱ्या अर्थाने या पदास महत्त्व प्राप्त होईल.

• • •

लेखन व संकलन
शरद गोखले

## : १ :
# क्षण झाला वैरी [प्रेक्षकांचा!]

महाराष्ट्रीय कलोपासक या नाटयसंस्थेतर्फे सुरू करण्यात आलेल्या 'रसिक कुला 'तर्फे "क्षण झाला वैरी" हे कोरे नाटक सादर करण्यात आले. अनिल जी. रानडे या तरुण होतकरू नाटककाराने एका इंग्रजी कादंबरीवरून नाटकाचे रहस्यमय कथानक गुंफले आहे.

**गुंतागुंतीचे कथानक**

शंकरराव गद्रे या प्रथमश्रेणीच्या उद्योगपतीस सुषमा साठे नावाची पुतणी असते. सुषमाच्या वडिलांनी——म्हणजेच शंकररावांच्या मावसभावाने–आपल्या प्रचंड इस्टेटीचा एकमेव ट्रस्टी म्हणून शंकररावांची नेमणूक केलेली असते. ट्रस्ट-संबधीचे नियम अत्यंत विक्षिप्त असल्याने इस्टेटीची खरी मालकीण असूनही सुषमा साठेला स्वतःच्या मर्जीप्रमाणे पैसा मिळू शकत नाही. ट्रस्टमधील एक महत्त्वाची अट सुषमाने मोडल्याचे शंकररावांच्या कारकुनाच्या लक्षात येते व तो सुषमाला 'ब्लॅकमेल' करू लागतो. सुषमाला कोणीतरी लुबाडत असल्याचा संशय शंकररावांना येऊ लागतो. परिणामी, सुषमाला पैसे देण्याचे संदर्भात काका-पुतणीचे खटके उडू लागतात. सुषमा प्रथम काकांचे एक स्नेही वसंतराव दामले यांचा सल्ला घेते व नंतर काकांच्याच सांगण्यावरून दिलिप सरदेशमुख या श्रेष्ठ कायदे पंडिताकडे धाव नेते.

धंद्यामध्ये भागीदार असूनही आपल्याला न सांगता वसंतराव दामले यांनी काही आतबट्टयाचे आर्थिक व्यवहार केल्याचे शंकररावांना समजते. या घटनेमुळे भागीदारावरील विश्वास उडून दामल्यांबरोबरची आपली भागीदारी संपवण्यास ते उत्सुक असतात.

आपल्या घरातील कारकून घाटपांडे, ड्रायव्हर गोविंदा यांच्यासंबंधीही शंकररावांचे मत कमालीचे कलुषित असते.

थोडक्यात म्हणजे शंकरराव गद्रे ही कमलीची व्यवहारी व भावनाशून्य व्यक्ती कोणासच प्रिय नसते.

या सर्व पार्श्वभूमीवर शंकरराव व सुषमाचे वकील—बॅरिस्टर दिलिप सरदेशमुख-यांची भेट होते. संपूर्ण ट्रस्टच्या व्यवहारामध्ये किंचितही फट नसताना बॅरिस्टर

दिलिप सरदेशमुख शंकररावांच्या विरुद्ध उभे राहतात. (सरदेशमुखासारखा नामवंत कायदे पंडित सुषमाचे वकीलपत्र शंकररावांचा मृत्यू अभिप्रेत नसताना कशाच्या आधारावर स्वीकारतो ते समजू शकत नाही.)

बॅ. सरदेशमुखांची भेट घेऊन शंकरराव घरी येतात. त्यांचा खून झाल्याची बातमी वसंतराव दामल्यांकडून सरदेशमुखांना समजते.

नाटकाच्या उत्तरार्धामध्ये खुनी शोधण्यासाठी केलेली धडपड व खुनाचे विश्लेषण करण्यात आले आहे. चौथा संपूर्ण अंक कोर्टातील कामकाजाचा आहे. याच अंकामध्ये बॅरिस्टर दिलिप सरदेशमुख आपल्या बुद्धिचातुर्याने खुनी हुडकून काढून त्याला स्वतःला गुन्हा कबूल करावयास भाग पडतात. (नाटकातील खुनी व्यक्ती सांगून नाटक पाहू इच्छिणाऱ्या व्यक्तींचा रसभंग करणे उचित नाही.)

## लेखनातील वेगळेपण

कथानकाची तर्कशुद्ध मांडणी व अवास्तव घटनांना अजिबात फाटा ही नाटच-लेखनातील ठळक वैशिष्टचे आहेत.

खुनासाठी विशिष्ट परिस्थिती निर्माण करणे. चार–पाच व्यक्ती खुनी वाटाव्यात, अशा पद्धतीने त्यांच्या व्यक्तिरेखा रेखाटणे आणि खून झाल्यावर निर्माण होणाऱ्या गुंतणुकीची हळुवार सोडवणूक करून प्रेक्षकाला खुनी व्यक्ती-पर्यन्त घेऊन जाणे, या सर्व बाबतीत नाटककार अनिल जी. रानडे बरेचसे यशस्वी झाले आहेत.

संपूर्ण नाटकामध्ये 'रिलीफ' नावाची चीज कुठेही नाही. खुनासारखी गंभीर घटना आणि नंतर थंड बुद्धीने त्याचे केलेले विश्लेषण आपला प्रेक्षक एकाग्र चित्ताने पाहू शकणार नाही. कथानक अत्यंत संपन्न व पाश्चात्य संस्कृतीने प्रभावित झालेल्या घरातील असल्याने इंग्रजी संवादांचा वापर योग्य वाटतो.

## कंटाळवाणा प्रयोग

नाटकामध्ये प्रत्यक्ष खून नाही. त्यामुळे आवश्यक ते थ्रिल निर्माण होऊ शकत नाही. सर्व पात्रे नुसती बोलत राहिल्याने व संवादांमध्ये कोणतेही वैशिष्टच नसल्याने नाटचप्रयोग कमालीचा कंटाळवाणा होतो. सुरुवातीपासून ते शेवटपर्यन्त हे कंटाळवाणे वातावरण लेखकाने कायम ठेवले आहे. घडणाऱ्या घटनांबद्दल अथवा नाटकातील एकाही पात्राबद्दल आपुलकी वाटत नाही. नाटकातील विविध व्यक्तिरेखांबद्दलची उत्सुकताच नाहीशी झाल्याने त्यांच्या भवितव्याबाबतही प्रेक्षक उदासीन राहतो व क्षणभर आपण हे काय बघतो आहोत व का बघतो आहोत, याची शंका त्याच्या मनात निर्माण होते. त्यामुळेच दुसऱ्या वा तिसऱ्या अंकानंतर प्रेक्षक निघून गेला तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. लेखकाने अंकाच्या मांडणीचे 'स्पेसिंग' चांगले साधले आहे. अंक छोटे–तीस व पस्तीस मिनिटांचे झाले असले तरी तो नाटचकृतीचा दोष ठरू शकत नाही.

नाटकामध्ये गुंफलेले रहस्य मोठे वेधक नाही. सर्वसाधारण माणूसही खुनी व्यक्तीसंबंधीचा कयास बांधू शकतो. त्यामुळे नाटकाची मदार विविध व्यक्तिरेखा प्रभावीपणे साकार करणाऱ्या कलावंतांवर पडते. नाटकाच्या यशस्वी प्रयोगासाठी श्रेष्ठ दर्जाचे कलावंत ही अत्यंत आवश्यक बाब आहे. परंतु, दिग्दर्शक राजाभाऊ नातू यांनी नाटक अक्षरशः पोरासोरांच्या हाती दिल्याने प्रयोग कमालीचा निष्प्रभ होतो. श्री. नातूंच्या दिग्दर्शनात कोठेही विशेष चमक नाही. आपल्या पात्रांवर विशेष मेनहत घेतल्याचेही आठवत नाही. प्रमुख भूमिकांपैकी एकही पात्र प्रभाव पाडू शकत नाही. पात्रांचे अपेक्षित वय व काम करणाऱ्या कलावंतांचे वय यातील फरक एक मोहन आगाशे ( गंगाधर दिघे ) यांचा अपवाद वगळता अन्य कोणासही दाखवता आलेला नाही. प्रमुख पात्रांपैकी एकही पात्र प्रभावी न ठरल्याने नाटकाचा भारदस्तपणा नाहीसा होऊन त्याला महाविद्यालयीन स्नेहसंमेलनात केल्या जाणाऱ्या नाट्यप्रयोगांचा दर्जा आला आहे. फोनचा खणखणाट, फोनवरील संवादांचे सदोष ध्वनिमुद्रण; आणि स्त्रीपात्रे वगळता सर्व पात्रांच्या सिगरेटस्‌मधून निघणारा धूर याखाली प्रेक्षक गुदमरून जातो.

**पोषक नेपथ्य**

दिग्दर्शक राजा नातू यांनी त्यांचे सर्व लक्ष नेपथ्य व अन्य तांत्रिक बाजूंवर केंद्रित केल्याचे दिसते. नेपथ्याच्या बाबतीत आनंद पै यांनी सुरुवातीस उत्कृष्ट कामगिरी केली आहे. शंकरराव गद्रे यांच्या बंगल्याच्या अंतर्भागाचा त्यांनी उभारलेला सेट कथानकाची गरज भागवणारा व गद्रे यांच्या ऐश्वर्याची कल्पना देणारा आहे. मधल्या चौकटीवर घडयाळ उलटे बसवून त्यांनी आवश्यक तो परिणाम साधला आहे. गॅलरीचे पर्स्पेक्टिव्ह आश्चर्य वाटण्याइतके चांगले साधले आहे. दुसऱ्या अंकातील बॅरिस्टर सरदेशमुख यांच्या कार्यालयासाठी वापरलेला पुस्तकांचा पडदा कमालीचा भडक वाटतो. शेवटच्या अंकातील कोर्टाची मांडणी ठीक आहे.

रसिक कुलाच्या सदस्यांना एक वेगळे प्रयोगशील नाटक दिल्याचे समाधान निर्मात्यांना हवे असेल तर तेवढे या नाटकामुळे खचित मिळेल. □

## : २ :

# औद्योगिक कामगार नाट्यस्पर्धा

पुणे जिल्हा ' औद्योगिक ललित-कला विकास मंडळा 'तर्फे भरवण्यात आलेल्या औद्योगिक कामगारांच्या एकांकिका स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. या स्पर्धांमध्ये कामगारांनी जो अपूर्व उत्साह दाखवला त्यावरून श्रमजीवी वर्गही नाट्यकलेबाबत किती हौशी आहे याची प्रचीती आली.



उत्कृष्ट दिग्दर्शक
श्रीचंद्र

या वर्षी स्पर्धेमध्ये पुण्याच्या परिसरातील वीस कारखान्यांनी भाग घेतला होता. एखाद-दुसरा अपवाद वळवता स्पर्धेतील एकांकिकांचा दर्जाही समाधानकारक होता. आपल्या एकांकिकेचा प्रयोग स्पर्धेमध्ये होणार आहे, याची जाणीव निर्मिती-मागे असल्याचे जाणवत होते. एकांकिकांची निवड ही मोठ्या चोखंदळपणे केलेली दिसली. मादी, काळवेळ, बारा पस्तीस, काळोख, यांसारख्या एकांकिका कामगार नाट्यस्पर्धेमध्ये दिसाव्यात आणि त्या समजावून घेऊन समर्थपणे साकार करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जावा, ही गोष्ट निश्चित भूषणावह आहे.

**'काळोख'चा यशस्वी प्रयोग**

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट एकांकिका सादर करण्याचा मान डॉ. बेक ॲन्ड कंपनीने मिळवला. त्यांनी प्रा. अनंत काणेकर यांची 'काळोख' ही एकांकिका यशस्वीपणे सादर केली. समुद्रात एका दीपस्तंभावर अडकून पडलेल्या दोन खलाशी कामगारांची ही कथा. जगण्याची प्रबळ इच्छा परंतु विशिष्ट परिस्थितीमुळे जगावयास मिळते की नाही, ही भीती. अशा विचित्र पार्श्वभूमीवरील हा मानसिक संघर्ष मोठा नाट्यपूर्ण आहे. श्री. राजू मेहेंदळे यांनी शिब्बनची मानसिक अस्थिरता अचूकपणे दाखवली. श्री. श्रीचंद्र यांचा 'खुदिराम' मात्र म्हणावा तसा रंगू शकला नाही. विशेषतः, श्री. राजू मेहेंदळे यांचा शिब्बन बराच उजवा झाल्याने श्रीचंद्रांचा खुदिराम फिकट वाटला. समजूतदार दिग्दर्शन, सूचक रंगमंच, श्री. राजू मेहेंदळे यांचा प्रभावी अभिनय, साऊंड इफेक्टस्‌चा प्रत्ययकारी वापर या गुणांच्या भांडवलावर एकांकिका प्रथम क्रमांक मिळवू शकली. श्री. श्रीचंद्र यांना उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून पारितोषिक मिळाल्याने त्यांच्या परिश्रमांचे चीज झाले. विशेषतः, श्री. दीनानाथ टाकळकर, श्री. केशव घुले, श्री. विश्वास मेहेंदळे यांसारखी अनुभवी मंडळी स्पर्धेमध्ये असतानाही श्री. श्रीचंद्र यांनी मिळवलेले यश कौतुकास्पद आहे.

कारखान्याबाहेरील दिग्दर्शक व स्त्री-कलावंतांना स्पर्धेमध्ये भाग घेऊ देऊ नये,

ही प्रा. मधुकर सातारकर यांची सूचना मौलिक वाटली. अनुभवी दिग्दर्शक व बाहेरील कलावंत यांमुळे इतर स्पर्धकांवर अन्याय होतो. कामगारांना या स्पर्धा पाहता याव्यात म्हणून काही निश्चित स्वरूपाची योजना आखावी, ही सातारकरांची सूचनाही स्वागतार्ह आहे.

खर्चाच्या व वेळेच्या दृष्टीने सोईचे जावे म्हणून या स्पर्धा वाळवेकर ट्रॉफीप्रमाणे घेण्यात याव्यात व निवडक एकांकिकांची दुसरी फेरी सर्वांना खुली असावी, अशी विनंती स्पर्धकांतर्फे बोलताना श्री. केशवराव घुले यांनी केली. स्पर्धेच्या संयोजकांनी या सूचनेकडे जरूर लक्ष पुरवावे.

## नवीन संस्थेची वाटचाल

गेल्या काही वर्षांतील पुणे शहराचा जो विकास झाला आहे, त्यामध्ये विविध औद्योगिक संस्थांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. त्या औद्योगिक संस्थांच्या वाढीबरोबरच शहराच्या लोकसंख्येमधील कामगारांचे प्रमाण लक्षात येण्याइतके वाढले आहे. मात्र असे असूनही सांस्कृतिक क्षेत्रात कामगारांचा वावर फारच कमी आहे.

सांस्कृतिक क्षेत्राचे नवे दालन कामगारांना उघडून देण्यासाठी 'पुणे जिल्हा औद्योगिक ललित कला विकास मंडळ' या नवीन संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली. या संस्थेच्या स्थापनेमध्ये औद्योगिक संस्था चालकांनी घेतलेला पुढाकार ही महत्त्वपूर्ण घटना आहे. मंडळाच्या कार्याकडे कामगारांचे लक्ष वेधण्याचे हेतूने मंडळातर्फे गेल्या वर्षीपासून एकांकिका स्पर्धा सुरू करण्यात आल्या. स्पर्धांना स्वयंगती प्राप्त होईपर्यंत आलेल्या अडचणींना मंडळाने खंबीरपणे तोंड देऊन यशस्वी वाटचाल केली. मंडळाच्या एकांकिका स्पर्धांचे कामगार-क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर स्वागत झाले. रंगभूमीची आवड असलेला कलाप्रेमी कामगार वर्ग या स्पर्धांमुळे जनतेसमोर आला.

पहिल्याच वर्षी दहा कारखान्यांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतला तर यंदा ही संख्या दुप्पट झाली. कामगारांचा या बाबतीतील उत्साह पाहिला म्हणजे अशा स्पर्धांची किती गरज होती त्याची कल्पना येते.

केवळ वार्षिक नाट्य-स्पर्धांपुरतेच आपले क्षेत्र मर्यादित ठेवण्याची मंडळाची इच्छा नाही. नाट्यस्पर्धांबरोबरच गायन, वादन, चित्रकला, आदी ललित कलांच्या बाबतीतही मंडळ नवीन योजना आखण्याच्या विचारात आहे. आपल्या कलागुणांचे कौतुक करणारी व याच संदर्भात आपणांस सुयोग्य मार्गदर्शन करणारी एक भक्कम संस्था आपल्यामागे उभी असल्याची जाणीव कामगारांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळेच संस्थेच्या विकासासाठी कामगार प्रयत्नशील आहेत.

संस्थेची घटना तयार झाली असून संस्था कायदेशीररीत्या रजिस्टर्ड करण्यात आली आहे. ही संस्था कामगारांच्या ठायी वसत असलेल्या ललित कलांचा विकास करण्यासाठी योग्य मार्गाने वाटचाल करील, असा विश्वास वाटतो. ●

# पैसा दिया.......दर्द लिया

चित्रपटामधील भूमिकेचा स्वीकार करण्यापूर्वी कथा पारखून व त्यातील आपली भूमिका समजावून घेऊन साकार करण्याबद्दल दिलिपकुमारची ख्याती आहे. 'कोहिनूर', 'लीडर' व आता 'दिल दिया' हे चित्रपट पाहिल्यावर त्याच्या या नावलौकिकाबद्दल शंका येते.

कोणी एक राजपुत्र कोण्या एका जहाजातून आपल्या आजारी बापाला भेटण्यासाठी जात असतो. भयंकर फिल्मी वादळ होऊन जहाज फुटते. सर्व दरबारी मंडळी मरतात. मात्र हा बेटा राजपुत्र किनाऱ्याला लागतो.

किनाऱ्यावर एक जमीनदार राजपुत्राची वाट पाहत असतात. दिग्दर्शकाचा हुकूम होताच तत्परतेने पुढे होऊन ते राजपुत्राला ताब्यात घेतात. या जमीनदारसाहेबांना एक कन्या (रूपा) व एक पुत्र (रमेश) अशी दोन अपत्ये असतात. त्यात या अनाहूत राजपुत्राची–शंकरची–भर पडते.

(१) रमेश शंकरचा द्वेष करतो.

(२) रूपा शंकरवर प्रेम करते.

(३) नायक, नायिका, खलनायक असा त्रिकोण तयार होतो.

दिग्दर्शक अडचणींचे डोंगर निर्माण करतो.

शंकर असा सिकंदर की, हे सर्व डोंगर शेर्पा तेनसिंगच्या सफाईने तो तरून जातो. अडचणींच्या डोंगरापलीकडे – रूपा नावाची नायिका वाट बघत बसलेली असते. तीन तासांचे खोबरे केल्यावर दिग्दर्शकाच्या हुकुमाप्रमाणे शंकर–रूपाचे मीलन होते.

बिचारा प्रेक्षक पैसा दिया–दर्द लिया म्हणत बाहेर पडतो.

मूळ कथानक अतिसामान्य. (म्हणूनच कथा–लेखकाचा नामोल्लेख टाळला असावा.) पटकथा–लेखक मूळ लेखकाहून वस्ताद. मूळ कथेचे त्याने मनापासून वाटोळे केले आहे.

कथेचे तीन तेरा वाजल्यावर अपेक्षा करावयाची दिलिप–वहिदाकडून. पण त्या दोघांनीही निराशा केली आहे. 'प्राण'च्या वाटचाला आलेली भूमिका त्याने या पूर्वीच शे–सव्वाशे वेळा केली असल्याने 'अजून एकदा'च्या थाटामध्ये रतीब घातला आहे.

मिया कारदारांचा व चित्र–दिग्दर्शनाचा गेली बरीच वर्षे संबंध नव्हता याची खात्री पटविणारा चित्रपट आहे. संगीत दिग्दर्शक म्हणून "नौशाद"चे नाव श्रेय फलकावर असल्याने ते खरे मानावयास पाहिजे. मांडव गढाची भकास पार्श्वभूमी चित्रपटासाठी निवडली असली तरी द्वारका दिवेचांनी छायाचित्रण सुरेख केले. ● ● ●

आई

# भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री

**पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे.**

रॉयल आकार : पृष्ठसंख्या सुमारे पाचशे

भरपूर छायाचित्रे

**किंमत : अठरा रुपये**

प्रसिद्धिपूर्व सवलतीची किंमत


**रुपये बारा केवळ**

- *सवलतीची मुदत ३० जून १९६६ पर्यंत*
- *रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास दोन रुपये टपालखर्च अधिक पडेल. ( १२ + २ = १४ रु. )*

**रा ज हं स प्र का श न**

४१९ नारायण पेठ, पुणे २

MANOOS ( Fortnightly ) : 1 June 66 : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर